पोलादाला चढले पाणी



निकोलाय अस्त्रोवस्की

पावेल, क्लिम्का व
लाल रक्षक (गनिमी सैनिक)
बुल्गाकोव





पावेल, तोन्या तुमानोवा
(पावेलशी दोस्ती
करण्याच्या प्रयत्नात)



मृत्यूच्या दाढेतून परतल्यावर पावेल,
पानक्रातोव सोबत

मुखपृष्ठ चित्र :
पेत्ल्युरा सैनिक पकडून नेत
असताना, पावेलच्या मदतीने
सुटका करून घेताना झुखराय

पोलादाला चढले पाणी

निकोलाय अस्त्रोवस्की

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे

किंमत २५ रुपये

धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी : प्रबोधनमाला - ७

पोलादाला चढले पाणी

रशियन कादंबरीचे संक्षिप्तीकरण : अंजली कुलकर्णी
प्रथम आवृत्ती : ७ नोव्हेंबर २००० , रशियन क्रांतीदिन (१९१७)
मुखपृष्ठ, मलपृष्ठ : मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, २/१४, मारवा, अनुपम पार्क, कोथरूड, पुणे - २९
अक्षरजुळणी : किशोरकुमार तेंडले
प्रकाशक व मुद्रक : सुलभा ब्रह्मे, १२९ ब/२, एरंडवणे, पुणे ४
मुद्रणस्थळ : संजीव मुद्रणालय, पुणे ३०

प्रस्तावना

निकोलाय अस्त्रोवस्की (१९०४-१९३६) यांची ''काक झकल्यालस स्ताल''* ही आत्मचरित्रात्मक कादंबरी. यातील बहुतेक व्यक्तिरेखा निकोलायच्या अनुभवातून साकारलेल्या आहेत. ही कादंबरी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या तरुणांविषयी आहे, प्रेम आणि संघर्षाविषयी आहे, सोविएत क्रांती व त्यानंतरच्या ८/१० वर्षांतील बिकट वाटचालीत कम्युनिस्ट युवक-युवतींनी दिलेल्या झुंझार लढ्याविषयी आणि असीम त्यागाविषयी आहे. या क्रांतिकुंडातून पोलादाला पाणी कसे चढले याचे लखलखते, रसरशीत वास्तव ही कादंबरी आपल्यापुढे उभे करते. ही स्फूर्तिदायी कादंबरी निकोलायने लिहिली ती यादवी युद्धात रणांगणावर जबर जखमी झाल्याने पुढे अपंगत्व येऊन अंथरुणाला खिळल्यावर, अंधत्व आलेल्या अवस्थेमध्ये, जीवाच्या कराराने. विकलांग अवस्थेतहीं जिवात जीव असे तोवर क्रांतीला उपयुक्त असेच जीवन जगण्याच्या निग्रहाने निकोलायने कामगार-शेतकरी क्रांतीचा लढा शब्दबद्ध केला. तळपत्या लेखणीचे शस्त्र हाती घेऊन तो पुन्हा लढवय्यांच्या तुकडीत सामील झाला. परंतु अल्पकाळातच, वयाच्या ३२ व्या वर्षीच हा शौर्यशाली, प्रतिभावान, क्रांतिकारी तरुण मृत्युमुखी पडला. तरीही 'पोलादाला चढले पाणी' या कादंबरीतून निकोलाय पर्वतांना ओलांडून, महासागरांना पार करून जगाची सफर आजही करत आहे. देशोदेशीच्या तरुण-तरुणींमध्ये त्याला चांगले मित्र लाभले आणि लाभत आहेत आणि क्रांतिज्योत तेवत ठेवत मानवमुक्तीच्या लढ्याची प्रेरणा देत आजही निकोलाय जिवंत आहे.

निकोलाय अस्त्रोवस्की यांची ही रशियन भाषेतील कादंबरी 'How The Steel Was Tempered' या शीर्षकाखाली इंग्रजीमध्ये १९५२ साली सोविएत युनियनमध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. पुढे अनेक पुनर्मुद्रणे व नऊ आवृत्ती (१९८६) निघाल्या. त्याचे मराठी भाषांतर (अनिल हवालदार) 'अग्निदिव्य' या शीर्षकाखाली १९८० साली सोविएत संघाने प्रसिद्ध केले. या दोन खंडातील कादंबरीची पृष्ठसंख्या आहे ७१५ व आज ती उपलब्ध नाही. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमाने सारे जीवन व्यापल्यावर एवढी प्रदीर्घ कादंबरी सर्वदूर पोचणे कठीण. पण ती पोचणे तेवढेच महत्त्वाचे. कारण आज आपण जागतिकीकरणाच्या आक्रमक विळख्यात, 'बळी तो कान पिळी'च्या जमान्यात आणि चंगळवादी, स्वार्थांध जगतामध्ये ठेचाळत आहोत. श्रीमंतीचे अतीव केंद्रीकरण आणि गरिबीचे जागतिकीकरण चालू

* कादंबरीचे रशियन भाषेतील शीर्षक 'Kak Zakalyalus Stal', त्याचा शब्दश: अर्थ आहे 'कसे चढले पाणी पोलादाला'

आहे. सत्ताधीशांची जुलुमजबरदस्ती, बेदरकारी आणि गरिबांची ससेहोलपट वाढत आहे. अशा परिस्थितीत १०० वर्षांपूर्वी जुलमी झारशाही विरोधात क्रांतिकारी विचारांनी पेटून मानव मुक्तीसाठी नवसमाज निर्मितीच्या ध्यासाने प्रेरित झालेल्या तरुण-तरुणींनी आपले आयुष्य क्रांतिकुंडात झोकून दिले आणि नवीन समाज उभारण्यासाठी आपले प्राण ओतले त्या झुंजार लढ्याला उजाळा देणे नितांत गरजेचे वाटते. म्हणून ही प्रदीर्घ कादंबरी संक्षिप्त रुपाने प्रसिद्ध करीत आहोत. पुण्याच्या कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी कादंबरीचे संक्षिप्तीकरण केले.

******

कादंबरीचा नायक आहे पावेल कोर्चागिन आणि घटनास्थळ आहे शेपेतोवका - पोलंड आणि रशियन युक्रेन प्रांताच्या सीमेवरील रेलजंक्शन. रशियामध्ये त्यावेळी झारची अत्यंत जुलमी राजवट होती. त्याचे पाश अमीर-उमराव-जमीनदारांमार्फत गावागावात पोचलेले होते. शेपेतोवकामध्ये - अन्य हजारो गावांप्रमाणे - अत्यंत गरीब व पिळली जाणारी पण मनाने श्रीमंत आणि नेकीने जगणारी श्रमिक कुटुंबे बहुसंख्य होती तर मूठभर वकील, व्यापारी, सरकारी अधिकारी, अशा श्रीमंत, मग्रूर, ऐषाराम्मात राहाणाऱ्या, श्रमिकांना तुच्छ लेखणाऱ्या कुटुंबांचे वर्चस्व होते.

कादंबरीचा नायक पावेल, त्याचा मोठा बलदंड भाऊ आर्त्योम व काबाडकष्ट करून घर चालवणारी विधवा आई-मरिया, पावेलचे मित्र सर्गेई ब्रुझाक, क्लिमका, गलोच्का व त्यांच्यावर कुरघोडी करू पाहणारी शुरा व लिझा सुखार्तो, वित्तर लेश्चीन्स्की ही श्रीमंतांची मुले आणि पावेलच्या प्रेमात पडलेली वन अधिकाऱ्याची मुलगी तोन्या तुमानोवा यांच्या बालपणीच्या जीवन-संघर्षापासून कादंबरीला आरंभ होतो. साम्राज्यवादी महात्त्वाकांक्षेने जर्मनीने पहिले महायुद्ध (१९१४-१९१८) सुरू करून रशियावर आक्रमण केल्याने त्यावेळी युद्धाची धुमश्चक्री चालू होती. झारच्या जुलुमी राजवटीविरुद्ध १९०५ पासूनच रशियामध्ये शेतकरी, कामकऱ्यांचे क्रांतिकारी उठाव चालू होते. युद्ध लादले गेल्याने सैनिकांमध्येही झारविरोध वाढत होता. रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टी हा क्रांतिकारी पक्ष क्रांतिकारी चळवळीचे संघटन करत होता. १९०३ साली पक्ष संघटन आणि क्रांतीची रणनीती याबाबत मतभेद होऊन बहुसंख्यकांचा बोल्शेविक हा डावा तर अल्पसंख्यकांचा मेन्शेविक हा उजवा गट अशी फूट पडली. मेन्शेविकांमध्ये संधीसाधूपणा वाढीला लागून तो प्रतिगामी बनला. तसेच सोशल रेव्होल्युशनरी(आतंकवादी), सोशल डेमोक्रॅट, बुंद (ज्यू सोशल डेमोक्रॅट) आदी पक्ष झारशाहीविरुद्ध असले तरी ते पक्ष प्रतिगामी - कामगार क्रांतीविरोधी पक्ष होते.

१९१७ साली युद्धाच्या धुमश्चक्रीमध्ये अनेक झारविरोधी पक्ष-गटांनी झारला पदच्युत केले व मार्च १९१७ मध्ये सोशल रेव्होल्युशनरी व मेन्शेविक गट सत्तेवर आले. परंतु ते जमीनदार-भांडवलदारांचे हितसंबंध जपणारे होते. तेव्हा बोल्शेविकांनी आपला क्रांतिकारी लढा चालूच ठेवला. कामगार-शेतकरी यांची समांतर सत्ताकेंद्रे (सोविएत) स्थापन करायला प्रारंभ केला. असंतोषाने खदखदत असलेले सैनिकही मोठ्या संख्येने लाल सेनेला (क्रांतिकारी सेना) येऊन मिळाले. ऑक्टोबर १९१७ मध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली यशस्वी क्रांतिकारी लढा देऊन बोल्शेविक सत्तेवर आले. क्रांतीनंतर बोल्शेविक गटाने कम्युनिस्ट पक्ष हे नाव धारण केले. त्यांनी उत्पादनांच्या साधनांवरील खाजगी मालकीहक्क नष्ट करून कारखाने, बँका, व्यापार, रेल्वे, दळणवळण व अन्य अर्थव्यवहार राष्ट्रीय मालकीचे केले. सरदार, जमीनदार, उमराव, चर्च यांच्या जमिनी ताब्यात घेऊन कसणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये त्याचे वाटप करण्यात आले. अर्थात अशी क्रांतिकारी पावले उचलल्यावर तोवरचे प्रबळ सत्ताधारी-अमीर, उमराव, जमीनदार, लष्करी अधिकारी, बडे कारखानदार, व्यापारी, बँकर, नोकरशहा तसेच सोनेरी टोळ्या, दरोडेखोर या सर्वांनी सोविएत सत्ता मोडून काढण्यासाठी बेछूट हल्ले सुरू केले. त्यांना मदत होती जर्मनी, ब्रिटिश, फ्रान्स आदी भांडवली सरकारांची. शिवाय जर्मनीचे आक्रमण चालू होतेच. सीमेवरील युक्रेनमध्ये पोलिश सेनाही घुसली होती. या यादवीमध्ये शेपेतोवकासारखे सीमेवरचे गाव पिंजून, भरडून निघाले, उद्‌ध्वस्त झाले. १९१८ साली फेब्रुवारी ते नोव्हेंबर दरम्यान तर शेपेतोवका जर्मनीच्या अमानुष अमलाखाली होते. शेपेतोवकाच्या श्रमिकांनी या वादळाला कसे तोंड दिले, लाल सेनेमध्ये सामील होऊन तरुणांनी क्रांती पुढे कशी नेली हे पावेल, ब्रुझाक, झुखराय यांच्या संघर्षमय जीवनातून उलगडत जाते. पावेलसारखे अनेक तरुण यादवी युद्धाच्या धुमश्चक्रीमध्ये घायाळ झाले, असंख्य तरुण मृत्युमुखी पडले.

१९२० अखेर यादवी युद्ध संपले तरी सोनेरी टोळ्या, दरोडेखोर, गुंड यांचे हल्ले चालूच होते. कुलक (सधन जमीनमालक) व व्यापारी यांच्या घातपाती कारवाया चालू होत्या. त्यामुळे युद्धोत्तर पुनर्रचनेला पावलोपावली खीळ बसत होती. त्यात भर पडली ती क्रांतीनंतरची आर्थिक पुनर्रचना, पक्ष संघटना आदींबाबतच्या रणनीतीबाबतीतील तीव्र मतभेदांची. क्रांतिकाळामध्ये लेनिन, त्रॉत्स्की, स्तालिन आदी पुढारी नेतृत्वस्थानी होते. १९२४ साली लेनिनच्या मृत्यूनंतर स्तालिनकडे पक्षनेतृत्व आले. त्रॉत्स्कींचा भरवसा जागतिक क्रांतीवर होता; पण जर्मनी आदी

युरोपीय देशात परिपक्व परिस्थिती निर्माण झाली तरी क्रांती यशस्वी होऊ न शकल्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सोविएत युनियनला एका देशात समाजसत्तावादी अर्थसमाजरचना स्थापनेचा लढा पुढे नेण्याविना गत्यंतर नव्हते. या स्थित्यंतरामध्ये केंद्रीकरण, नोकरशाही प्रवृत्तीची वाढ होत असल्याबद्दल त्रॉत्स्कीवाद्यांचे बरेच आक्षेप होते. याबाबतच्या वादातून त्रॉत्स्की, कामेनेफ , झिनोविएफ आदी नेते कम्युनिस्ट पक्षाची ध्येयधोरणे व कार्यक्रमाविरोधात गेल्याने तरुण वर्गात वादळी वादंग माजून फूट पडली. बोल्शेविक-मेन्शेविक फुटीप्रमाणे त्रॉत्स्कीवाद्यांचा वेगळा गट स्थापन झाला. या संघर्षाच्या काळात पावेल, तोकरेव, अकीम, रीता, उस्तिनोविच, या सारखे हजारो कॉम्रेड्स सर्व फळ्यांवर झगडा देत देश उभारणीच्या महान आव्हानाला सामोरे जात होते. त्याचे एकच उदाहरण संक्षिप्त कादंबरीत समाविष्ट केले आहे आणि ते म्हणजे प्रतिगाम्यांच्या कारवायांमुळे जंगलातील लाकूडतोड रेल्वेस्थानकाजवळ न करता दूरवरच्या जंगलात केली गेली. त्यातून मार्ग काढण्यासाठी ऐन हिवाळ्याच्या तोंडाला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व अल्प काळात रेल्वे स्थानकापासून सात कि.मी.लांबीचा रेलमार्ग बांधून लाकूड साठ्यापर्यंत रेलमार्ग पोचवण्याचे आव्हान पावेल व त्याचे सहकारी आणि कम्युनिस्ट युवकांची पथके यांनी कसे पेलले तो दुर्धर संघर्ष.

पावेलला यादवी युद्धात मणक्याला जबर मार लागल्याने मज्जासंस्थेला धक्का पोचला आणि त्याच्याच परिणामी विशीतच त्याला अपंगत्व व पुढे अंधत्व आले. पावेलसारखे तरुण बाह्य आव्हानांसोबत शारीरिक वेदना व पंगुत्व यांच्याशी झगडा देत त्यापायी एकएक कार्यक्षेत्र बाद झाले तरी क्रांतिकारी चळवळ पुढे नेण्याच्या दृष्टीने शारीरिक आवाक्यात जे क्षेत्र उरेल त्यामध्ये जीव ओतून ते पादाक्रांत करीत आयुष्यअखेरपर्यंत क्रांतिसैनिकांच्या रांगेत उभे होते. अशी हिमालयाएवढी आव्हाने पेलण्याचे धैर्य त्यांना दिले ते मानवमुक्तीच्या लढ्यासाठी आयुष्य वेचणाच्या क्रांतिकारी प्रेरणेने. पावेलसारखी कामगार वर्गातील मुले क्रांतिकुंडातून भट्टीत तापवलेल्या लोखंडाप्रमाणे तेज:पुंज बनून नवसमाज-नवमानव निर्मितीचे आव्हान झेलत होती. पावेलच्या अल्पायुषी पण झुंजार आणि ओजस्वी जीवनाची ही कथा, संक्षिप्त रुपातही त्यातील मानवमुक्तीचा उदात्त संदेश, मानवी समाजाचे जीवन न्याय्य, समृद्ध आणि सुखी बनवण्यासाठी झगडण्याची स्फूर्ती वाचकांपर्यंत पोचवण्यात यशस्वी होईल अशा उमेदीने हे पुस्तक वाचकांच्या हाती सुपूर्द करीत आहोत.

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय
१२९ ब/२, एरंडवणे, पुणे ४

सुलभा ब्रह्मे

ओळख

गॅलरीचं दार उघडलं गेलं आणि पडदा वाऱ्यानं किंचित हलला, पुढे मागे झाला आणि एखाद्या बुडणाऱ्या बोटीप्रमाणे थरथरत राहिला. कुणीतरी रेडिओवर टाकलेला पांढरा चुरगळलेला टॉवेल पांढऱ्या उजेडात चमकत होता. तो एखाद्या उडी मारण्याच्या पावित्र्यात उभ्या असलेल्या पांढऱ्या सशासारखा दिसत होता.

मला दोन वर्षांपूर्वीची सोचीमधली ती सप्टेंबरची स्वच्छ सकाळ आठवली. ओरेखोवाया रस्त्यावरचं ते चिमुकलं घर, सूर्यप्रकाशात झगमगणाऱ्या बागेतली ती पिकलेली संत्री, पांढरा स्वच्छ रंग दिलेली ती प्रसन्न खोली आणि उशांच्या ढिगाऱ्यावर रेललेला तो प्रिय चेहरा...

निकोलायनी त्यांच्या कापऱ्या बोटांनी त्या पांढऱ्या सशाचे लांब, मखमली कान ओढताच तो आनंदाने पांघरुणाच्या घळ्यांमध्ये पहुडला. निकोलाय सौम्यपणे हसत होते आणि त्यांचे चमकदार दात साखरेइतके पांढरेस्वच्छ दिसत होते. उशाशी असलेल्या मेजावर मोठी मोठी लाल चुटुक सफरचंदे ठेवलेली होती आणि त्यांच्या गोड सुगंधानं सारं घर भरलं होतं. पांढरा ससा आपले कान विदुषकासारखे करून त्या शांत, सभ्य व्यक्तीचे हात आपल्या छोट्या, गुलाबी जिभेने चाटत होता.

*****

मला माझे डोळे घट्ट मिटून घ्यायचे होते आणि पुन्हा एकदा ती सप्टेंबरमधील सकाळ पाहायची होती. ते स्वच्छ सूर्यप्रकाशाने भरलेले आणि सफरचंदाच्या गंधाने दरवळलेले घर पुन्हा अनुभवायचे होते. पण माझे मन तो शोकाकूल प्रसंग स्वीकारायला तयार नव्हते. काय घडलंय हे समजण्याच्या व स्वत:ला 'आता हे अटळ आहे' हे समजावण्याच्या मन:स्थितीत मी नव्हते.

परंतु वास्तवाने आपले खरे रूप दाखवलेच व माझ्या नजरेला ते क्रूर सत्य पाहावेच लागले. तो चेहरा कायमचा शांत झाला होता. जिवंत राहण्यासाठी त्यांनी आयुष्याशी केलेल्या शेवटच्या संघर्षाने त्यांच्यातील सारा जीवनरस शोषून घेतला होता आणि गरम वाऱ्यात एखादे पान पाचोळून जावे तसा त्यांचा चेहरा अगदी वाळून गेला होता. त्यांचे लांबरुंद कपाळ आणि तांबूस केस मात्र तसेच होते. आक्रसून गेलेल्या त्यांच्या लहानखुऱ्या चेहऱ्यावर त्यांचे नितळ, भव्य कपाळ उठून दिसत होते. त्यामुळे असे वाटत होते की त्यांची क्रांतीच्या विचारांनी भारलेली सर्जनशील प्रतिभाशक्ती, जगण्याविषयीची उत्कट इच्छा आणि प्रेम हे सारे अजूनही तेवढेच जिवंत आहे. मी त्यांच्या कपाळावर माझा हात ठेवला. ते अजूनही गरम आणि दमट होते. जणू काही दिवसभराच्या श्रमांनंतर निकोलाय नुसते शांतपणे विश्रांती घेत पहुडले होते.

संपूर्ण तीन दिवस आणि तीन रात्री सर्व वयाच्या लोकांचे लोंढेच्या लोंढे तिथे येत होते आणि ती खोली फुलांनी आणि पुष्पचक्रांनी अक्षरश: भरून गेली होती.

निकोलाय अस्त्रोवस्की केवळ त्यांच्या पुस्तकातूनच अमर झाले असे नाही; त्यांच्या काळातले एक धीरोदात्त आणि प्रभावी व्यक्तिमत्व म्हणूनही ते चिरंजीव बनले.

नियतीने त्यांच्याशी फार क्रूर खेळ केला. तिने त्यांना अंधत्व आणि संपूर्ण अपंगत्व दिले. त्यांचे दोन्ही हात आणि पाय निकामी झाले. परंतु त्यांनी शारीरिक अपंगत्वावर, असाध्य रोगांवर, दुःखावर जिद्दीने मात केली आणि जीवनोन्मादाने सर्जनशील जीवन जगले. क्रांतीसाठी, स्वातंत्र-समतेसाठी आयुष्याच्या अखेरपर्यंत ते झगडले. ते बोल्शेविक तरुणाईतले एक उत्कट गायक होते. ते संघर्षाची, समाजवादाच्या विजयाची लढाऊ, रोमहर्षक गाणी गात असत. संपूर्ण सोव्हिएत भूमी आणि जगभरात त्यांचा सुंदर, नादपूर्ण आवाज दुमदुमला होता.

त्या शोकदायक आठवणी आता दूर सारूया कारण मृत्यू ही एक अटळता आहे जी मरणाच्या शारीरिक अस्तित्वाची क्षणभंगूरता सिद्ध करत असते. म्हणूनच त्यांच्या कधीच आटू न शकणाऱ्या चैतन्यदायी, शक्तिमान जीवनप्रवाहाकडे आपण वळूया.

*****

१९३२ मध्ये, मॉस्कोमधील वसंताच्या आरंभीच्या एका थंड दिवशी मी त्यांना भेटायला गेले होते. हनुवटीपर्यंत पांघरूणात व शालीमध्ये गुंडाळून घेतलेला एक माणूस बिछान्यावर पडला होता. उशांचा उंच ढीग रचला होता व त्यावर गडद तांबूस, पिंगट केसांचे झुलूप, भव्य ठसठशीत कपाळ आणि पांढराफटक रोडावलेला चेहरा मी पाहिला. पातळ पापण्या किंचित थरथरल्या. दाट पापण्यांचे खोलगट गालांवर निळसर सावट पडले होते आणि मेणासारखे पारदर्शक हात पांघरुणाच्या वरच्या बाजूला विसावले होते.

निकोलाय अस्त्रोवस्की अपंग आहेत एवढे मला कळले होते. पण त्यांची अवस्था एवढी वाईट आहे हे असे चित्र माझ्या डोळ्यांसमोर नव्हते. ते इतके क्षीण आणि असहाय्य दिसत होते की, त्यांना आता त्रास देऊ नये असे मला वाटले.

''आई कोण आलंय गं?'' काहीशा क्षीण पण खंबीर आवाजात त्यांनी विचारले.

किंचित वयस्क महिलेने - त्यांच्या आईने त्यांना माझे नाव सांगितले.

''अरे वा ! किती छान.'' ते म्हणाले, '' अशा आत या ना !''

सुंदर शुभ्र दंतपंक्ती दाखवणारे हास्य त्यांच्या चेहऱ्यावर विलसले. त्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा यौवनसुलभ कुतुहलाच्या आणि जीवनानंदाच्या आभेने जणू चमकत होती. प्रथम मला भास झाला की, त्यांचे मोठे, बदामी डोळेसुद्धा आनंदाने चमकत आहेत. पण दुसऱ्याच क्षणी मला जाणीव झाली की डोळ्यांतील बाहुल्यांच्या भोवतालच्या काळ्या पडद्यातील खोलवरच्या संपन्न रंगांमधून ती चमक उमटत होती. पण तरीही त्यांच्या उजळलेल्या चेहऱ्यावर एवढी एकतानता, एवढे अवधान आणि एवढा

मिस्कीलपणा होता की ते आंधळे आहेत याचा अख्ख्या संभाषणभर मला सारखा विसर पडत होता.

त्यावेळी 'मलादाया ग्वार्दिया' मासिकात मी संपादक म्हणून काम करत होते व अस्त्रोवस्कींच्या 'पोलादाला चढले पाणी' कादंबरीचा पहिला भाग त्या मासिकात छापण्याबाबत नुकतेच करारमदार झाले होते. त्या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा प्रभाव कसा पडला आहे हे जाणून घेण्यास निकोलाय उत्सुक होते.

''मला वाटतं पावेल तसा वाईट मुलगा नाही.'' मिस्कीलपणे म्हणत माझ्याकडे पाहून त्यांनी स्मित केले. ''अर्थात निकोलाय अस्त्रोवस्की आणि पावेल कोर्चागिन हे अगदी जिवाभावाचे मित्र आहेत हे काही मी लपवून ठेवीत नाही. हा पावेल माझ्या मेंदूतून... माझ्या रक्तामधून जन्मलाय... मला हे जाणून घ्यायचं आहे की, माझी कादंबरी म्हणजे नुसतं आत्मचरित्र वाटतं का, फक्त एका जीवनाची कहाणी वाटते?'' एकाएकी त्यांचे स्मित लोपले, ओठ घट्ट आवळले गेले. चेहरा कठोर भासू लागला.

''मी एवढ्या निर्भिडपणे हा प्रश्न विचारतोय कारण मी जे काही करतोय ते लोकांच्या दृष्टीनं चांगलं, बरोबर आणि उपयुक्त आहे का नाही हे मला समजून घ्यायचंय. तशा आपापल्यापरीनं रंजक असलेल्या अनेक कथा आहेत.''

याबाबतीत त्यांनी धास्ती बाळगण्याचे कारण नाही असे मी त्यांना सांगितले.

माझे बोलणे त्यांनी हळूच थांबविले आणि मला ते म्हणाले, ''कृपा करून आपण एक गोष्ट मान्य करू या. तुमच्या मनाचा दयाळूपणा दाखवून माझं सांत्वन करू नका. काही झालं तरी मी सैनिक आहे. अगदी लहानपणी घोड्यावर बसायला शिकलोय आणि आता सहजी फेकला जाणार नाही.'' त्यांच्या ओठांची थरथर होत होती. त्यांच्या अभंग इच्छाशक्तीचे सामर्थ्य मला कमालीच्या स्पष्टपणे जाणवले.

मी त्यांना सांगितले की, त्यांची कादंबरी वाचत असताना नकळत मला रशियन आणि पाश्चात्य अभिजात साहित्याची आठवण झाली.

महान, वैभवशाली व्यक्तिरेखांमध्ये पावेल कोर्चागिन नक्कीच अभिमानाने उभा राहू शकला असता. त्याच्या तरुण अंत:करणात अक्षय ताकद सामावलेली होती आणि संघर्षाच्या दुर्दम्य इच्छेने त्याचे जोरदार स्पंदन चालू होते. इतरांना स्वातंत्र्य आणि सुख मिळवून देण्याच्या अत्यंत पुरोगामी आणि उदात्त विचारांनी त्याचे मन भारलेले होते. साहित्यातील स्वातंत्र्याचा उद्‌घोष करणाऱ्या सर्व व्यक्तिरेखा - पुष्किन[१] गोर्की[२], बायरन[३] व स्टेन्धाल[४]च्या - मानसिकदृष्ट्या त्याच्या निकटच्या होत्या.

१) रशियन कवी, २) रशियन कथा व कादंबरीकार, ३) इंग्लिश कवी, ४) अमेरिकन कादंबरीकार

एकूण कादंबरीची हाताळणी, प्रसंग, संवाद, वर्णने, भाषा, तुलना, अलंकार या साऱ्या विषयांवरून त्यांनी अनेक प्रश्न मला विचारले. त्या विषयावर त्यांनी खूप वाचन आणि मनन केल्याचे दिसून येत होते. साहित्यकृतीत समाविष्ट असलेल्या अनेक समस्यांकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोण त्यांच्या परिपक्वतेची साक्ष देत होता.

ताज्या दमाचा, प्रभावी, बोल्शेविक, यादवी युद्धातला झुंजार लढवय्या, सैद्धांतिक आणि नैतिक मूल्यांविषयी एवढी सुस्पष्ट कल्पना असणारा हा नवा लेखक आम्हाला सापडल्याचा मला मनस्वी आनंद झाला. निकोलायना प्रकृतीस्वास्थ्य लाभावे या दृष्टीने 'मलादाया ग्वार्दिया'च्या संपादकांनी कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीशी संपर्क साधला आणि निकोलाय अस्त्रोवस्की यांना सोची येथे पाठवावे अशी विनंती केली. १९३२ च्या उन्हाळ्यात त्यांची आई त्यांना घेऊन दक्षिणेत गेली. जाण्याच्या आदल्या दिवशी त्यांनी मला पुढील चिठ्ठी पाठवली.

''प्रिय कॉम्रेड आन्ना,

उद्या सकाळी १० वाजता आम्ही दक्षिणेकडे जायला निघत आहोत. माझी चढाई पुढे जोरदार व्हावी यासाठी अंगी ताकद यावी म्हणून सारे काही केले जात आहे. जेवढा टिकाव धरता येईल तेवढा धरीन.''

''माझी चढाई'' या त्यांच्या शब्दांचा अर्थ होता - 'पोलादाला चढले पाणी' कादंबरीच्या दुसऱ्या भागाचे लेखन. त्या काळात निकोलाय यांच्याकडून आलेली पत्रे मला सांगत होती की त्यांच्या 'चढाई'साठी आपल्या रक्ताची आणि मनस्तापाची किती प्रचंड किंमत मोजावी लागली होती. 'मला जगण्याची घाई झाली आहे.' 'लौकर लौकर लौकर मला जगलं पाहिजे.' या शब्दांतून केवळ या 'चढाई'चा जोर आणि ताण जाणवू शकत होता. एका पत्रात त्यांनी म्हटले होते -

''... गेले तीन महिने मी काय करत होतो असं तुम्ही विचारलंय. माझ्या साहित्यिक अभ्यासाच्या दृष्टीने राखलेला बराचसा वेळ मी स्थानिक तरुण मंडळींसाठी वापरला. एकाकी लांडग्यामधून माझं आनंदी पुढाऱ्यात रूपांतर झालंय. समितीची ब्युरो आता आपल्या सभा माझ्या घरात घेते. पक्षाच्या कार्यकर्ता मंडळाचा मी प्रमुख आहे आणि विभागीय सांस्कृतिक वर्धापन मंडळाचा अध्यक्ष आहे. थोडक्यात म्हणजे मी उपयुक्त माणूस बनलोय. मला खूप श्रम खर्ची घालावे लागतात हे खरं आहे, पण मग त्यामुळं जगण्याला आणखी गंमत येते. मी एक साहित्य मंडळ स्थापन केलंय. पक्षाच्या आणि कम्सामोलच्या समित्या माझ्या कामात खूप रस दाखवतात. पक्षाचे कार्यकर्ते वारंवार माझ्या घरी जमा होतात. मला जीवनाचं स्पंदन जाणवतं.''

त्यांच्या कादंबरीची लोकप्रियता वेगाने वाढत होती आणि स्थानिक वाचनालयांमध्ये किंवा पुस्तकांच्या दुकानांमध्ये कादंबरीची प्रत मिळत नाही अशा तक्रारी अस्त्रोवस्कींकडे वाढत्या प्रमाणात येत होत्या.

१९३४ मध्ये त्यांनी मला लिहिले होते - ''तुम्हाला खरे सांगायचं तर अगदी आत्तासुद्धा माझ्या भेटीला येणाऱ्या अनेक लोकांपेक्षा मी खूपच सुखी जीवन जगतो आहे. केवळ कुतुहलापोटी त्यांच्यातले बरेचसे मला भेटायला येतात. मला त्यांचं आश्चर्य वाटत नाही. त्यांची शरीरं निरोगी आहेत, पण ते कमालीचे रटाळ, निर्जीव आयुष्य जगतात. आपल्या डोळ्यांनी ते पाहू शकतात, पण त्यांची नजर कंटाळलेली, बेफिकीर असावी असं मला वाटतं. कदाचित ते माझी कीव करत असावेत आणि विचार करत असावेत, ''परमेश्वरा, या माणसासारखं जिणं मला कधी देऊ नकोस बाबा!'' पण मला ती एवढी बापुडवाणी माणसं वाटतात की, शप्पथ, त्यांच्याशी आयुष्याची अदलाबदल करायला मी कधीही तयार व्हायचा नाही.'' एवढ्या बोलक्या ओळींना पुस्ती जोडायची काही गरज आहे का?

मित्र कितीही रागवले तरी कुणाचेही काहीही न ऐकता, दररोज पंधरा तास निकोलाय काम करीत असत. त्यांना भेटायला असंख्य माणसे येत, ते अगदी कमी झोप घेत आणि अंगातली ताकद उधळून टाकीत.

अखेर ज्याची आम्हा सर्वांना भीती वाटत होती ते घडले. १९३५ च्या ऑगस्टमध्ये त्यांच्या प्रकृतीत अचानक बिघाड झाला.

''कितीही धोका असला तरी अर्थातच यावेळीसुद्धा मी मरणार नाही. 'Born of the Storm - तुफानातून जन्मलेला' हे पुस्तक मला लिहिलंच पाहिजे. एवढंच नाही तर माझ्या काळजातला सारा उत्साह मला त्यात ओतला पाहिजे. 'पोलादाला चढले पाणी'ची पटकथा तसंच कोर्चागिनच्या लहानपणाचं वर्णन करणारं एक पुस्तक मला लहान मुलांसाठी लिहायचंय. पावेलच्या सुखाची कहाणी सांगणारं हे पुस्तक मला लिहिलंच पाहिजे. यासाठी मला पाच वर्ष खूप मेहनत केली पाहिजे. मला किमान पाच वर्ष तरी जगलंच पाहिजे.''

नोव्हेंबरात ते मॉस्को येथे आले. त्यांच्या कामाचा दिवस संपल्यावर एका संध्याकाळी मी त्यांना भेटायला गेले. सैन्यात देण्यात येणाऱ्या कपड्याचा नेहमीचा सदरा निकोलाय यांच्या अंगात होता. ते थकलेले दिसत होते. त्या दिवशी ते किती तासपर्यंत मजकूर सांगत होते याची मी विचारणा केली.

''फार नाही. मुळीच जास्त नाही.'' त्यांनी सांगायला सुरूवात केली आणि एकदम खरे बोलून टाकले. ''जवळ जवळ दहा तास . तुम्हाला हे मान्य नाही, हे मला समजतंय. पण कामासाठी मी अगदी भुकेला होतो. माझी उपासमार झाली होती. अगदी खरं सांगतो, प्रेमिकांना एकमेकांची जेवढी ओढ वाटत नसेल त्यापेक्षा अधिक मला कामाची ओढ वाटते आणि कामानंतर माणसाची मन:स्थिती कशी होते ते तुम्हाला ठाऊकच आहे. माझा चिटणीस निघून गेल्यानंतर मी पुढच्या प्रसंगाचा विचार करू लागलो आणि तो इतक्या ठळकपणे माझ्या नजरेसमोर उभा राहिला की तिथल्या तिथं मी सबंध प्रसंग घडाघडा सांगितला असता. अशा क्षणी माझ्यासारखा सुखी माणूस या जगात दुसरा कुणी नसतो. काही झालं तरी मी सुदैवी आहे की नाही? सुदैवी तर खराच, पण किती!''

निकोलाय किती प्रचंड काम करतात याची त्यांच्या ओळखीच्या प्रत्येकाला माहिती होती. त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या आठवड्यात मी मॉस्कोत नव्हते हे खरोखरीच माझे दुर्दैव. त्या अखेरच्या दिवसात कामाचा किती विलक्षण ताण त्यांनी सोसला त्याची हकीकत त्यांच्या चिटणीसांनी मला सांगितली. त्यांचे चिटणीस आळीपाळीने, दोन किंवा तीन पाळ्यांमध्ये काम करीत होते. आणि निकोलाय अखंडपणे मजकूर सांगत होते. 'तुफानातून जन्मलेला' या आपल्या कादंबरीचा पहिला भाग पुरा करण्यासाठी ते नेटाने रेटा लावीत होते. डिसेंबरच्या मध्यास ते पुस्तक पूर्ण करण्याचे त्यांनी कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीला वचन दिले होते. ते वचन त्यांनी पाळले.

संरक्षण खात्याच्या जन मंत्रालयाकडून त्यांना लष्करी सेवेचे कार्ड मिळाले तेव्हा त्यांना किती मनस्वी आनंद झाला होता, त्याची मला आठवण आहे.

''पाहिलंत, मी अजून लढवय्यांच्या रांगेत आहे.!' ते उद्गारले होते.

त्यांना चांगले ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जेव्हा जेव्हा यांची आठवण होईल तेव्हा तेव्हा कधीही भरून न येणारी हानी झाल्याची कडवट भावना तिला नेहमी जाणवेल. आपल्या काळजाचा एक तुकडा कुणीतरी पिळवटून तोडतोय अशी वेदना अनुभवील. अर्थात काळ वेदना बोथट करील पण दु:ख मात्र तेवढेच गहिरे राहील.

निकोलाय अस्त्रोवस्कींना विसरणे अशक्य आहे. त्यांचे मित्र आणि त्यांचे वाचक त्यांना कधीही विसरणार नाहीत. समाजसत्तावादाच्या उद्दिष्टासाठी लढणाऱ्या धैर्याचे आणि निष्ठेचे मूर्तिमंत प्रतीक बनलेली त्यांची प्रतिमा आमच्या स्मरणातून कधीही पुसली जाणार नाही. त्यांचे व्यक्तित्व विलक्षण आल्हाददायी व निखळ होते

– आन्ना कारावायेवा *(निकोलाय यांच्याबद्दलच्या आठवणींमधून)*

भाग : १

प्रकरण पहिले

''ईस्टरच्या सणापूर्वी परीक्षा द्यायला माझ्या घरी तुमच्यापैकी जे आले होते ते उभे रहा!'' समोरचा वर्ग न्याहाळत फादर वासिली कडाडले.

आपल्या जागेवरून उठून उभ्या राहिलेल्या आणि पायघोळ अंगरख्यातील गलेलठ्ठ फादरकडे धास्तावल्या नजरेने पाहणाऱ्या सहा मुलांवर त्या पाद्र्या*ने आपले बारीक कठोर डोळे रोखले. ''तुम्ही खाली बसा,'' मुलींना खूण करीत पाद्रीबाबा म्हणाले.

सुटकेचा निश्वास टाकत मुली घाईघाईने खाली बसल्या. फादर वासिली यांचे पिचके डोळे इतर चौघांवर खिळले.

''माझ्या शहाण्या बाळांनो, इकडं या बघू!'' फादर वासिली उठले. आपली खुर्ची त्यांनी मागे ढकलली. आणि एकमेकांशेजारी दाटीवाटीने उभ्या राहिलेल्या त्या चार मुलांजवळ ते गेले. ''तुमच्यापैकी कोण तंबाखू ओढतं?''

''फादर, आम्ही तंबाखू पीत नाही,'' चौघांनी घाबरट आवाजात उत्तर दिले.

पाद्रीबाबांचा चेहरा संतापाने लालबुंद झाला. ''डांबीस पोरांनो, तुम्ही तंबाखू ओढत नाही काय? मग माझ्या पिठात तंबाखू कोणी मिसळली? सांगा! तुमचे खिसे उलटे करा बघू! चला, उलटे करा तुमचे खिसे!''

आपल्या खिशांतील वस्तू टेबलावर काढून ठेवण्यासाठी तीन मुले पुढे झाली. त्या मुलांच्या खिशांच्या शिवणींची पाद्रीबाबांनी बारकाईने पाहणी केली. तंबाखूचे कण तेथे अडकले आहेत की काय याची खात्री करून घेतली. पण तसे काही आढळले नाही. मग करड्या रंगाचा सदरा व गुडघ्यांवर ठिगळे लावलेली निळी विजार घातलेल्या गडद डोळ्यांच्या चौथ्या मुलाकडे वळले. ''एखाद्या बाहुल्यासारखा तिथं उभा काय राहिलायस?''

प्रश्न करणाऱ्याकडे त्या मुलाने एक तिरस्काराचा कटाक्ष फेकला. ''मला खिसेच नाहीत.'' आपल्या विजारीच्या दोन्ही बाजूंना हात फिरवत वाकडे तोंड करून तो उत्तरला.

''खिसे नाहीत काय? माझ्या पिठाची नासाडी करण्याचा हलकटपणा कोणी केला ते मला माहीत नाही असं वाटतंय काय तुला? तुला मी सोडून देईन असं वाटलं काय? नाही बेटा. मागच्या वेळी तुझ्या आईनं विनवणी केली म्हणून मी तुला या शाळेत राहू दिलं. आता मी तुला पुरा विटलोय. चालता हो!''

त्यांनी त्या मुलाचा कान जोराने पिरगाळला आणि त्याला बाहेर व्हरांड्यात ढकलून देऊन धाडदिशी वर्गाचे दार लावून घेतले.

---

*पाद्री - ख्रिश्चन धर्मगुरूस आदराने फादर संबोधतात.

सगळा वर्ग घाबरून गप्प बसला. पावेलला वर्गातून का हाकलून लावले होते ते सर्गेई ब्रुझाक या पावेलच्या अगदी जवळच्या मित्राशिवाय कुणाही मुलाला समजले नव्हते. अभ्यासात मागे पडलेली सहा मुले जेव्हा परीक्षा देण्यासाठी पाद्रीबाबाच्या स्वयंपाकघरात वाट पाहात उभी होती, तेव्हा ईस्टरच्या केकच्या पिठात मूठभर घरगुती तंबाखू पावेलने मिसळलेली त्याने पाहिली होती.

आता पावेल शाळेच्या इमारतीच्या अगदी खालच्या पायरीवर बसला होता. काय घडले ते आईला कसे सांगावे याचा कमालीच्या निराशेने विचार करत होता. बिचारी त्याची आई! एका जकात तपासनीस अधिकाराच्या घरी स्वयंपाकीण म्हणून दिवसभर राबत होती.

त्याला रडे दाटून आले. ''काय करू मी? त्या हलकट पाद्र्यामुळे हे सगळं घडलं! त्यांच्या पिठात कशाला मी तंबाखू मिसळली?''

फादर वासिलीबरोबरचे त्याचे वैर फार दिवसांचे होते. मिश्काबरोबर त्याचे भांडण जुंपले होते. म्हणून त्याला जेवण देण्यात आले नाही. रिकाम्या वर्गात त्याने काही वात्रटपणा करू नये म्हणून मास्तरांनी त्याला दुसरीच्या वर्गातल्या धड्याला मागच्या बाकावर बसवले होते.

काळ्या कोटातले सुरकुतल्या चेहऱ्याचे छोटुकले मास्तर पृथ्वी आणि ग्रहताऱ्यांसंबंधी माहिती सांगत होते. पृथ्वी कोट्यवधी वर्षे अस्तित्वात होती आणि तारे पृथ्वीसारखेच आहेत हे जेव्हा त्यांच्या तोंडून पावेलने ऐकले तेव्हा आश्चर्याने चकित होऊन त्याने आ वासला होता. जे काही त्याने ऐकले होते त्यामुळे त्याला एवढा धक्का बसला होता की, 'बायबलमध्ये असं म्हटलं नाही'* असे ओरडण्याचा मोह त्याने मोठ्या कष्टाने आवरला होता. तसे करण्याने आपल्यावर आणखीनच आफत कोसळेल अशी त्याला भीती वाटत होती.

बायबल या विषयात पाद्रीबाबाने पावेलला नेहमी सगळेच्या सगळे गुण दिले होते. पावेलला प्रार्थनेचे अख्खे पुस्तक तोंडपाठ होते, आठवड्याच्या प्रत्येक दिवशी परमेश्वराने काय निर्माण केले त्याची नेमकी माहिती त्याला होती. आता पडलेले कोडे त्याने फादर वासिली यांच्यासमोर मांडायचे ठरवले.

''फादर, दुसरीचे मास्तर म्हणतात की पृथ्वी कोटी कोटी वर्षांची आहे, पण बायबलमध्ये तर म्हटलंय की, ती पाच हजार...'' फादर घोगऱ्या आवाजात त्याच्यावर एकदम एवढ्या जोरात खेकसले की, त्याचे बोलणे अर्ध्यावरच थांबले.

''गाढवा, काय म्हणालास? असा बायबलचा अभ्यास करतोय होय?''

---

* बायबल या ख्रिश्चनांच्या धर्मग्रंथाप्रमाणे ४४०४ वर्षापूर्वी इश्वराने पृथ्वी निर्माण केली व पृथ्वीवरील असंख्य जीवजाती सात दिवसात ईश्वरानेच निर्माण केल्या. याहून वेगळी-शास्त्रीय मांडणे करणे हे निषिद्ध - महान पाप मानले जाई. पुराव्यासह सत्यस्थिती मांडल्याबद्दल चर्चने अनेक शास्त्रज्ञांचा छळही केला.

काय होते हे कळायच्या आतच पाद्रीबाबांनी पावेलचा कान खेचला आणि दणादणा त्याचे डोके भिंतीवर आपटले. भीतीने आणि वेदनांनी थरथर कापणाऱ्या पावेलला काही मिनिटांनंतर आपण बाहेर व्हरांड्यात पडल्याचे आढळून आले. त्याची आईसुद्धा त्यावेळी त्याला सपाटून रागावली होती.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाऊन पावेलला परत वर्गात घेण्याची तिने फादर वासिलींपाशी विनवणी केली होती. त्या दिवसापासून पावेल पाद्र्याचा मनोमन द्वेष करीत होता. त्याला त्याचा तिटकारा वाटत होता. आणि भीतीही वाटत होती. कोणत्याही अन्यायाविरुद्ध मग तो कितीही लहान असला तरी, त्याचे बालमन बंड करून उठत होते. निष्कारण मारल्याबद्दल पाद्र्याला तो क्षमा करू शकत नव्हता. तो दुर्मुखला आणि कडवट बनला.

त्यानंतर अनेक बारीकसारीक गोष्टींवरून पावेलने फादर वासिलींच्या हातचा मार खाल्ला होता. पाद्रीबाबा सतत त्याला वर्गाबाहेर हाकलून लावीत. छोट्या छोट्या कारणांसाठी दिवसांमागून दिवस अनेक आठवडेपर्यंत ते त्याला कोपऱ्यात उभा करीत. प्रश्नांची उत्तरे द्यायला त्याला ते कधी सांगानासे झाले. परिणामी ईस्टर सणाच्या सुटीच्या आधी अभ्यासात मागासलेल्या मुलांबरोबर पुन्हा परीक्षा देण्यासाठी पावेलला पाद्र्याच्या घरी जावे लागले. तिथे स्वयंपाकघरात त्याने पिठात तंबाखू मिसळली होती.

ते करताना त्याला कुणी पाहिले नव्हते पण तो कुणाचा कारभार असावा याबद्दल पाद्रीबाबांनी तात्काळ तर्क केला होता. शेवटी एकदाचा तास संपला आणि गंभीरपणे मुकाट बसून राहिलेल्या मुलांनी पावेलभोवती आवारात कोंडाळे केले.

शिक्षकांच्या खोलीच्या उघड्या खिडकीतून शाळेच्या हेडमास्तरांनी मुंडके बाहेर काढले आणि ते ओरडले, ''कोर्चागिनला ताबडतोब माझ्याकडे पाठवून द्या.'' हेडमास्तरांच्या त्या जाड खर्जातल्या आवाजासरशी पावेलने दचकून उडी मारली आणि धडधडत्या काळजाने त्याने त्यांची आज्ञा पाळली.

रेल्वेस्टेशनवरील रेस्टॉरंटच्या मध्यम वयाच्या, फिकट चेहऱ्याच्या, निर्जीव डोळ्यांच्या मालकाने पावेलकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला आणि विचारले, ''काय वयाचा आहेस?

''बारा.''

''ठीक आहे. राहू दे त्याला इथं. महिन्याला त्याला आठ रुबल मिळतील आणि ज्या दिवशी काम करेल तेव्हा जेवायला. दर दिवसाआड सलग चोवीस तासपर्यंत काम करावं लागेल. पण लक्षात ठेव, चोरीलबाडी चालणार नाही.''

''नाही साहेब तो चोरी करणार नाही. तो नीट वागेल.'' धास्तावून घाईघाईने आईने

मालकाला खात्री दिली.

''मग जा आत आणि कामाला लाग आताच'' मालकाने हुकूम सोडला आणि काउंटरमागच्या बाईकडे वळून तो म्हणाला, ''झीना, या पोराला भटारखान्यात घेऊन जा आणि फ्रोस्याला काम शिकवायला सांग.''

डुकराच्या मांसाच्या चकत्या कापता कापता झीनाने पावेलला मानेने खुणावले व सुरी खाली ठेवून ती धुण्याभांड्याच्या खोलीकडे जाणाऱ्या बाजूच्या दाराकडे वळली. पावेलही पाठोपाठ निघाला. तेव्हा त्याच्या आईने त्याच्या पाठीमागे जात कानात हळूच सांगितले, ''पावलुस्का, बेटा, मन लावून काम कर. स्वत:ला कमीपणा येईल असे वागू नको.''

पाठमोऱ्या पावेलकडे तिने खिन्न नजरेने पाहिले आणि ती तिथून बाहेर पडली.

धुण्याभांड्याच्या त्या खोलीत काम मोठे जोरात चालले होते. टेबलावर बशांचा, काटे व सुऱ्या यांचा प्रचंड ढीग पडला होता आणि खांद्यावर फडकी टाकलेल्या अनेक बायका बशा पुसण्याचे काम करीत होत्या.

एका उकळत्या पाण्याच्या भल्या मोठ्या घंघाळात बशा विसळल्या जात होत्या. पाण्यातून निघणाऱ्या वाफांच्या लोटांनी सारी खोली भरून गेली होती व त्यामुळे पावेलला प्रथम त्या बायकांचे चेहरेही स्पष्टपणे दिसले नाहीत. झीना, फ्रोस्याला म्हणाली, ''फ्रोस्या, या नव्या पोराला मी घेऊन आलेय. काय करायचं ते त्याला सांग.''

भुवईवर साचलेला घाम पुशीत फ्रोस्यानें पावेलला नीट न्याहाळले. तिला तो आवडला. मग कोपरावर सुटलेली बाही तिने गुंडाळून वर घेतली व मधुर आवाजात म्हणाली, ''बाळा तसं काही फार काम नाही. तो तांब्याचा बंब सकाळीच तापवायचा म्हणजे सगळा वेळ पाणी उकळत राहील. शिवाय सर्पणाला लाकडं फोडली पाहिजेत व समोवारची* काळजी घेतली पाहिजे. काहीवेळा तुला काटे-सुऱ्या साफ कराव्या लागतील व सांडपाणी काढावं लागेल.''

तिच्या बोलण्याची वेगळी ढब आणि अपऱ्या नाकाचा लालबुंद झालेला चेहरा पाहून पावेलला जरा बरे वाटले. वाफेच्या लाटेमुळे पावेलच्या लक्षात आले नव्हते पण फ्रोस्या अगदी तरुण मुलगी होती. तिने त्याच्या हातात बशा पुसायचा फडका दिला. ''हे घे. एक टोक तुझ्या दातात पकड आणि दुसरं टोक गच्च ओढून धर. हा काटा घे आणि फडक्याच्या खालून वरून घासून काढ. काट्यांच्या मधल्या भागात घाण अडकून राहाणार नाही याची काळजी घे. इथं फार कडक आहे. गिऱ्हाईकही काटे तपासून बघतात. जरा घाण दिसली की गोंधळ माजवतात. मग मालकीण तुझी ताबडतोब हकालपट्टी करील.''

---

* समोवार - पाणी उकळते ठेवण्याची सोय असलेले खास पात्र.

तेवढ्यात एक रुंद खांद्याचा, चकण्या डोळ्यांचा आणि सणसणीत आडव्या तोंडाचा वेटर आत आला.

पावेलच्या खांद्यावर त्याने आपला भलाभक्कम पंजा रोवला आणि त्याला समोवारकडे ढकलत नेत तो म्हणाला, ''ऐक पोरा, समोवार सगळा वेळ उकळत ठेवणं हे तुझं काम आहे आणि हे बघ, त्यातला एक भाता पुरता विझलाय, दुसरा जेमतेम पेटतोय. पुन्हा असं होऊ देऊ नको नाहीतर तुझा भुगा करीन.''

एकही शब्द न बोलता पावेलने समोवार तापवण्याची खटपट सुरू केली.

अशा रीतीने पावेलचे कष्टकरी आयुष्य सुरू झाले. एवढे खडतर श्रम त्याने पूर्वी कधीही केले नव्हते. आपल्या घरी आईची अवज्ञा तो करू शकला असता. पण हे घर नव्हे याची त्याला पक्की जाणीव होती.

सबंध रात्र उभ्याने काम करून पार शिणलेल्या पावेलने दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या जागी काम करायला आलेल्या मुलाच्या हाती उकळते समोवार सोपववून घरी निघाला तो खरीखुरी विश्रांती घेण्याचा आज आपला हक्क आहे अशा भावनेने. आता तो सुद्धा कामगार होता. बांडगुळासारखा ऐतखाऊ जगतोय असा आरोप त्याच्यावर कुणी करू शकले नसते.

तो घरी पोहोचला तेव्हा आईने त्याला अधिऱ्या स्वरात विचारले, ''कसं काय बाबा?''

''झकास'', पावेल उत्तरला.

तेवढ्यात त्याला आपल्या मोठ्या भावाचे - आर्त्योमचे दर्शन झाले. आणि तो चिंतेच्या स्वरात उद्गारला, ''आर्त्योम आलाय?''

''हां आणि आता तो इथेच राहाणाराय आणि रेल्वे यार्डात काम करणाराय.''

काहीशा गोंधळलेल्या मन:स्थितीतच पावेलने पुढचे दार उघडले. आर्त्योमची त्याला प्रचंड भीती वाटत असे.

पावेलने घरात प्रवेश करताच पाठमोऱ्या आर्त्योमने आपला प्रचंड देह वळवला. त्याच्या दाट काळ्या भुवयांखालचे डोळे कठोर दिसत होते.

''अरे वा, तंबाखुवाले चिरंजीव आले का? कसं काय घडलं?''

पुढच्या बसणाऱ्या माराची पावेलला भीती वाटू लागली.

म्हणजे आर्त्योमला सारं समजलं तर! त्यानं विचार केला मग नंतर चहा पिताना त्यानं शाळेबद्दल आर्त्योमला जे काही घडले होते ते सर्व सांगून टाकले.

''मोठेपणी असा उडाणटप्पू निघालास तर कसं होईल तुझं?'' आई खिन्नपणे म्हणाली. ''काय करावं या मुलाचं? याच्यापासून किती मन:स्ताप झालाय मला!'' तिनं तक्रार केली.

आर्त्योमने आपला कप बाजूला ठेवला आणि तो गंभीरपणे बोलू लागला, ''हे बघ, जे झालं ते झालं. आता यापुढे तरी काळजी घे आणि माकडचेष्टा न करता आपलं काम व्यवस्थित कर. आधीच तू आईला भरपूर त्रास दिला आहेस. आता हे सारं थांबव. वर्षभर तिथं काम केलंस तर यार्डात उमेदवार म्हणून तुला काम मिळवून देण्याचा प्रयत्न करीन. पावेल, आता यापुढं पुरुषासारखा वाग.''

तो उभा राहिला तेव्हा त्याच्या धिप्पाड आकृतीपुढे सारे काही थिटे भासू लागले. खुर्चीवर लोंबकळणारा कोट त्याने अंगात चढवला आणि आईला सांगून तो बाहेर पडला. जाताना त्यानं पावेलसाठी आणलेला बुटाचा जोड आणि एक चाकू आईजवळ देऊन ठेवल्याचे सांगितले, तेव्हा पावेल आनंदाने नाचू लागला.

स्टेशनवरच्या रेस्टॉरंटमध्ये पावेलने दोन वर्षे काम केले. त्या दोन वर्षात धुण्याभांड्याची खोली आणि भटारखाना यांच्याशिवाय त्याने दुसरे काहीही पाहिले नाही.

या दोन वर्षांत पावेल अधिक उंच आणि थोराड दिसू लागला होता. अनेक बिकट प्रसंग त्याच्यावर गुदरले होते. अनेकांनी त्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला. खरे तर पावेलच्या बंडखोर, रागीट स्वभावामुळे त्याची नोकरी त्याने कधीच गमावली असती. पण अफाट कष्ट करण्याच्या त्याच्या गुणामुळे तो टिकून राहिला. इतर कुणाहीपेक्षा तो अधिक काम करायचा आणि कधीही दमलेला दिसायचा नाही.

तिथले वातावरण मात्र त्याला कधीच आवडले नाही. रात्रीच्यावेळी रेस्टॉरंटच्या दोन्ही दालनातील गर्दी ओसरली म्हणजे खालच्या भटारखान्याच्या कोठीच्या खोलीत सारे वेटर जमायचे आणि पत्यांचे बेफाम डाव सुरू व्हायचे. टेबलांवरील पैशांचे मोठमोठे ढीग पावेलला दिसायचे. दारू आणि जुगारात सारा पैसा उधळणाऱ्या त्या वेटरांबद्दल पावेलला तिरस्कार वाटत असे. त्याच्या दृष्टीने मालकांइतकेच ते परके व वैरी होते.

जीवनाबद्दल कुतूहल असणाऱ्या पावेलला जीवनाच्या अगदी खालच्या तळाचे दर्शन घडले. तिथली कुबट, बुरसटलेली दुर्गंधी, तिथल्या दलदलीतल्या घाणीचा वास त्याच्यापर्यंत येऊन पोचला. रात्रीच्या वेळी भटारखान्याच्या किंवा कोठीच्या अंधाऱ्या कोपऱ्यात जे काही चालत असे त्याचाही आता त्याच्यावर परिणाम होईनासा झाला. शरीरविक्रय केल्याशिवाय एकाही भांडी धुणारीला किंवा सेविकेला आपली नोकरी टिकवता येत नाही, हे सुद्धा आता माहीत झाले होते. त्याची तिथली एकमेव आवडती मैत्रीण फ्रोस्या ही देखील या क्रूर वागणुकीला बळी पडल्याचे पाहून तर त्याला भयंकर एकाकी आणि रिते वाटू लागले. भोवतालच्या सर्व गोष्टींविषयी त्याला जबरदस्त घृणा वाटू लागली. 'अंगात

बळ असतं तर या साऱ्यांना पिटून काढलं असतं. मी अजून मोठ्ठा आणि शक्तीवान का झालो नाही?' त्याच्या मनात येत असे. दिवसेंदिवस त्याला तिथे काम करणे अशक्य वाटू लागले.

थोड्याच दिवसांत कल्पनेपेक्षा वेगळ्याच प्रकारे त्याने ती नोकरी सोडली.

जानेवारीतल्या कडाक्याच्या थंडीतला तो दिवस होता. पावेलने त्याची कामाची पाळी पुरी केली होती आणि तो घरी जायच्या तयारीत होता. परंतु तोपर्यंत त्याला कामातून मोकळे करणारा मुलगा आलाच नव्हता. पावेलने मालकिणीकडे जाऊन परिस्थिती सांगितली. तेव्हा ती त्याला घरी सोडेना. अख्खा दिवस आणि अख्खी रात्र काम केल्याने पावेल कमालीचा थकला होता. पण काम पुढे चालू ठेवण्याविना त्याच्यापुढे पर्याय नव्हता. संध्याकाळी तर तो अतिश्रमांमुळे कोसळायच्या बेतात होता. रात्रीच्या वेळात त्याला पाण्याचे बंब भरून तीन वाजताच्या आगगाडीसाठी पाणी उकळून ठेवणे भाग होते. त्याने नळाची तोटी उघडली पण पाणी येईना. ती तशीच उघडी ठेवून तो शेजारच्या लाकडाच्या ढिगावर थोडासा लवंडला. पण त्याला एवढे विलक्षण श्रम झाले होते की, तात्काळ त्याला झोपेने घेरले.

काही मिनिटांनंतर नळामधून घरघराट आणि फुसफुसाट झाला व बंबात पाणी पडू लागले. बंब भरून पाणी वाहू लागले. आणि त्या घटकेला चिटपाखरू नसलेल्या धुण्याभांड्याच्या खोलीच्या फरशीवरून पाण्याचे ओघळ वाहू लागले. पाणी हळूहळू दाराच्या फटीतून पलीकडच्या रेस्टॉरंटमध्ये झिरपू लागले.

घोरणाऱ्या प्रवाशांच्या पिशवीखाली आणि गाठोड्यांखाली पाण्याची थारोळी साचली. शेवटी एका प्रवाशाच्या अंगाखाली पाणी गेले तेव्हा त्याने दचकून उडी मारली व तो ओरडू लागला. मग सारेच प्रवासी उठले. एकच दंगा माजला.

पाण्याचा लोंढा अजून वाहातच होता. दुसऱ्या दालनात टेबले साफ करत असलेला प्रोखोस्का गोंधळ ऐकून धावत आला. पाण्याच्या ओहोळांमधून उड्या मारत त्याने दारापाशी येऊन जोरदार धक्का मारला त्यासरशी दारामागील पाण्याचा जोरदार लोट दालनात घुसला. ओरडा आणखीनच वाढला. प्रोखोस्काने झोपलेल्या पावेलवर झडप घातली.

त्याच्यावर बुक्क्यांचा वर्षाव झाला. पण त्याला काय घडले ते उमजेना. तो अर्धवट झोपेत होता. डोक्यावरच्या प्रहारामुळे त्याच्या डोळ्यांसमोर काजवे मात्र चमकत होते. आणि शरीरातून असंख्य कळा येत होत्या.

कसाबसा खुरडत तो आपल्या घरापर्यंत गेला.

'प्रोखोस्का वेटर मला कुठे भेटेल?' बशा विसळणाऱ्या ग्लाशाला आर्त्योमने विचारले.

'आता येईलच तो इथं.' ती उत्तरली.

दाराच्या खांबाला आपले भव्य शरीर टेकवून आर्त्योम उभा राहीला. 'ठीक आहे, मी थांबतो.'

ट्रेवरील बशांचा डोंगर पेलत लाथेने दार उघडून येणाऱ्या प्रोखोस्काला आपल्या भक्कम पंजाची पकड घालून त्याने करड्या आवाजात विचारले, 'पावेलला, माझ्या भावाला तू कशासाठी मारलंस?''

प्रोखोस्कोला काही करता आले नाही. दोन गुद्द्यांत तो पालथा पडला.

आर्त्योम जसा आला तसा निघून गेला. त्या संध्याकाळी आर्त्योम घरी आला नाही. त्याला पोलिसांनी पकडून नेल्याचे आईला समजले. सहा दिवसांनंतर तो घरी परतला. तेव्हा त्याने पावेलला वीज केंद्रात काम लावले.

अती हळूवारपणे त्याच्या शेजारी बसून त्याने पावेलला सांगितले, ''काही काळजी करू नकोस. त्यांना बोलून ठेवलंय मी. तिथं तुला खरं कसबी काम शिकायला मिळेल.''

उचंबळून आलेल्या भावना आवरत पावेलने आर्त्योमचे दोन्ही हात गच्च पकडले. आजवर कठोर वाटणाऱ्या आर्त्योमचे वेगळेच रूप त्याला पाहायला मिळाले.

◆◆◆◆

प्रकरण दुसरे

'झारला उलथून टाकलं[1]' शेपेतावकामध्ये एखाद्या वावटळीसारखी बातमी पसरली. नागरिकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता.

मग एका वादळी हिवाळी दिवशी स्टेशनात एक आगगाडी आली. लष्करी, मोठ्या कोटातले, खांद्यावर रायफली अडकवलेले दोन विद्यार्थी आणि दंडाला तांबड्या फिती बांधलेली क्रांतिकारक सैनिकांची एक तुकडी फलाटावर उतरली. त्यांनी स्टेशनवरच्या रक्षकांना, एका म्हाताऱ्या कर्नलला व ठाणबंद सेनेच्या प्रमुखाला अटक केले. आता मात्र गावकऱ्यांचा बातमीवर विश्वास बसला. बर्फभरल्या रस्त्यांवरून हजारो लोकांची शहरातल्या चौकाकडे रीघ लागली.

स्वातंत्र्य, समता, बंधुता हे शब्द त्यांनी प्रथमच ऐकले आणि त्या शब्दांनी ते भारल्यासारखे झाले.

त्यानंतरचे काही दिवस वातावरण एकदम उत्तेजक बनले होते. उत्सव साजरा होत होता. मग एक प्रकारची शांतता पसरली. टाऊन हॉलवर फडकणारा लाल झेंडा हीच तेवढी

१. फेब्रुवारी १९१७ मध्ये लोकलढ्यातून रशियन सम्राटाला - झारला पदच्यूत करण्यात आले.

झालेल्या स्थित्यंतराची आठवण देणारी एकमेव खूण होती. मेन्शेविकांनी[२] आणि बुंद[३]च्या अनुयायांनी टाऊन हॉलमध्ये ठाण मांडले होते. बाकी सर्व काही पूर्वीप्रमाणेच राहिले होते.

हिवाळ्याच्या अखेरीस घोडदळाच्या एका पलटणीने शहरात मुक्काम ठोकला. सकाळच्या प्रहरी ते गटागटाने फेरफटक्याला बाहेर पडत आणि आघाडीवरून पळून आलेल्या सैनिकांचा शोध घेत. हे भले मोठ्ठे, धिप्पाड बांध्याचे आणि गुबगुबीत चेहऱ्यांचे सैनिक होते. त्यांचे बहुतेक अधिकारी उमराव किंवा जहागिरदार होते. त्यांचा वेष थेट झारच्या काळातलाच होता. जगाच्या दृष्टीने जणू क्रांती घडलीच नव्हती.

सन १९७७ नोव्हेंबरच्या दरम्यान काहीतरी वेगळे घडायला लागले. नव्या प्रकारची माणसे स्टेशनावर उतरली आणि वातावरण हलू लागले. त्यांच्यात युद्ध आघाडीवरचे सैनिक जास्त होते आणि 'बोल्शेविक'[४] असे काहीसे नवेच नाव त्यांनी घेतले होते.

हे दुमदुमणारे, वजनदार नाव कुठून आले त्याची कुणालाच माहिती नव्हती.

१९१८ च्या वसंतातला एक दिवस. पावेलच्या बागेत गवतावर लोळण घेऊन हुंदडणाऱ्या पावेल, सेर्गेई आणि क्लिम्का या पोरांना घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला व एक घोडेस्वार रस्त्यावरून दौडत येत असलेला त्यांनी पाहिला. त्या घोडेस्वाराने या पोरांच्या दिशेने चाबूक हलवून त्यांना जवळ बोलावले. ''पोरांनो इकडे या.''

पावेल आणि क्लीम्का टुणकन उडी मारून उठले व कुंपणाकडे धावले. घोडेस्वार संपूर्ण धुळीने माखला होता. डोक्यावर, टोपीवर, खाकी सदऱ्यावर आणि तुमानीवर धुळीचा जाड थर बसला होता. त्याच्या भक्कम सैनिकी कमरपट्ट्यातून एक पिस्तुल व दोन जर्मन हातबॉंब लटकत होते.

''पोरांनो मला प्यायला पाणी देता?'' त्याने विचारले.

पावेलने सुसाट पळत जाऊन घरातून पाणी आणले. घोडेस्वाराने विचारले, 'तुमच्या गावात प्रमुख कोण आहे सांग.''

सर्गेईने एका दमात सर्व स्थानिक बातम्या त्या नवागताला सांगितल्या. ''दोन आठवडे गावात प्रमुख कुणीच नाही. होमगार्डचं आता नवं सरकार आहे. रात्रीच्या वेळी गावचे लोकच

२. क्रांतिकारी पक्षातला उजवा गट. हा संधीसाधू बनून प्रतिगामी झाला.

३. ज्यू सोशल डेमोक्रॅट

४. १९१७ साली ऑक्टोबरमध्ये बोल्शेविक या क्रांतिकारी पक्षाच्या नेतृत्वाखाली रशियामध्ये क्रांती होऊन बोल्शेविक (कम्युनिस्ट) पक्षा सत्तेवर आला. पण यादवी युद्ध व परकीय आक्रमण चालूच राहिल्याने परिस्थिती युद्धजन्यच राहिली.

आळीपाळीने गस्त घालण्याचे काम करतात. तुम्ही कोण आहात हो?''

''अरे, एवढ्या चौकशा करू नकोस नाहीतर लौकर म्हातारा होशील.''

घोडेस्वाराने पावेलने आणलेले पाणी घटाघटा प्यायले, लागाम खेचून त्याने टाच मारली व देवदारच्या जंगलाकडे निघून गेला. तो कोण होता या प्रश्नाचे उत्तर शोधत बसलेल्या त्या तिघांना हमरस्त्यावर टापांचा खडखडाट ऐकू आला. सुमारे पंधरा घोडेस्वारांची तुकडी खोगीरांवर रायफली आडव्या टाकून येत होती. त्या घोडेस्वारांच्या पुढे खाकी जाकीट, अधिकाऱ्याचा पट्टा व गळ्यात दुर्बिण अडकवलेला एक वयस्क माणूस होता. आणि त्याच्या शेजारीच मघाचा घोडेस्वार. वयस्क माणसाने छातीवर लाल फीत[५] बांधली होती.

''काय सांगितलं होतं मी तुला? ती लाल फीत बघ. ते नक्की गनिमी सैनिक आहेत.'' सर्गेई पावेलच्या कुशीत ढुशी देत म्हणाला.

घोडेस्वार जेव्हा खूप जवळ आले तेव्हा आधी भेटलेल्या माणसाने ओळखीचे हास्य केले व चाबूक लेश्चीनस्कीच्या घराकडे दाखवीत विचारले, ''तिथं कोण रहातं?''

''लेश्चीनस्की वकील... ते काल पळाले... बहुतेक तुम्हाला घाबरून...''

''आम्ही कोण हे तुला कसं कळलं?'' स्मितहास्य करत वयस्क माणसाने विचारलं.

'त्यात काय अवघड?'' पावेलने त्याच्या फितीकडे बोट दाखवीत म्हटले, ''कुणीही सांगू शकेल.''

शहरात प्रवेश करणाऱ्या तुकडीकडे उत्सुकतेने पाहात लोकांनी गर्दी केली. धुळीने माखलेल्या त्या घोडेस्वारांनी लेश्चीनस्कीच्या घरात मुक्काम ठोकला.

लेश्चीनस्कीच्या प्रशस्त दिवाणखान्यात मेजाभोवती चार माणसे बसली होती. वयस्क, तुकडीचे प्रमुख असलेले, कॉम्रेड बुल्गाकोव यांनी जिल्ह्याचा नकाशा मेजावर पसरला होता व त्यावरून ते बोट फिरवत होते. 'आपण इथं थांबून झुंज द्यावी असे तुम्ही म्हणता कॉम्रेड येरमचन्को. पण मला वाटतं सकाळी आपण इथून चालू लागावं. आपल्या माणसांना विश्रांतीची गरज आहे. जर्मन इथं पोचण्यापूर्वी काझातीनपर्यंत माघार घेणं ही आपली जबाबदारी आहे. आपल्याजवळच्या सामर्थ्यानिशी प्रतिकार करणं मूर्खपणाचं ठरेल. दारुगोळ्याच्या तीस फैरी असलेली एक तोफ, दोनशे पायदळ सैनिक व साठ घोडेस्वार. शिवाय कॉम्रेडस्, जर्मनांशिवाय वाटेत असंख्य प्रतिक्रांतिकारक टोळ्यांबरोबर आपल्याला दोन हात करावे लागणार आहेत. तेव्हा, स्टेशनपलीकडचा पूल प्रथम उडवून मग आपण

५. लाल झेंडा, लाल फीत हे बोल्शेविकांचे चिन्ह. लाल सेना हे त्यांचे सैन्य.

माघार घ्यावी. तो दुरुस्त करायला जर्मनांना दोन-तीन दिवस तरी लागतील. तोपर्यंत त्यांची वाटचाल रोखली जाईल.

येरमचेन्के यांना मात्र पळत राहायचा अगदी वीट आला होता. इथेच त्यांच्याशी दोन हात करावेसे त्यांना वाटत होते. परंतु बुल्गाकोव यांनी त्यांना समजावले. शेवटी खलाशी झुखराय यांनी मागे राहून इतरांनी पुढे जावे असे ठरले. कारण झुखराय इथलेच रहिवासी होते. हे एक आणि ते फिटर-मेकॅनिक असल्याने त्यांना स्टेशनात काम मिळू शकणार होते. यानंतर झारच्या वेळच्या लढाईतून मागे राहिलेल्या वीस हजार रायफलींच्या साठ्याबाबत त्यांनी ठरवले की त्या कामगारांना वाटून टाकाव्या म्हणजे जर्मनांशी लढायला त्यांना त्या उपयोगी पडतील.

दुसऱ्या दिवशी पावेल वीजकेंद्रावरून परत येत असताना वातावरण काही वेगळेच झाल्याचे त्याला जाणवले. सारे शहर उत्तेजित झाले होते. रस्त्याने माणसे प्रत्येकी एक, दोन किंवा तीन तीन रायफली घेऊन जाताना पाहून तो चक्रावला. तो धावत निघाला.

संगीन जोडलेली एक अवजड पायदळी रायफल फरफटत नेणारा एक मुलगा त्याने पाहिला व त्याला थांबवले. ''ही तुला कुठं मिळाली?''

''शाळेसमोर गनिमी सैनिक रात्रभर वाटत होते. पण आता तिथं काही शिल्लक नाही. ही माझी दुसरी.'' तो फुशारकीनं म्हणाला.

हे ऐकून पावेल निराश झाला. पण एकदम त्याच्या डोक्यात एक कल्पना सुचली. दोन-तीन ढांगात त्याने त्या पोराला गाठले व त्याच्या हातातली रायफल हिसकावून घेतली. ''तुला एक पुरेशी आहे.'' तो अशा आवाजात म्हणाला की कोणताही विरोध त्याला मान्य नव्हता असे जाणवावे.

पावेल खुश होऊन उड्या मारत घरी आला. कुंपणावर चढून तो पडवीत गेला. छपराखालच्या तुळयांवर त्याने आपली लूट ठेवली व शीळ घालत तो घरात शिरला.

युक्रेनमधली उन्हाळ्यातली सायंकाळ फार सुंदर असते. विशेषत: शेपेतोवकासारख्या छोट्या शहरातली सायंकाळ फारच मनोहर असते. फुलांच्या घमघमाटाने हवा धुंद आणि तरल बनलेली असते. आकाशात खोल पोकळीत चांदण्या अंधुक लुकलुकताहेत आणि आवाजाचे पडसाद दूरदूर ऐकू येत आहेत....

---

* वोल्गा नदीवरील बोटी दोराने खेचून किनाऱ्याला लावणारे लोक.

पावेलच्या घराबाहेरच्या लाकडाच्या ओंडक्यावर तरुणांचा आनंदी घोळका जमला होता आणि त्यांच्या आनंदाला उधाण आले होते. मित्रांच्या आग्रहावरून पावेल ॲकॉर्डियनवर एक प्रसिद्ध गाणे वाजवत होता.

*सारे सारे बुर्तार्की** *आपल्या खोपटात जमले*
तिथं वाटतय छान *तिथं वाटतय गोड*
काळजातल्या दु:खाला गायले...

गालोच्का आणि सारेच मित्र मैत्रिणी या आवडीच्या सुरांवर गाऊ लागले आणि सारेच वातावरण सुरांनी भरून गेले.

'पावका' आर्त्योमची हाक आली.

पावेलने ॲकॉर्डियनचा भाता आवळला आणि त्यावर पट्टे बांधले. ''मला घरी बोलावताहेत, गेलं पाहिजे.''

आणखी थोडावेळ थांबण्याचा मित्रांचा आग्रह मोडून पावेल घरात गेला. खोलीत आर्त्योमशिवाय त्याचा मित्र रोमान आणि एक अनोळखी माणूस होता. आर्त्योमने त्यांच्याशी पावेलची ओळख करून दिली. ''हे बघ, पावका,'' आर्त्योम म्हणाला. ''वीज केंद्रात इलेक्ट्रीशियन आजारी आहे असं तू म्हणला होतास. त्याच्या जागी त्यांना नवा माणूस पाहिजे असेल तर उद्या चौकशी कर आणि...'' अनोळखी माणसाने त्याला मध्येच अडवले, ''त्यापेक्षा मी याच्याबरोबर जाऊन मालकाशी स्वत:च बोलेन.''

''मग ठरलं तर. उद्या आपण बरोबरच तिथं जाऊ.''

पावेलची नजर त्या अनोळखी माणसाच्या शांत राखी रंगाच्या डोळ्यांना भिडली. त्याने राखी रंगाचे जाकीट घातले होते. त्याच्या रुंद भक्कम पाठीवर त्याची शिवण ताणली गेली होती. त्याचे डोके आणि खांदे बैलासारख्या पिळदार मानेने जोडलेले होते.

''बरं आहे झुखराय. तुम्हाला यश लाभो!'' दारापर्यंत त्यांना पोचवत आर्त्योम म्हणाला.

बोल्शेविकांची तुकडी शेपेतोवकातून निघून गेल्यानंतर तीन दिवसांनी जर्मनांचा** शहरात प्रवेश झाला.

एखाद्या उसळलेल्या मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे शहर गजबजले होते. जर्मन येणार याची नगरवासीयांना जाणीव होतीच. आपल्या घरासमोरच्या बागांच्या कुंपणाआड आणि लहानग्या फाटकामागे ते उभे होतेच. रस्त्यात जायची त्यांना भीती वाटत होती.

** फेब्रुवारी ते नोव्हेंबर १९१८ या काळात युक्रेन प्रांतावर जर्मनांचा अंमल होता.

हमरस्त्याच्या दोन्ही कडांना रांगेने संचलन करीत जर्मन आले. हिरवट भुरकट रंगाचे गणवेश घातलेले, हातातल्या रायफली सज्ज ठेवलेले. त्यांच्या रायफलींच्या टोकांना रुंद सुऱ्यासारख्या संगिनी होत्या. त्यांनी अवजड पोलादी शिरस्त्राणं घातली होती व त्यांच्या पाठीवर प्रचंड आकाराची बोचकी होती. स्टेशनपासून शहरापर्यंत त्यांचा अखंड ओघ लागला होता. ते अत्यंत सावधपणे येत होते. प्रतिकार करण्याच्या तयारीत ते होते पण त्यांच्यावर हल्ला चढवण्याचे कुणाच्या ध्यानीमनीसुद्धा नव्हते.

युक्रेनी कोटातला हेल्मन केमिस्टच्या दुकानाच्या व्हरांड्यात चढून उभा राहिला आणि कमांड्ंट मेजर कोर्फ यांचे हुकूम त्याने मोठ्यांदा वाचून दाखवले.

'सर्व नागरिकांना हुकूम करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या ताब्यातील बंदुका अगर इतर शस्त्रे चोवीस तासाच्या आत आणून हजर करावीत. या हुकुमाचा भंग करणाऱ्यास गोळी घालून ठार मारण्यात येईल.'

– मेजर कोर्फ, शहराचे कमांडंट.

गोळी घातली जाईल या दहशतीने घाबरलेले नागरिक अख्खा दिवसभर शस्त्रे परत आणून देत होती. मोठी माणसे स्वत: न येता तरुणांमार्फत आणि लहान मुलांमार्फत शस्त्रे पाठवीत होती. काहीनी रात्रीच्या वेळी आपली शस्त्रे रस्त्याच्या कडेला फेकून दिली. सकाळी जर्मन गस्तवाल्यांनी ती एकत्र गोळा करून लष्करी गाडीत भरली.

दुपारी एक वाजता जेव्हा दिलेली वेळ मर्यादा संपली तेव्हा जर्मन सैनिकांनी आपल्या लुटीच्या मालाची मोजदाद सुरू केली. चौदा हजार. याचा अर्थ सहा हजार रायफली परत करण्यात आल्या नव्हत्या. त्याच्या धसमुसळ्या शोधातून फारशी निष्पत्ती झाली नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटे ज्या दोन रेलकामगारांच्या घरामध्ये लपवलेल्या रायफली सापडल्या त्यांना शहराबाहेर जुन्या यहुदी स्मशानाजवळ गोळ्या घालून ठार करण्यात आले.

कमांडंटचा हुकूम ऐकल्याक्षणीच आर्त्योम घाईघाईने घरी आला. त्याने पावेलच्या बखोटीला धरले व शांत परंतु खंबीर आवाजात विचारले, ''तू घरी काही शस्त्रं आणलीस?''

खरेतर पावेलला सांगायचे नव्हते. पण तो आपल्या भावाशी खोटे बोलू शकत नव्हता. तुळयांवर लपवून ठेवलेल्या ठिकाणामधून आर्त्योमने रायफल बाहेर काढली, बोल्ट आणि संगीन बाजूला काढले व नळीला धरून सगळ्या ताकदीनिशी कुंपणाच्या खांबाच्या दिशेने त्याने रायफल भिरकावून दिली. त्याने पावेलला समजावले, ''पावेल, तू काही आता कुक्कुलं बाळ नाहीस. बंदुकांशी खेळ खेळू नयेत हे तुला समजायला पाहिजे. असले खेळ पुन्हा करू नकोस.'' पावेलने त्याला तसे वचन दिले.

दरम्यान सर्गेई मात्र एका ओसाड पडवीत, भिंतीशेजारी खड्डा खणत होता. फाटक्या कपड्यामध्ये काळजीपूर्वक गुंडाळलेल्या तीन रायफली सर्गेईने त्या खड्ड्यात ठेवल्या. त्याने खड्डा बुजवला आणि त्यावर पुन्हा कचरा पसरला. सगळ्या उद्योगाकडे बारकाईने निरखून पाहिले आणि समाधान झाल्यावर कपाळावरचा घाम पुसला. ''आता खुशाल शोध घेऊ दे त्यांना.'' तो म्हणाला.

वीज केंद्रात काम करणारा नवा इलेक्ट्रीशियन झुखराय आणि पावेल यांच्यात दाट मैत्री जमली होती. या चुणचुणीत पोराचा झुखरायला लळा लागला.

सुटीच्या दिवशी झुखराय अनेकदा आर्त्योमच्या घरी जायचे तेव्हा पावेलची आई त्याच्या वांडपणाबद्दल तक्रारी करत असे.

''तुला मारामारी करायची फार हौस आहे असं आई म्हणत होती.'' स्मित करीत ते म्हणाले, ''खरं म्हणजे लढवय्या होण्यात काही वाईट नाही. पण कुणाशी आणि कशासाठी लढायचं हे मात्र माहीत पाहिजे.''

''मी उगाचच कधी मारामारी करत नाही,'' पावेलने उत्तर दिले. ''योग्य आणि चांगल्या गोष्टीसाठीच मी नेहमी लढतो.''

''योग्य रीतीनं लढायला शिकवू तुला?'' झुखरायनं अचानक प्रश्न केला.

''योग्य रीतीनं? म्हणजे काय?'' चकीत होऊन पावेलने विचारले.

त्यावर झुखरायनी मुष्टीयुद्धाबाबत एक छोटे व्याख्यानच त्याला ऐकवले. पावेलला काही ते चटकन आत्मसात करता आले नाही.

पुन्हा पुन्हा तो जमिनीवर आडवा कोसळायचा. झुखरायच्या मुठीच्या प्रहारासरशी त्याच्या पायाखालची जमीन निसटायची. पण तो निष्ठेने आणि चिकाटीने शिकत राहीला. अखेरीस त्याने ती कला अवगत केलीच.

त्या उबदार दुपारी दुसरे खास काम नसल्याने पावेल आपल्या आवडत्या जागेवर चढून बसण्यासाठी घरामागच्या बागेच्या कोपऱ्यातल्या छपराकडे गेला. छपरावर चढून चेरीच्या झाडाच्या दाट फांद्या बाजूला करीत तो छपराच्या मध्यभागी जाऊन ऊन खाण्यासाठी आडवा पडला.

छपरीची एक बाजू लेश्चीनस्कीच्या बागेत घुसली होती. तिथून घराची एक बाजू दिसत होती. त्या घरात मुक्काम केलेल्या जर्मन लेफ्टनंटचा नोकर आपल्या मालकाचे कपडे ब्रशने

स्वच्छ करत होता. लेफ्टनंट मेजाशी बसून काहीतरी लिहीत होता. नंतर कागद उचलून तो खोलीबाहेर आला. नोकरापाशी तो कागद देऊन फाटकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून चालत निघून गेला.

पावेल या सगळ्या हालचाली निरखीत होता. आता नोकर खोलीत प्रवेश करत होता. त्याने गणवेश टांगला. खोलीची बागेकडची खिडकी उघडली. व खोली साफ केली. मग तो बाहेर आला व पाठीशी त्याने दरवाजा लावून घेतला.

उघड्या खिडकीतून पावेलला खोलीतल्या साऱ्या वस्तू स्पष्ट दिसत होत्या. मेजावर एक पट्टा व चकाकणारी वस्तू पडली होती. एक सुरेख बाराबारी 'मानलिशर' पिस्तुल चामडी पिशवीत होते. पावेलने श्वास रोखला. काही क्षण तो घुटमळला. दुसऱ्याच क्षणी अविचारी धाडसाने तो झटकन खिडकीतून खोलीत घुसला. चामडी पिशवी उचलून आतले नवेकोरे निळे पोलादी पिस्तुल बाहेर काढले व बाहेर जमिनीवर उडी घेतली. नोकर मोतद्दाराशी गप्पा मारत होता. तो कुणाला नकळत बाहेर निसटला. जंगलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उतरला. जंगलात ओस पडलेल्या विटांच्या भट्टीत सारे शांत होते. फुटक्या विटांचे ढीग तिथे पडले होत. गवताचे रान माजले होते. इथे पावेल व त्याचे दोन मित्र सोडले तर कुणीच फिरकत नसे.

एका भट्टीच्या मधल्या फटीतून तो आत चढला. फडक्यात गुंडाळलेले पिस्तुल त्याने भट्टीच्या तळाशी एका कोपऱ्यात ठेवले त्यावर जुन्या विटांचा छोटा पिरॅमिड रचून झाकले. तो घराच्या दिशेने परत निघाला तेव्हा त्याला गुडघे थरथर कापत असल्याचे जाणवले. तो घरी जाण्याचे टाळून वीज केंद्रावर गेला व कामाला लागला. तेव्हा 'काय घडेल' या विचाराने त्याला धडधडत होते.

रात्री झुखराय आले व त्याला बाहेर बोलावून त्याने विचारले, ''आज तुझ्या घराची झडती कशासाठी घेतली?''

पावेल दचकला. ''झडती?''

''म्हणजे ते काय शोधताहेत याची खरंच तुला कल्पना नाही?''

पावेलला चांगलीच कल्पना होती. पण पिस्तुल चोरल्याचे सांगण्याचा धोका पत्करायला तो तयार नव्हता.

पिस्तुल चोरीला गेल्याचे लक्षात आल्यावर लेफ्टनंटच्या घरात एकच कल्लोळ माजला. पिस्तुल कोणी चोरले असेल याचा विचार करताना विक्तरने गुंड पावेलने चोरी केली असावी अशी शंका बोलून दाखवली. त्यामुळे त्याने ताबडतोब झडतीचा आदेश दिला. पण शोध अपयशी ठरला. पावेलला समजले की कधी कधी असे धोकेबाज उद्योगही यशस्वी होतात.

◆◆◆◆

प्रकरण तिसरे

तोन्या सुटीसाठी आपल्या घरी वडिलांकडे आली होती. ती कीएफ्मध्ये सहावीत शिकत होती आणि तिकडे जाऊन तिला आता वर्ष झाले होते.

उघड्या खिडकीपाशी उभी राहून वाऱ्याच्या लहरींबरोबर किंचित थरथरणाऱ्या उंचनिंच चिनारकडे विचारमग्न होऊन ती पाहात होती.

तिने एक कादंबरी उचलली, व्हरांड्याकडे जाणारा दरवाजा उघडला आणि पायऱ्या उतरून बागेत आली. फाटक उघडून ती स्टेशनजवळच्या तळ्याकडे सावकाश निघाली.

पाण्यावर आडव्या पडलेल्या गळाची छडी पाहून ती थबकली. वाकलेल्या वाळुंजीच्या बांध्यावर ओणवून तिने फांद्या दूर केल्या तेव्हा उन्हाने रापलेल्या चेहऱ्याचा एक अनवाणी मुलगा विजार गुडघ्यापर्यंत गुंडाळून घेऊन उभा असलेला तिने पाहिला. त्याच्या शेजारच्या गंजक्या डब्यात गांडुळे होती.

''इथं मासे सापडतील असं वाटतं तुम्हाला?''

पावेलने मान मागे फिरवून एक रागीट कटाक्ष टाकला. निळ्या कॉलरचा पांढरा स्वच्छ पोलका व फिकट राखी रंगाचा आखूड स्कर्ट आणि पायात पांढरे मोजे घातलेली एक मुलगी वाळुंजीच्या झाडाला धरून पाण्यात डोकावून पाहात होती.

तेवढ्यात गळाची छडी धरलेल्या हाताला एक नाजूकसा हिसका बसला. पिसाच्या काडीने पाण्यात डुबकी मारली आणि तलम पाण्यावर वाटोळ्या लहरी उमटल्या.

''अरे !बघा मासा लागला.'' उत्तेजित होत तोन्या म्हणाली.

तेवढ्याने त्याची समाधी भंगली आणि एवढ्या जोराने गळाला हिसका मारला की वळवळणाऱ्या गांडुळासकट आकडा चक्क पाण्याबाहेर येऊन आपटला.

''आता काय मासा मिळतोय? छ्या! कशाला ही कारटी इथं कडमडली !'' पावेल मनात संतापला होता. आणि आपला बावळटपणा लपवण्यासाठी त्याने अधिक लांब गळ फेकला. पण तो नेमका दोन काटेरी झुडुपांमध्ये अडकून बसला.

तो अधिकच चिडून तिच्यावर फुत्कारला, ''गप्प राहता येत नाही का? अशानं सगळे मासे पळवून लावाल.''

वरून आवाज आला, ''तुम्हाला बघून मासे केव्हाच पळून गेलेत. आणि दुपारच्या वेळी कुणी शहाणा मासे धरायला जातो का कधी?''

पावेलने सभ्यपणे वागण्याची पराकाष्ठा केली होती. पण आता मात्र हे फारच झाले.

''हे बघा, तुम्ही बऱ्या बोलानं इथून निघून जा पाहू!''

''माझा खरंच त्रास होताय का तुम्हाला?'' तिच्या आवाजातला खवचटपणा जाऊन मैत्रीचा सूर उमटला. त्यामुळे पावेलला उद्धटपणे बोलता येईना.

नेमक्या त्याचवेळी सातवीत शिकणारी दोन मुले पुलावरून येत होती. त्यांच्यापैकी एक होता रेल्वेयार्डचे प्रमुख अभियंते सुखार्को यांचा मुलगा. शुंभासारख्या त्या मुलाचे नाव होते शूरका. त्याच्या सोबतीला लंबू, बायकी वागणारा वित्तर होता. त्यांच्या हातात गळाची छडी आणि तोंडात सिगरेट खुपसलेली होती. तोन्याला बघून ते तिच्याविषयी बकबक करू लागले.

''ही पोरगी मोठी फक्कड पाखरू आहे. हिचे वडील मुख्य वनरक्षक आहेत. माझी बहीण लिझा हिला ओळखते. एकदा मी तिला भावुक पत्र लिहिलं तर तिनं 'अशी पत्र लिहिण्यात कागदाची नासाडी करू नको' म्हणून सांगितले. पण सुरुवातीला हे असंच असतं. या बाबतीत मी पक्का अनुभवी आहे....''

वित्तरने सुखार्कोला मध्येच अडवून विचारले, ''या पाखराची ओळख करून देतोस?'' दोघेजण तोन्यापाशी आले, आदबीने झुकून सुखार्कोने तिला अभिवादन केले, ''नमस्ते मॅडमॉझेल. तुम्ही मासे धरायला आलात?''

''नाही, नुसती पाहातेय.''

''पण तुम्ही मासे का पकडत नाही?''

''नको. उगीच मधे कशाला यायचं? तिथं कुणीतरी आधीच मासे धरतंय.'' तोन्या म्हणाली.

यावर झुडुपाखाली बसलेल्या पावेलकडे त्यांचे लक्ष गेले.

''तो होय, त्याला दोन दणक्यात बाजूला करतो.'' असे म्हणून सुखार्को पावेलपर्यंत पोहोचला. तोन्या काही बोलण्यापूर्वीच त्याने पावेलला दरडावले.

''तुझा गळ खेच आणि इथून चालता हो.'' पावेलने मान नुसती वर करून त्याच्याकडे एक कटाक्ष फेकला.

''चूप बैस, समजतोस कोण स्वत:ला?''

सुखार्कोने गांडुळाच्या डबड्यावर जोराने लाथ मारली. डबा हवेत उडाला व तळ्यात पडला. पाण्याचे तुषार बाहेर उडाले.

पावेल ताडकन उठून उभा राहिला. सुखार्को हा रेल्वे यार्डाच्या प्रमुखाचा मुलगा आहे, हे त्याला माहीत होते. या बुद्दुला बडवले तर आर्त्योमला त्रास होईल या विचाराने त्याने तो मोह आवरला.

पण सुखार्कोने आधीच त्याच्या छातीत बुक्का मारला. पाण्याच्या काठाशी उभा असलेला पावेल पाण्यात पडता पडता सावरला आणि मग मात्र विजेच्या चपळाईने त्याने सुखार्कोच्या

तोंडावर ठोसा हाणला. त्याच्या आणखी एका ठोशाबरोबर सुखार्कोचे दात वाजले आणि दातात जीभ सापडून तो जोराने किंचाळला व पाण्यात उताणा पडला. किनाऱ्यावर तोन्याची हसून हसून मुरकुंडी वळली.

''शाब्बास भली खोड जिरवली,'' ती टाळ्या पिटत म्हणाली.

स्टेशनवरचे वातावरण खदखदत होते. रेलमार्गावरचे कामगार आपली हत्यारे खाली ठेवणार अशी कुणकुण होती. शेजारच्या मोठ्या स्टेशनमधील कामगारांनी काहीतरी चळवळ सुरू केली होती. घोषणापत्रके बाळगण्याच्या आरोपावरून दोघा इंजिन ड्रायव्हरना अटक केली होती. खेड्यांशी संबंध असलेल्या कामगारांमध्येही गंभीर स्वरूपाची खळबळ माजली होती. कारण लष्करी वापरासाठी जमिनी जप्त केल्या जात होत्या व जमिनदार आपल्या इस्टेटीकडे परतले होते.

हेल्मनांच्या रक्षकांच्या आसूडांचे वळ शेतकऱ्यांच्या पाठीवर उमटत होते. जिल्ह्यामध्ये गनिमी चळवळ आकार घेत होती.

झुखरायनी शेपेतोवकामधील मुक्कामात खूप काही साध्य केले होते. अनेक रेलकामगारांशी ओळख करून घेतली होती. मेकॅनिकांचे आणि लाकूड गिरणीतल्या कामगारांचे भक्कम गट बांधले होते. आर्त्योमचे मन जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता.

''या पक्षांबद्दल मला फारशी काही माहिती नाही झुखराय. पण मदतीची गरज असेल तर तू खात्रीनं माझ्यावर अवलंबू शकतोस'', त्याने उत्तर दिले होते. झुखरायचे समाधान झाले होते कारण तो आपोआपच शिकेल अशी खात्री त्यांना होती. त्यांनी वीजकेंद्रातली नोकरी सोडून रेलयार्डात ते रूजू झाले होते.

एक दिवस हेल्मन रक्षकांनी स्टेशनवरच्या तारमास्तरला अटक केली. त्याला बेदम मारहाण करण्यात आली. काम चालू असताना स्टेशनप्रमुख रोमानचा शोध घेत आले. त्याच्या जवळ येऊन आपल्या चाबकाच्या फटकाऱ्याने त्याने रोमानचे तोंड फोडले.

शेजारीच काम करत असलेल्या आर्त्योमने हातातली कानस खाली टाकली. त्याचा धिप्पाड देह आक्रमक पावित्र्यात उभा राहीला. ''अक्करमाशा, त्याला हात लावशील तर याद राख.'' आपला वाढता राग आवरत आर्त्योम घोगऱ्या आवाजात म्हणाला.

रोमान आणि आर्त्योम दोघांनाही अटक करण्यात आली. रोमानला सामानाच्या खोलीत तळघरात बंद करून ठेवण्यात आले.

ही बातमी पसरल्याच्या दहाव्या मिनिटापासून एकही कामगार काम करीनासा झाला. रेलयार्डातले कामगार स्टेशनच्या बागेत जमा झाले. स्विचमेन आणि पुरवठा करणाऱ्या

गुदामातले कामगारही त्यांना येऊन मिळाले. रोमान आणि स्टेशन तारमास्तर यांच्या सुटकेची लेखी मागणी करणारा आराखडा कुणी तरी तयार केला.

पिस्तुल रोखून आरडाओरडा करणारा उपप्रमुख बागेत घुसला तेव्हा संतापलेल्या कामगारांनी जोरदार गर्जनेने त्याला प्रत्युत्तर दिले.

रात्रीच्या वेळी अटकसत्र चालू झाले. आर्त्योमला पुन्हा अटक झाली.

सबंध लोहमार्गावरचे जवळजवळ सर्व कामगार संपावर गेले. एक दिवस आणि एक रात्र एकही आगगाडी हलली नाही. झुखरायच्या कामाचा परिणाम जाणवू लागला होता. स्टेशनवरील सर्व कामगार प्रथमच सामूहिक कृतीमध्ये उतरले होते.

रात्रीच्या वेळी जर्मन शिपायांनी भरलेली एक आगगाडी स्टेशनात आली. पण इंजिन ड्रायव्हर, त्याचा मदतनीस आणि फायरमन पसार झाल्यामुळे ती अडकून पडली. स्टेशनच्या साईडिंगला आणखी दोन आगगाड्या निघण्याची वाट पहात होत्या.

कैदी ठेवलेल्या गोदामाची प्रचंड अवजड दारे सताड उघडण्यात आली. स्टेशनप्रमुख, जर्मन लेफ्टनंट व इतर जर्मनांचा एक गट आत आले आणि हुकूम सुटला. ''कोर्चागिन, पलितोवस्की आणि ब्रुझाक - तुम्ही इंजिन चालवायचं. आत्ताच्या आत्ता आगगाडी घेऊन जायची. जर नकार दिलात तर जागच्याजागी गोळ्या घालून ठार करण्यात येईल.''

तिघांनीही दुर्मुखलेपणाने होकार दिला.

इंजिनने रागाने डरकाळी फोडली आणि ठिणग्यांचा फवारा उडवला. आर्त्योमने भट्टीत कोळसे भरले. लाथ मारून दरवाजा बंद केला आणि म्हातारा इंजिन ड्रायव्हर पलितोवस्कीकडे वळून तो म्हणाला, ''मग उस्ताद, आपण आगगाडी घेऊन जायची का?''

''पाठीला संगीन लावल्यावर झक्कत नेली पाहिजे.''

ब्रुझाक हळूच पुटपुटला, ''आपण हे सगळं टाकून पळून जाऊ शकू.''

''मलाही तसंच वाटतं. पण हा डोमकावळा आपल्या पाठीशी बसलाय.'' आर्त्योम गुरगुरत म्हणाला.

''आपण काही आगगाडी शेवटपर्यंत नेणार नाही समजलास? पुढं लढाई चालू आहे. आपल्या लोकांनी रूळ उडवून लावलेत आणि त्यांना गोळ्या घालून मारलं जावं म्हणून या डुकरांना तिथपर्यंत घेऊन जायचं? तसं झालं तर जन्माची काळोखी लागेल तोंडाला.''

तिघांनाही ते पटत होते पण सैनिकाचे काय करायचे?

तांबड्या फितीची गवती टोपी घातलेला तो जर्मन सैनिक मागच्या बाजूला कोळशाच्या डब्यांच्या टोकाशी दोन्ही पायामध्ये रायफल घेऊन बसला होता आणि सिगार ओढत होता.

कोळशाच्या डब्यावर आर्त्योम चढला तेव्हा पहारेकऱ्याने त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. कोळशाच्या डब्याजवळचे दगडी कोळशाचे मोठे तुकडे घेण्याच्या बहाण्याने पलितोवस्कीने त्याला वाटेतून दूर होण्याची खूण केली. तो जर्मन ताबडतोब इंजिनच्या दाराच्या दिशेने निघाला तेव्हा पहारीच्या फटक्यासरशी जर्मन सैनिकाची कवटी फुटली आणि पलितोवस्की ओरडला, ''आता आपल्याला माघार घेता येणार नाही. वाफनियंत्रक लवकर सुट्टा करा.''

दहा मिनिटांच्या आत सारे काम पार पाडण्यात आले. ताबा नाहीसा झालेल्या इंजिनाचा वेग आता हळू हळू कमी होत होता.

''पोरा, टाक उडी.'' पलितोवस्कीच्या आवाजाबरोबर आर्त्योमने लोखंडी कठडा सोडला. आगगाडीच्या गतीमुळे तो पुढे फेकला गेला. ब्रुझाक नि पलितोवस्कीने इंजिनाच्या दोन्ही बाजूंनी एकाच वेळी उड्या टाकल्या.

•

ब्रुझाकच्या घरावर दु:खाची छाया पसरली. अन्तोनीना चार दिवस शोकाने झुरत होती. तिच्या नवऱ्याची काही बातमी नव्हती. आर्त्योम आणि पलितोवस्की यांच्याबरोबर इंजिन चालवायला त्याला जर्मनांनी भाग पाडले होते, एवढेच तिला माहीत होते. काल हेल्मनांचे रक्षक घरी येऊन उद्धट प्रश्न विचारून गेले होते. ते जाताच ती आर्त्योमच्या आईकडे - मरियाकडे निघाली.

पण मरियालाही काही माहिती नव्हती. पावेलला देखील आर्त्योमची काळजी वाटत होती. त्या भावांना आतून एकमेकांविषयी खूप प्रेम होते आणि दोघेही एकमेकांसाठी वाटेल तो त्याग करायला तयार होते.

संध्याकाळी झुखराय पावेलच्या घरी आले व त्यांनी सारा प्रकार मरियाला सांगितला आणि एका आडवळणाच्या खेड्यात ब्रुझाकच्या काकांच्या घरी तिघेही सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा आर्त्योमच्या आईचा जीव भांड्यात पडला.

एक दिवस झुखरायनी पलितोवस्कीच्या बायकोला भेटून तिला आपल्या जवळचे थोडे पैसे दिले. ''तुमच्या यजमानांनी पाठवलेत,'' त्यांनी सांगितले.

''आम्हाला फार गरज होती. मुलांना खायला काही नव्हतं.'' कृतज्ञतेने वृद्धेचे डोळे भरून आले.

स्टेशनकडे परतताना झुखराय स्वत:शीच म्हणाले, ''आता आग पेटली आहे, ती काही विझणार नाही. आणि हे तिघं तर भक्कम खरेखुरे कामगार आहेत.''

खाली अथांग पाण्याचे तळे पसरले होते. त्याच्या चारी बाजूंना वेढणारे देवदार आपली उंच डोकी डोलवीत होते. जुन्या दगडाच्या खाणीतील ही सरोवरे म्हणजे तोन्याचे आवडते एकांत स्थळ. विक्तरने दिलेले पुस्तक वाचण्यात ती दंग होती. एवढ्यात काहीतरी धप्पकन पडल्याचा आवाज ऐकून तिने मान उंचावली. सरोवरात पोहणाऱ्याची तांबूस पाठ आणि काळे केस तोन्याला ओझरते दिसले.

पुस्तकात ती पुन्हा गर्क झाली. तो अचानक पावेल तिच्याकडे उभा. ''मी तुम्हाला दचकवलं?'' खडकावर हात टेकवीत पावेल म्हणाला.

''मुळीच नाही. हवं तर आपण गप्पा मारू.''

पावेलने चकित होऊन तोन्याकडे पाहिले. ''कशावर गप्पा मारायच्या.'' पावेल अवघडून होता. पण असंख्य प्रश्न विचारून तोन्याने पावेलला बोलते केले. विक्तरने तिला पावेलविषयी सांगितले होते. त्यावरून पावेल हा एक मारामाऱ्या करणारा गुंड मुलगा आहे अशी तिची समजूत झाली होती. परंतु तिला तो एकीकडे आवडतही होता. पावेलने तिला आपल्या तुटलेल्या शिक्षणाविषयी, नंतरच्या नोकरीविषयी, भाऊ आणि आई यांच्याविषयी सांगितले, तेव्हा तोन्याच्या मनातले त्याच्याविषयीचे मळभ दूर झाले आणि दोघे जुनी ओळख असल्यासारखी मोकळेपणाने गप्पा मारू लागली. त्या दोघांची चांगली दोस्ती जमली. त्याचा निरोप घेऊन ती निघाली तेव्हा तिच्या मनात आले, 'किती तेजस्वी मुलगा आहे हा. किती हिंमत आहे याच्यात. इतर शाळकरी मुलांसारखा तो अचरट तर अजिबात नाही.'

पावेलची व तिची घडण पूर्णपणे वेगळी होती. तो खूप वेगळ्या वातावरणात वाढला होता याची तिला जाणीव होती. पण त्याला माणसाळता येईल असा विश्वास तिला वाटत होता.

त्याचवेळी स्वत:च्याही नकळत स्वत:चा ताबा घेणाऱ्या या विचित्र भावनेमुळे पावेलही अस्वस्थ झाला होता. तोन्याचे वडील वनरक्षक होते. त्यामुळे तोन्यादेखील त्याच्या दृष्टीने शुरका-विक्तरच्या वर्गातच मोडत होती.

पावेल लहानपणापासून गरिबीमध्ये अतिशय हलाखीच्या परिस्थितीत वाढला होता. त्याला श्रीमंत आणि सुस्थित अशा माणसांचा तिटकारा वाटत असे. त्यामुळे तोन्याबद्दलच्या त्याच्या भावनांभोवती भीती आणि गैरसमजुतीची झिरझिरीत झालर होती.

या भेटीनंतर जवळजवळ आठ दिवस त्याने तिला भेटायचे टाळले आणि नंतरही त्याला तिच्या घरी जाणे अवघड वाटत होते. परंतु तोन्याने जवळजवळ ओढतच त्याला घरी नेले. तिच्या खोलीतल्या कपाटातील हारीने लावलेली शेकडो पुस्तके पाहून पावेल हरखूनच गेला. पुस्तकांवर पावेलचे अतिशय प्रेम. पुस्तकांवर त्यांच्या मनसोक्त गप्पा झाल्या. तोन्याने त्याच्या केसांच्या जंगलाची चेष्टा केली आणि त्याच्या मळक्या सदऱ्याकडे आणि विटक्या

विजारीकडे नापसंतीचा कटाक्ष टकला तेव्हा पावेलला खंत वाटली.

आर्त्योम गेल्यापासून पावेलच्या घरची परिस्थिती फार बिकट झाली होती. त्याच्या आईने लेश्चीनस्कीकडे स्वयंपाकीण म्हणून काम करण्याचे ठरवले परंतु पावेलला ते पसंत नव्हते. त्यापेक्षा लाकूडगिरणीत जास्तीचे काम करण्याची त्याची तयारी होती. आणि दुसऱ्याच दिवशी तो त्या कामावर रूजू झालासुद्धा. ताजी कापलेली फळकुटे वाळवून साठवण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली होती.

दहाव्या दिवशी त्याच्या हातावर कमाई पडली तेव्हा त्याने आईला लाजत लाजतच सांगितले, ''बरं का गं आई, यातील थोड्या पैशातून माझ्यासाठी सॅटिनचा सदरा विकत घे. मी तुला आणखी पैसे मिळवून आणून देईन.''

दुसऱ्या दिवशी न्हाव्याच्या दुकानात जाऊन त्याने व्यवस्थित केस कापून घेतले आणि आपले राठ खुंट नाहीसे करून टाकले, तेव्हा कुठे त्याला आपण तोन्याला भेटायला लायक झालो असे वाटले.

तिच्या घराच्या उंबरठ्यावर तो उभा राहिला. तेव्हा त्याचा नूर इतका बदलला होता की, तोन्याने प्रथम त्याला ओळखलेच नाही. नंतर फिरायला गेल्यावर तोन्याने त्याला, ''मी तुला दुसऱ्या कुणाच्या हाती कधीच सोपवणार नाही'' असे वचन दिले.

◆◆◆◆

प्रकरण चौथे

घनघोर वर्ग लढ्यांनी युक्रेनला घेरले होते. अधिकाधिक माणसे शस्त्र हाती धरत होती आणि प्रत्येक संघर्षाबरोबर नवे लढवय्ये पुढे येत होते.

तोफांच्या धडधडाटाच्या हादऱ्यांनी छोटी मोडकळीला आलेली घरे थरथरत होती आणि सामान्य नागरिक आपल्या तळघराच्या भिंतीशी चिपकून बसत होते. किंवा परसातल्या खंदकात आडोशाला धावत होते.

सर्व छटांच्या आणि सर्व रंगांच्या पेत्ल्युरा टोळ्यांच्या झुंडींनी युक्रेनमध्ये थैमान घातले होते. गोलुब, अर्खांगेल, आन्गेल, गोर्दीयचा अशा असंख्य गुंडांचा सुळसुळाट झाला होता.

झारच्या सैन्यातले माजी अधिकारी, उजवे आणि डावे युक्रेनी समाजवादी-क्रांतिकारक* कुणीही क्रूरकर्मा स्वत:ला नेता म्हणून जाहीर करू लागला व त्याच्या त्याच्या ताकदीनुसार व संधीनुसार जो प्रदेश त्याच्या तावडीत येई त्यावर आपला अधिकार प्रस्थापित करू लागला.

---

* आतंकवादी पक्ष. या पक्षातील एका स्त्रीने लेनिनवर गोळी झाडून खून करण्याचा प्रयत्न १९१८ मध्ये केला.

खळबळत्या १९१९ सालच्या त्या एप्रिल महिन्यात प्रतिष्ठित नागरिक सुन्न आणि घाबरलेल्या अवस्थेत आपल्या खिडकीच्या झडपा सकाळच्या प्रहरी उघडायचे व आपल्या झोपेने जडावलेल्या डोळ्यांनी बाहेर डोकावून पहात शेजाऱ्याला धास्तावलेला प्रश्न विचारायचे, ''आज सत्तेवर कोण आहे माहीत आहे तुम्हाला.'' शेजारी सभोवार एक भित्रा दृष्टिक्षेप टाकायचे - ''काही सांगणं अवघड आहे बाबा. रात्रीच्यावेळी कुणीतरी गावात प्रवेश केला खरं. तो कोण ते आपल्याला लवकरच कळेल. त्यांनी यहुद्यांना लुटायला सुरुवात केली की ते पेत्ल्युराचे लोक आहेत हे समजायचं. जर ते कॉम्रेड असतील तर त्यांच्या बोलण्यावरून ते आपल्याला पटकन समजेल. कोणतं चित्र भिंतीवर टांगायचं ते कळावं म्हणून मी डोळ्यात तेल घालून बसलोय.'' आणि खिडक्या बंद करून ते लपून बसायचे.

कामगार मात्र पेत्ल्युरा ढंगाच्या पिवळ्या-निळ्या झेंड्याकडे तिरस्काराने बघत. त्यांचा दबलेला संताप खदखदत असे. मात्र त्यातूनच वाट काढणाऱ्या, पिवळ्या-निळ्या झेंडेवाल्यांविरुद्ध प्रखरतेने लढणाऱ्या लाल तुकड्या ओझरत्या दिसत तेव्हा त्यांच्या चित्तवृत्ती उल्हसित होत. कामगारांच्या अंत:करणाला अत्यंत प्रिय असे ते लाल निशाण टाऊन हॉलवर एखाद-दुसरा दिवस फडकत राही. पण नंतर ती तुकडी पुन्हा वाटचाल सुरू करी आणि पिवळ्या-निळ्या निशाणाच्या वेढ्यात गाव बुडून जाई.

शेपेतोवका आता कर्नल गोलुब यांच्या ताब्यात होते. दोन हजार खुनशी माणसांच्या त्याच्या टोळीने कालच गावात प्रवेश केला होता. कर्नल गोलुब तुकडीच्या अग्रभागी एका सुंदर काळ्या घोड्यावर आरूढ होऊन चालत होता.

या नवागतांच्या सन्मानासाठी गावातल्या नाट्यगृहात एक मोठा समारंभ आयोजित केला होता. गावातली काही प्रतिष्ठित मंडळी आणि गोलुबची माणसे तिथे हजर होती व वातावरण बेहोशीचे होते. सुरुवातीचे नाटक संपल्यानंतर नाट्यगृह मोकळे करून नाच सुरू झाला. पेत्ल्युरा अधिकारी गावातल्या तरुणींबरोबर बेभानपणे नाचत होते. नाट्यगृहाला जंगली धिंगाण्याचे स्वरूप प्राप्त झाले.

त्याचवेळी आतामन पावल्युक आणि त्याच्या तुकडीने तिथे प्रवेश केला आणि तेथील वाद्यवृंद चालकाला संगीत वाजवण्याची त्याने आज्ञा केली. संचालकाने त्या हुकुमाकडे लक्ष दिले नाही. पावल्युकच्या हाताची वेगाने हालचाल झाली आणि चाबकाचा सणसणीत फटकारा त्याच्या पाठीवर बसला.

आपल्या माणसावर हात टाकण्याची पावल्युकची हिंमत पाहून गोलुब चिडला. त्याने आदेश दिला, ''त्यांना बाहेर फेकून द्या आणि प्रत्येकाला पंचवीस फटके द्या.''

पावल्युक व त्याच्या माणसांवर शिकारी कुत्र्यांच्या झुंडीप्रमाणे अधिकारी तुटून पडले.

नाट्यगृहात मारामाऱ्या जुंपल्या.

काही मिनिटांच्या अवधीत पावल्युक आणि त्याचे साथीदार नि:शस्त्र बनले. त्यांना बेदम मारहाण करून, फरफटत नाट्यगृहाच्या बाहेर आणले व रस्त्यात फेकून दिले गेले.

समारंभाचा विरस झाला होता तरी गोलुबच्या आज्ञेनुसार तिथे थोडे नाच-गाणे झाले. पण आता त्यात जीव नव्हता.

थोड्याच वेळात पहारेकरी ओरडत आला, ''पावल्युकनं नाट्यगृहाला वेढा घातलाय.'' त्याचक्षणी खिडकीची काच फुटली आणि त्यातून मशिनगनची चपटी नळी आत घुसली. आत सैरावैरा पळणाऱ्या आकृत्यांना ती नळी भराभर टिपून काढत होती.

नंतर संबंध शहरभर चांगलीच लढाई जुंपली. रायफलींच्या अखंड कडकडाटाने रात्रीची शांतता पार भंगली. मशिनगनच्या फैरीही झडत होत्या. स्तंभित झालेले नागरिक बिछान्यातून उड्या मारून उठले होते व खिडक्यांच्या तावदानांना चेहरे चिकटवून बाहेरचा कानोसा घेत होते. क्षितिजावर उषेची आभा पसरली तेव्हाच लढाई थंडावली.

'पग्रोम*' होणार असल्याच्या अफवा शहरातून हळूहळू पसरत यहुद्यांच्या छोट्या, बुटक्या छपरांच्या झोपड्यांपर्यंत पोहोचल्या होत्या. नदीकडे जाणाऱ्या गलीच्छ घळीच्या टोकावर वेड्या वाकड्या खिडक्यांच्या घरांची ती वस्ती कशीबशी ओठंगून उभी होती. त्या छोट्या खोपटांमध्ये गरीब यहुदी दाटीवाटीने राहात होते.

सेर्गेई एक वर्षभर ज्या छापखान्यात काम करत होता तेथील जुळारी व इतर कामगार यहुदी होते. सेर्गेई आणि त्यांच्यामध्ये मैत्रीचे घट्ट बंध निर्माण झाले होते. त्यांच्यात एखाद्या कुटुंबाप्रमाणे एकी होती व आपल्या शिष्ट गुबगुबीत मालकाविरुद्ध ते मिळून लढा देत होते. मालक कामगारांना जास्तीतजास्त पिळून घेऊन त्यांना कमीतकमी मोबदला देत असे.

आज काहीतरी अस्वस्थता असल्याचे सेर्गेईला जाणवले.

एका जुळाऱ्याने सेर्गेईला कोपऱ्यात बोलावले. ''पग्रोम होणार आहे हे माहीत आहे तुला?'' सेर्गेई चकित होऊन पाहू लागला. ''यहुद्यांना खूप मारझोड करणार आहेत म्हणे. तू आम्हाला या संकटात मदत करणार ना?''

''अर्थात, मी काय करू सांगा'' बाकीचे जुळारीही आता तेथे जमले.

''सेर्गेई, तू फार चांगला मुलगा आहेस. तू घरी जाऊन तुझ्या घरात काही म्हाताऱ्या स्त्री-पुरुषांना लपवून ठेवायला ते तयार होतील का विचार. शिवाय असेच इतर कुणी माणसे लपवायला तयार असेल तर सांग. लवकर पळ जा. वेळ थोडाच उरला आहे.''

* ज्यूंची (यहुदी) कत्तल व लूटमार

''माझ्यावर विश्वास ठेवा. मी आत्ताच पावका आणि क्लीमकाला भेटतो. त्यांच्या घरची माणसं नक्कीच मदत करतील.''

तिसऱ्या दिवशी 'पग्रोम' सुरू झाला. पग्रोम म्हणजे युहद्यांच्या घरांची लुटालुट करून त्यांच्यावर अत्याचार करणे.

पावल्युक आणि गोलुबच्या माणसांमध्ये घनघोर लढाई झाली. त्यात गोलुबच्या रेजिमेंटची अधिक हानी झाली होती. त्यामुळे त्याच्या रेजिमेंटमध्ये काहीसा असंतोष पसरला होता. तो असंतोष नाहीसा करण्यासाठी व लोकांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यासाठी पग्रोम करावा अशी दुष्ट योजना त्यांच्यासमोर मांडण्यात आली. या योजनेला गोलुबला मनाविरुद्ध का होईना मान्यता द्यावी लागली.

भल्या पहाटे पग्रोम सुरू झाला. शहर अद्याप पहाटेच्या धुक्यात गुरफटलेले होते.

बाह्यत: ती सारी वस्ती झोपेत बुडाल्यासारखी वाटली, तरी प्रत्यक्षात कुणालाच झोप नव्हती. कुटुंबेच्या कुटुंबे एकाच खोलीत दाटीवाटीने बसून होती आणि संकटाला तोंड देण्याची मानसिक तयारी करत होती. लहान मुले मात्र निरागसपणे आपल्या मातांच्या कुशीत विसावलेली होती. शंभर अंगरक्षक घोड्यांना टाच मारून हमरस्त्यावरून दौडू लागले. त्या बेशिस्त झुंडीच्या आघाडीवर पाल्यानीत्स आणि सालोमीग होते.

'फूक्स कापडाचे व्यापारी' अशी गंजलेली पाटी अडकवलेल्या घरापाशी पाल्यानीत्सने घोड्याचे लगाम खेचले. सोबतीच्या लोकांकडे वळून तो म्हणाला, ''खेळाला सुरुवात झालीय. कुणाची टाळकी फोडू नका आणि पोरीच्या बाबतीत संध्याकाळपर्यंत जरा कळ काढा, सर्वांना सारं काही मिळेल.''

एवढे बोलून तो दुकानाच्या बंद दारापर्यंत गेला आणि जोराने त्याच्यावर लाथ मारली. घरातल्या लोकांनी रस्त्यावरचे टापांचे आवाज ऐकले होते. त्यांच्या दुकानासमोरच टापांचा आवाज थांबला, तेव्हा मात्र त्यांच्या हृदयांचे ठोके थांबले, शरीरे ताठरून गेली.

धनवान फूक्सने बायको पोरींना घेऊन कालच शहर सोडले होते आणि दुकानावर लक्ष ठेवण्यासाठी रीवा नावाच्या एकोणीस वर्षांच्या मोलकरणीला ठेवले होते. तिला सोबतीला तिचे म्हातारे आईवडील आणून ठेवण्याविषयी सांगून आणि परतल्यावर झग्याचे कापड बक्षीस देण्याची लालूच दाखवून तिला तयार केले होते.

आता ती तिघेही थरथर कापत होती. म्हातारा पेईसाख दारापाशी उभा होता. त्याचे निळे, विस्फारलेले डोळे घाबरलेल्या मुलाप्रमाणे दिसत होते आणि सगळी शक्ती एकवटून तो देवाची करुणा भाकत होता.

कड्या निखळून पडेपर्यंत रायफलींच्या दस्त्यांचे प्रहार बाहेरून होत राहीले आणि शेवटी फळ्या चिरफाळून दार सताड उघडे पडले.

लुटीला आरंभ झाला. कपडे, पादत्राणे आणि इतर लुटीने गाड्या शिगोशिग भरल्या तेव्हा ती लूट गोलुबकडे पाठवण्याची व्यवस्था झाली. सालोमीग परतत असतानाच घरातून कुणीतरी फोडलेली किंकाळी त्याला ऐकू आली.

पाल्यानीत्स घरात गेला तेव्हा म्हातारा, म्हातारी व तरूण रीवा त्याच्या नजरेस पडली. आपले रानमांजरासारखे डोळे त्यांच्यावर रोखून तो जोडप्यावर खेकसला, ''चालते व्हा इथून.''

पण आईबाप जागचे हालले नाहीत.

''या म्हाताऱ्यांना फेकून द्या बाहेर.'' तो गरजला.

मुलीने पुन्हा किंकाळी फोडली. म्हातारा पेईसारव आवेगाने धावत आला; पण त्याच्या छातीवर एवढा जोरात प्रहार झाली की वेदनेने कळवळत तो भिंतीवर आपटला. म्हातारी तोईबा पिलाचे रक्षण करणाऱ्या लांडगिणीसारखी चवताळली. तिने बाहेर उभ्या असलेल्या सालोमीगवर झेप घेतली. ''मला आत जाऊ द्या. माझ्या मुलीचं तुम्ही काय करताय?''

ती आत जायला धडपडत होती. पेईसारवही सावरून तिच्या मदतीला आला.

''आम्हाला आत जाऊ दे... आत जाऊ दे. माझ्या पोरीऽ रीवा... रीवा...''

झटापट करून त्यांनी सालोमीगला दारापासून दूर ढकलले. संतापून त्याने पट्ट्यातून रिव्हॉल्वर उपसून काढले आणि त्याची पोलादी मूठ म्हाताऱ्याच्या डोक्यावर हाणली. पेईसारव खाली कोसळला.

खोलीत रीवा किंचाळत होती.

दु:खाने वेड्यापिशा झालेल्या तोईबाला फरफटत, खेचत बाहेर नेण्यात आले. तेव्हा तिच्या आर्त किंकाळ्यांचे आणि विनवण्याचे पडसाद रस्ताभर उमटत होते.

घरात मात्र शांतता पसरली होती. रीवाला गप्प करण्यासाठी पाल्यानीत्सने तिच्या तोंडावर उशी दाबून धरली, तेव्हा श्वासासाठी तडफडून तडफडून तिने प्राण सोडला.

शहरात लुटालुटीला ऊत आला होता. लुटीच्या वाटणीसाठी गुंडांमध्ये छोट्या-मोठ्या चकमकी झडत होत्या. तलवारींची पाती चमकत होती. बियरच्या कोठारातून पंचवीस गॅलनची अनेक पिंपे रस्त्यावर आणण्यात आली.

संध्याकाळी लुटारूंचे अस्ताव्यस्त जमाव पिऊन पिसाट बनलेले होते, अंधार पडण्याची वाटच पाहात होते.

अंधाराबरोबर त्यांचा शेवटचा धरबंध सुटला. दोन रात्र, तीन दिवस पग्रोम चालू राहिला.

त्या काळात किती प्राणांचा चुराडा झाला, किती जीव छिन्न भिन्न झाले. अरुंद गल्ल्या-बोळांतून तरुण मुलींचे बलात्कारित, कुस्करलेले मृतदेह विखुरलेले होते.

◆◆◆◆

प्रकरण पाचवे

ती एक भयाण अंधारी रात्र होती. अशा काळोख्या रात्री अंधारात आपल्या घरात बसून राहाण्यात अधिक सुरक्षित असते हे प्रतिष्ठित नागरिकांना माहीत असते. शक्य असेल तोवर ते दिवा पेटवत नाहीत कारण उजेडामुळे कदाचित अप्रिय पाहुणे त्यांच्याकडे येण्याची शक्यता असते.

पण अशा काळोख्या रात्रीत एक व्यक्ती बाहेर संचार करत होती.

तिने पावेलच्या घराकडे मोर्चा वळवला.आणि सावधपणे खिडकीवर टिचक्या मारल्या. उत्तर मिळाले नाही म्हणून अधिक जोराने आणि सततपणे खिडकी ठोठावली.

पावेल खिडकीच्या धडधड आवाजाने जागा झाला.

तो बिछान्यातून उडी मारून उठला आणि खिडकीपाशी गेला पण नुसत्या काळसर आकृतीपलीकडे त्याला काही बोध होईना. घरात तो एकटाच होता. कदाचित आर्त्योमच आला असेल. त्याने खिडकी उघडण्याचा निर्णय घेतला. ''कोण आहे?'' त्याने अंधारात प्रश्न केला.

खिडकीबाहेर दबता आवाज आला. ''मी, झुखराय. आजची रात्र तुझ्याकडे राहायला आलोय मित्रा, तुझी काही हरकत आहे?''

''हरकत कसली? मारा खिडकीतून उडी.'' पावेल स्निग्धपणे उत्तरला.

झुखरायनी आपला देह खिडकीतून कसाबसा कोंबला. आत येऊन खिडकी बंद केली.

''मित्रा, ते मुडदेफरास आता माझ्या मागे अगदी हात धुवून लागलेत. स्टेशनवर जे काही घडलं, त्यानंतर त्यांना माझा सुगावा लागलाय. आता ते माझ्या पाठलागावर आहेत. तुझी हरकत नसेल तर मी काही दिवस इथंच नांगर टाकीन म्हणतो, चालेल ना?''

पावेलला ते आल्याचा खूप आनंद झाला होता. गेले काही दिवस वीज कारखाना चालत नव्हता आणि रिकाम्या घरात पावेलला एकटे एकटे वाटत होते.

त्या रात्री झुखराय यांचे अनपेक्षित झालेले आगमन आणि त्यांच्या सहवासात नंतर घालवलेले आठ दिवस याचा पावेलच्या संपूर्ण जीवनक्रमावर मोठा परिणाम घडला. त्या खलाशाकडून पावेल खूप काही नवे शिकला आणि त्याच्या अंतरंगात खळबळ माजली.

झुखराय यांचे बोलणे अगदी स्पष्ट, प्रवाही आणि साधे होते. आपल्यासमोरील मार्ग त्यांना स्पष्ट उमगला होता. पावेलला समजले की समाजवादी क्रांतिकारक, सामाजिक लोकशाहीवादी, पोलिश समाजवादी अशा मोठ्या नावांच्या पक्षांचा गुंता म्हणजे कामगारांच्या अतिदुष्ट शत्रूंचा एक अड्डा होता व धनिकांबरोबर खंबीरपणे क्रांतिकारक लढा देणारा एकटा बोल्शेविक पक्ष होता.

'मित्रा,' ते सांगायचे, 'तुला वर्गलढ्याबद्दल फारशी माहिती नाही. पण मी तुला योग्य मार्गाला लावीन कारण त्याचं तू चीज करशील हे मला ठाऊक आहे. आता सारं जग पेटून उठलंय. गुलामांना जाग आलीय. पण जुन्या आयुष्याला मूठमाती देण्यासाठी आम्हाला खंबीर माणसं पाहिजेत. लढाई सुरू झाली की झुरळांप्रमाणं फटींमध्ये लपून बसणाऱ्या शेळपटांची आम्हाला गरज नाही. तर प्रतिटोला हाणण्याची धमक असणारे शूर लोक पाहिजेत.'

त्यांच्या हाताच्या मुठी मेजावर दणदिशी आदळल्या. आपल्या निष्क्रीयतेमुळे त्यांच्या मनावर निराशा दाटली. आता इथे राहाणे निरर्थक आहे. युद्ध आघाडीवर लाल तुकड्यांना जाऊन मिळावे असा त्यांचा पक्का निर्धार झाला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या खलाशाच्या बिछान्यात कुणीही नव्हते.

झुखरायची सर्व ठिकाणी चौकशी करूनही पावेलला त्यांचा पत्ता लागला नाही. निराश मनस्थितीत लपवलेले मानलिशर रिव्हॉल्वर खिशात टाकून तो बाहेर पडला.

घराच्या रस्त्याच्या वळणाशी दोन माणसे त्याला त्याच्या दिशेने येताना दिसली. त्यातला एक भक्कम बांध्याचा, रूंद छातीचा, कामगार वेषातला होता. त्याच्यापाठीमागे संगिनीचे टोक जवळजवळ त्याच्या पाठीला टेकवून करड्या कोटातला पेतूल्युरा सैनिक चालत होता.

पावेल जागीच थबकला. तो अटक झालेला माणूस म्हणजे झुखराय होते.

''काय करता येईल?'' तो गोंधळला होता. अगदी अखेरच्या क्षणी त्याला आपल्या रिव्हॉल्वरची आठवण झाली. त्या रायफलवाल्याच्या पाठीत गोळी घालून झुखरायना मोकळे करता आले असते.

प्रत्यक्षात तो सैनिक त्याच्यासमोर आला तेव्हा पावेलने अचानक त्याच्यावर झडप घातली. आणि रायफलवर पकड धरून नळी खाली वाकवली. आधी बेसावध असलेला सैनिक गोंधळला. नंतर मात्र त्याने रायफल हिसकायला सुरूवात केली. झुखरायने मागे वळून पाहिले तर एक जोरदार झटका मारून संतापलेल्या सैनिकाने पावेलला खाली पाडले पण तरीही त्याला रायफल सोडवून घेता आली नाही.

दोन झेपांमध्ये झुखराय तिथे आले त्यांची पोलादी मूठ हवेत फिरली आणि सैनिकाच्या डोक्यावर आदळली. आणखी दोन प्रहारांमुळे खाली झुकत तो रस्त्यापलीकडे खड्ड्यात कोसळला.

आणि हे सारे स्तंभित होऊन लिझा सुखार्को पाहात होती.

लिझाने सारा वृत्तांत विक्तरला सांगण्यात मोठी चूक केली होती कारण त्यानंतर थोड्याच वेळात चार पेत्ल्युरा सैनिकांना घेऊन तो पावेलच्या घराच्या दिशेने निघाला होता.

घराकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''हेच ते घर. आता जाऊ मी?''

''हो - आम्ही बघून घेऊ. मदतीबद्दल धन्यवाद.'' व विक्तर घाईघाईने निघून गेला.

पाठीतल्या शेवट्याच्या दणक्याने पावेल अंधाऱ्या खोलीत फेकला गेला आणि भिंतीवर त्याचे हात धाडदिशी आपटले. त्याचे सर्वांग वेदनांनी ठणकत होते.

त्याला अटक झाली होती. त्याची माहिती सैनिकांना कशी समजली? त्याला कुणी पाहिले नव्हते. आता काय होईल? आणि झुखराय?

◆◆◆◆

प्रकरण सहावे

मैत्रिणीच्या हलक्या पावलांच्या आवाजाने आणि तिने अचानक मारलेल्या उबदार मिठीमुळे तोन्याची झोप पळाली.

'लिझा, तू आलीस?' ती फिकट स्मित करत म्हणाली.

'माझ्याजवळ खूप बातम्या आहेत व फक्त तुझ्या कानात सांगण्यासारख्या काही आहेत.' लिझाने तोन्याला दबत्या आवाजात रस्त्याच्या चौकात घडलेला प्रसंग कथन केला.

तोन्याचा चेहरा फिकट पडला. तिच्या काळजाचे पाणी पाणी झाले. तिच्या लांब पापण्या थरथरू लागल्या. विक्तरला हे सारे कळले आहे हे कळल्यावर तर ती ताडकन उठलीच. 'तुला काही समजत नाही लिझा. तो आणि पावेल शत्रू आहेत. विक्तरला हे सांगून तू फार मोठी चूक केलीस.'

आता कुठे लिझाला तोन्याच्या जिवाची तगमग उमगली. तिला अपराधी वाटू लागले. 'तोन्या, तुला खूप काळजी वाटते का?' त्या दोघींच्यात अचानक विचित्र शांतता पसरली. लिझा गेल्यावरही तोन्या दरवाजापाशी रस्त्याकडे टक लावून पाहात किती वेळ उभी राहिली. तिच्या अंगावर शहारे उमटत होते.

दुसऱ्या दिवशी कुणीही उठायच्या आत तोन्या अंथरूणातून उठली. कपडे करून त्रेझोर

कुत्र्याला घेऊन तिने शहराची वाट धरली. कोर्चागिनच्या घराचे फाटक उघडून ती आत शिरली. त्यावेळी आर्त्योम खेड्यातून घरी परतला होता.

''पावका,'' तो हाका मारत होता. उत्तर नाही आणि दारे सताड उघडी पाहून तो गोंधळला होता. तेवढ्यात त्याने तोन्याला आत येताना पाहिले.

''मला पावेलला भेटायचंय,'' तोन्या खालच्या आवाजात म्हणाली.

''पण तो लेकाचा कुठं गेलाय, कुणास ठाऊक. मी आलो तर घराला कुलूप नाही अन् पावकाचा पत्ता नाही.''

''तुम्ही पावेलचे भाऊ आर्त्योम का?''

''होय, का?''

''मला नक्की ठाऊक नाही. पण पावेल घरात नसेल तर त्याला अटक झाली असली पाहिजे.''

''अटक? कशासाठी?'' आर्त्योम घाबरून म्हणाला. तोन्याला जे काही माहीत होते ते सारे तिने आर्त्योमला कथन केले.

''मला आता गेलं पाहिजे. मला खात्री आहे, तुम्ही त्याला शोधून काढाल.'' ती हळूच म्हणाली. आर्त्योमने नुसतीच मान हलवली.

त्या कोठीच्या खोलीत ते तिघेजण होते. फाटून चिंध्या झालेला कोट अंगात घातलेला दाढीवाला म्हातारा लाकडी पेटीवर एका कुशीवर झोपला होता. पेत्ल्युरा सैनिकांनी त्याच्याकडे सोपवलेला एक घोडा तबेल्यामधून नाहीसा झाला होता, म्हणून त्याला अटक करण्यात आली होती. बारक्या, कावेबाज डोळ्यांची एक वयस्क बाई जमिनीवर फतकल घालून बसली होती. एक मनगटी घड्याळ आणि काही वस्तू चोरल्याच्या आरोपावरून तिला इथे डांबून ठेवण्यात आले होते. खिडकीखालच्या कोपऱ्यात पावेल अर्धवट शुद्धीत पडला होता. सालोमीगने त्याच्याकडून माहिती मिळवण्याचा अयशस्वी आटापिटा करताना त्याचा भयंकर छळ केला होता. पण तो एवढंच बोलला, ''मला काही माहीत नाही. मी त्याला सोडवलं नाही.''

कमांडंटने चिडून त्याला खतम करण्याची परवानगी मिळवण्यासाठीचा अहवाल मुख्य ठाण्याला पाठवला होता. त्यासाठी त्याचे वय सोळा ऐवजी अठरा दाखवण्याची सूचना सालोमीगने त्याला केली होती.

गेले तीन दिवस कुणीतरी त्याच्यासाठी काळा आंबट पाव आणून देत होते. घुसमटून टाकणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या रात्रीच्या काळोखात त्याच्या मनात अज्ञात उद्याचे विचार

घोळत होते. अंगाखालची जमीन कठीण होती आणि वेदनेने अंग तुटत होते.

तिथे कालच एक नवीन बंदिवान केलेली मुलगीही आली होती. ख्रिस्तीना तिचे नाव. तिचा मोठा भाऊ लाल गनिमी सैनिक झाला होता म्हणून तिच्या घरच्या माणसांचा छळ करण्यात आला. या कुटुंबाला वाळीत टाकण्यात आले. कमांडंटने तिची मनधरणी केली होती आणि तिने त्याला झिडकारले होते. तेव्हा त्याने चिडून तिला धमकी दिली होती, ''तुला तळघरात डांबून ठेवीन, तिथं तू सडत पडशील.''

त्याशिवाय दोह्मीनीकला क्रांतिकारक समितीची पत्रके वाटत असताना अटक झाली होती आणि एका बडबड्या न्हाव्याला तर काहीच कारण नसताना केवळ बडबड्या स्वभावामुळे, अधिकाऱ्यांविरुद्ध चिथावणी देतो म्हणून पकडलं होतं.

एका एकी शेजारच्या पहारेकऱ्यांच्या खोलीतून आरोळ्यांचे आणि पळणाऱ्या पावलांचे आवाज ऐकू आले. कुणीतरी मोठ्याने हुकूम सोडत होते. बोलायचे थांबून सारे कैदी कान देऊन ऐकू लागले.

प्राचीन घंटा-बुरूज असलेल्या त्या चर्चच्या चौकात विलक्षण घटना घडत होत्या. चौकाच्या तिन्ही बाजूंना शिपायांच्या काटकोनाकृती तुकड्या उभ्या होत्या.

रायफली 'विश्राम' पावित्र्यात ठेवलेला, चमत्कारिक रशियन शिरस्त्राण घातलेला, दारूगोळ्याची तोस्ताने अडकवण्याच्या कातडी पट्ट्यांनी लगडलेला पेत्ल्युरा शिपायांचा राखी रंगाचा तो मळकट समूह म्हणजे 'डायरोक्टोरेट' पाशी असलेली सर्वोत्तम डिव्हिजन.

झारच्या माजी सेनेच्या भांडारातील उत्तम गणवेश परिधान केलेली, चांगले बूट घातलेली, सोविएतांविरुद्ध कडवेपणे लढणारी ही डिव्हिजन रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा ह्या रेल्वे जंक्शनचे संरक्षण करण्यासाठी मुद्दाम आणण्यात आली होती.

चौकाच्या पिछाडीला कोपऱ्यात नव्या रंगरूटांची रेजिमेंट उभी केली होती. मळकट घाणेरड्या नागरी वेषातील ते अनवाणी तरूण सहसा नजरेला पडणार नाहीत अशा बेताने उभे केले होते. या शेतकरी तरुणांना त्यांच्या बिछान्यातून धरून आणले होते. त्यांची कुणाचीही लढण्याची इच्छा नव्हती. कवायतीसाठी ते अनवाणीच आले होते.

पायदळाच्या पिछाडीला गोलुबची घोडदळ रेजिमेंट होती.

कवायत पहायला नागरिक जमले होते. कारण 'मुख्य आतामान' खुद्द हजर राहाणार होता.

पेत्ल्युराचे स्वागत करण्यासाठी डिव्हिजनचे कमांडर स्टेशनकडे जायला निघाले. त्यांनी कर्नल चेर्नाकला बोलवून सांगितले, ''कुणालातरी बरोबर घ्या आणि कमांडंटची

कचेरी, पिछाडीची व्यवस्था इ. ठीक आहे की नाही याची खात्री करून घ्या. तिथं काही भुरटे कैदी असतील तर त्यांना सोडून त्याच्या xxx तून मोकळे व्हा.''

चैर्नाक कझाक कप्तानाला बरोबर घेऊन दौडत निघाला.

अचानक जमावात खळबळ माजली. रस्त्यावरून एक घोडेस्वार तुफान वेगाने दौडत आला. हात हालवीत तो ओरडला, ''ते येताहेत.''

''रांगेत उभे राहा.'' अंमलदार गरजला.

चर्चपाशी फोर्ड गाडी डुगडुगत येऊन थांबली. तसे बँडवर गीत वाजू लागले. 'अजुनी युक्रेन जिवंत आहे.'

पेत्ल्युराच्या व्यक्तिमत्वात खास लष्करी असे काही नव्हते. दुर्मुखलेल्या चेहऱ्याने त्याने अंमलदाराची खडी ताजीम ऐकली. महापौरांनी स्वागतपर भाषण केले. पण पेत्ल्युराचे तिकडे लक्षच नव्हते.

झेंड्या जवळच्या चौथऱ्यावर उभे राहून त्याने दहा मिनिटे भाषण केले. त्यात अजिबात दम नव्हता, उत्साह नव्हता. तरीही सैनिकांनी शेवटी त्याचा जयजयकार केला.

त्याचवेळी एक अकल्पित प्रकार घडला. अनेक हिकमती करून यहुदी जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या एका मंडळाने पेत्ल्युरापर्यंत जाण्यात यश मिळवले. तबकात पाव आणि मीठ घेऊन ते अदबीने सामोरे गेले.

''सरकार, यहुदी जनता प्रामाणिकपणे कृतज्ञता आणि आदर व्यक्त करते आहे. स्वागताचा स्वीकार करावा.

आम्हाला आमचे धंदे परत सुरू करण्यास परवानगी द्यावी आणि पग्रोमांपासून आमचं रक्षण करावं अशी विनंती आहे.''

संतापाने पेत्ल्युराचा चेहरा काळवंडला. गोलुबकडे वळून तो म्हणाला, ''कर्नल, तुमच्या कझाकांविरुद्ध तक्रार आलीय. योग्य ती चौकशी आणि उपाययोजना करा.''

नंतर कवायत सुरू झाली.

कर्नल चेर्नाक व कप्तान दौडत कमांडंटच्या कचेरीपाशी येऊन पोचले. तेथील अव्यवस्था, अस्वच्छतेविषयी त्यांनी भराभरा सूचना दिल्या. ''मुख्य आतामान कुठल्याही क्षणी येथे येतील. चला, लवकर, पटपट.'' तो गुरकावला.

नंतर तो कैद्यांकडे वळला. ''कशासाठी तुला इथं आणलं रे?'' तो म्हाताऱ्यावर खेकसला. म्हातारा घाबरून पुटपुटला, ''मलाच माहीत नाही. आवारातून एक सैन्यातला घोडा नाहीसा झाला. माझ्याकडं राहिलेल्या सैनिकांनी तो विकला आणि त्याचे ते दारू प्यायले आणि

आता मलाच पकडलं आहे.''

''उचल तुझ्या वस्तू आणि चालता हो इथून.'' कर्नल ओरडला. म्हाताऱ्याचा विश्वासच बसेना. आपलं बोचकं उचलून तो दाराबाहेर पसार झाला.

आता त्या वयस्क बाईची पाळी होती. ''पान साहेब, जरा विचार करा, गरीब विधवेच्या घराचा पाहुणचार घ्यायचा आणि नंतर तिला कैदेत ठेवायचं का?''

''बस्स. आता काळं कर इथून.''

आज्ञा पूर्ण होण्याचीही वाट न बघता तिने टोपली उचलून बाहेर पळ काढला.

हा सगळा विनोदी प्रकार आश्चर्याने दोलीन्नीक आणि पावेल पाहात होते. ''आणि तू रे?'' चेर्नाकने दोलीन्नीकला विचारले.

''संध्याकाळी आठनंतर रस्त्यात भटकल्याबद्दल मला पकडलं.'' डोक्यात आली ती थाप त्याने सरळ ठोकली.

''रात्री काय करत होतास बाहेर.''

''रात्र कुठली, नुकते अकरा वाजले होते.'' अंदाजाने मारलेली थाप चक्क पचली.

''चालता हो.''

सर्वात शेवटी पावेलला प्रश्न विचारण्यात आले.

तो स्तिमित होतून बघत होता. ते असे सगळ्यांना सोडून का देत होते?

''तुल कशाबद्दल पकडलं?'' चेर्नाकने न्हाव्याला विचारले. तेव्हा तो वेडपटासारखा बरळू लागला.

''मी चिथावणी देतो असं ते म्हणतात. कसली कुणास ठाऊक.''

''कसली चिथावणी? कशाबद्दल रे?''

''मलाच माहीत नाही. मी एवढंच बोललो, मुख्य आतामानांपाशी तक्रार अर्ज करण्यासाठी यहुदी सह्या गोळा करत होते.''

''बस्स. पुरे...'' कप्तानाकडे वळून त्याने आदेश दिला. ''याची नीट व्यवस्था लावा, चांगला खरपूस समाचार घ्या.''

न्हाव्याच्या पाठीवर चाबूक ओढत त्याला नेण्यात आले.

''तू काय केलंस रे.'' पावेलकडे भेदक नजरेने बघत कर्नल म्हणाला.

''आमच्या घरी दोन कझाक रहात होते. त्यांच्या जुन्या खोगीराचा तुकडा मी बुटांसाठी कापून घेतला. तसं करायचं नाही हे मला माहीत नव्हतं.''

कर्नलच्या चेहऱ्यावर तिरस्कार उमटला- ''कसले कसले कैदी पकडून ठेवलेत या उलट्या खोपडीच्या कमांडटनं.''

''चळ पळ इथून.'' तो म्हणाला.

पावेलचा आपल्या कानावर विश्वास बसेना. तो बाहेर पडला तेव्हा त्याच्या काळजाचे ठोके मोठ्यांदा ऐकू येत होते.

''बरं झालं, आपण आत डोकावलो. कसला कचरा भरला होता तिथं!'' चेर्नाक म्हणाला.

कुंपणावरून उडी मारून पावेल थांबला. तो विलक्षण दमला होता. त्याला पुढे जाववेना. कुठे जायचे? घरी जाणे तर शक्यच नव्हते. काय करावे त्याला समजेना. एखाद्या आंधळ्याप्रमाणे तो धावत होता.

कुंपणापाशी आल्यावर त्याने सभोवार नीट पाहिले. त्याचा विश्वास बसेना. तो तोन्याच्या घरापाशी येऊन पोचला होता. त्याला पाहून जोरजोराने भुंकणाऱ्या कुत्र्यामागे ओरडत तोन्या तिथे आली. तेव्हा पावेलला पाहून आश्चर्याने तिचे डोळे विस्फारले.

''पावेल, तू? तुला सोडलं त्यांनी?''

''मी पळून आलोय. मी इथपर्यंत कसा आलो ते मलाच ठाऊक नाही. तुझ्या घरात मला थोडी विश्रांती घेता येईल का? मी भयंकर दमलोय.''

क्षणभर त्याच्याकडे ती पाहात राहिली. तिच्या मनात कणव आणि ममता दाटून आली.

''पावलुशा, माझ्या लाडक्या किती चांगला आहेस तू. आता मी तुला मुळीच सोडणार नाही. हवे तेवढे दिवस राहा तू.''

ती पावेलला घरात घेऊन आली. आईची तिने समजूत काढली. आणि स्वतःच्या खोलीत त्याची व्यवस्था केली. त्याला आधी आंघोळीसाठी गरम पाणी दिले. स्वच्छ कपडे दिले आणि तासाभरानंतर ते तिघेही स्वयंपाकघरात जेवायला बसले.

पावेलला कडाडून भूक लागली होती. तो पदार्थांवर तुटून पडला. नंतर तोन्याच्या खोलीत त्याने सगळी कहाणी सांगितली.

''मला आज रात्री इथून गेलंच पाहिजे.'' तो निश्चयाने म्हणाला.

''तोन्या, तू मला मदत कर. आर्त्योमची हालहवाल काय आहे मला शोधलं पाहिजे. कावळ्याच्या घरात मी एक रिव्हॉल्व्हर दडवून ठेवलंत. सेर्गेईला चिठ्ठी दिली तर तो माझ्यासाठी ते घेऊन येईल. तू एवढं करशील?'' तोन्या उठली. बाहेर गेली. ती परतली तेव्हा पावेल गाढ झोपला होता. तिच्या हाताच्या स्पर्शाने त्याला जाग आली. ''आर्त्योम लवकरच इथं येईल. तो बघ आलाच.''

पुढच्या क्षणीच आर्त्योमने पावेलला कडकडून मिठी मारली. आणि गदगदत्या आवाजात म्हणाला, ''भावड्या! पावलुशा!''

शेवटी नक्की ठरले की, दुसऱ्या दिवशी पावेलने तोन्याचे घर सोडून जायचे. काझातीनला जाणाऱ्या आगगाडीत पावेलला बसवून देण्याची कामगिरी आर्त्योम सेर्गेईला सांगणार होता. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी पहाटे पाचला पावेल गुदामापाशी गेला. इंधन भरायचे काम चालू होते. तेवढ्यात तो आत घुसला.

त्या रात्री पावेल व तोन्या झोपू शकले नाहीत. त्यांची भेट कदाचित पुन्हा कधीही घडणार नव्हती. त्यांच्या अंतरंगात अनंत अबोल विचार खळबळत होते. तोन्याच्या प्रेमाची प्रचीती येऊन तो अंतरंगातून डहुळला होता. आजवर आयुष्याने त्याला आत्यंतिक क्रौर्याचीच बाजू दाखवली होती. पण आयुष्य सुंदरही असू शकते याचा त्याला प्रथमच प्रत्यय येत होता.

तोन्याचा आणि आर्त्योमचा घाईघाईने निरोप घेऊन लोखंडी दांडा पकडत तो झटकन इंजिनात चढला. मागे वळून तो आर्त्योम आणि तोन्याच्या धूसर आकृत्या पाहात राहिला, अगदी दिसेनाशा होईपर्यंत.

◆◆◆◆

प्रकरण सातवे

खंदकांनी वेढलेले आणि काटेरी तारांच्या वेटोळ्यांमध्ये गुरफटलेले शेपेतोवका शहर सबंध आठवडाभर तोफांच्या गडगडाटात आणि रायफलींच्या कडकडाटात रात्री झोपी जात होते व सकाळी जागे होत होते.

शहरापासून तीन कि.मी. अंतरावरचे खेडे लाल सेनेच्या ताब्यात होते. खेड्याच्या मध्यभागाच्या टेकड्यांवर लाल सेनेचा तोफखाना उभा होता. तेथून शहरावर तोफगोळ्यांचा भडीमार चालू होता. तुफानी हल्ले चढवून शेपेतोवका काबीज करण्याचा लाल सैनिकांचा प्रयत्न होता. पण सीमेनजिक पेत्ल्युरा सैनिकांनी खंदकातून भक्कम मोर्चे लावले होते. त्यातून आगीचा भडीमार सुरू होई. स्फोटांच्या अखंड आवाजाने सारे वातावरण दणाणून जाई. शिशाच्या या वादळासमोर बोल्शेविक टिकू शकत नसत. आणि आपल्या साथीदारांचे मृतदेह तसेच टाकून त्यांना माघार घ्यावी लागे.

आज लाल सेनेचे हल्ले जास्त चिकाटीने, जास्त वेळा होत होते. हवा कंप पावत होती. माणसे धरतीवर अंग टाकून देऊन पुन्हा नेटाने पुढे घुसत. आता स्टेशन सोडून बाकीचे सारे त्यांनी काबीज केले होते. चढाईखोर सेना स्टेशनजवळच्या रस्त्यांवरून पुढे घुसल्या.

तळघरात मुकाट बसून राहाणे आता सेर्गेई ब्रुझाकला अशक्य झाले होते. त्याच्या घरच्या आणि जवळच्या शेजाऱ्यांनी तळघरात आसरा घेतला होता.

आईच्या विनवण्यांना न जुमानता सेर्गेई त्या थंडगार तळघरातून वर चढून आला. एक

चिलखती गाडी तुफान गोळीबार करत त्याच्या घराजवळून वेगाने गेली. पेत्ल्युराची घाबरलेली माणसे सैरावैरा पळत होती. एक जण हळूच सेर्गेईच्या अंगणात घुसला. घाईघाईने काडतुसांचा पट्टा, शिरस्त्राण, रायफल तेथेच टाकून कुंपणावरून उडी मारून अदृश्य झाला.

लाल सेनेचे आघाडीचे सैनिक शहरात घुसले होते. आनंदाने बेभान झालेला सेर्गेई रस्त्यावर आला आणि मोठ्या आवाजात ओरडला, 'कॉम्रेड*चा विजय असो!'

सैनिकाने टाकून दिलेली रायफल आणि काडतुसांचा पट्टा त्याने उचलला आणि तो लाल सेनेच्या मागोमाग घाईघाईने गेला.

शत्रूला जंगलात पळवून लावल्यावर व दारूगोळा व इतर वस्तूंनी वाघिणी भरल्यावर विश्रांतीसाठी ते एकत्र आले, तेव्हा एक तरूण मशिनगनवाला सेर्गेईपाशी आला व त्याने आश्चर्याने विचारले, ''कॉम्रेड तू कुठून आला?''

''मी या गावचा आहे. तुमच्या येण्याची वाट पाहात होतो.''

लगेचच सेर्गेईभोवती लाल सैनिकांचा गराडा पडला. त्याला त्यांनी आपल्यात सामावून घेतले. सेर्गेईला आनंदाचे भरते आले होते.

शहरात खळबळ माजली होती. संकटांमुळे बेजार झालेले नगरवासी तळघरांतून आणि भुयारांतून बाहेर पडले होते आणि लाल सैनिकांच्या तुकड्यांना पाहण्यासाठी अंगणाच्या फाटकांशी उभे होते. लाल सैनिकांबरोबर कवायत करत चालेल्या सेर्गेईला पाहून त्याची आई संतापून उठली.

''सेर्गेई, आत्ताच्या आत्ता घरी ये,'' ती ओरडत होती; धावत होती.

पण यावेळी सेर्गेईने अत्यंत खंबीर नजरेने आईकडे बघितले. शरम आणि रागाने त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. ''मी येणार नाही.'' तो ठामपणे म्हणाला आणि चालू लागला.

लेश्चिनस्कीच्या घराच्या फाटकावर पांढऱ्या कार्डबोर्डचा एक तुकडा लटकत होता. त्यावर लिहिले होते 'रेवकोम'. त्या शेजारी एक आकर्षक पोस्टर होते. त्यावरचा लाल सैनिक सरळ तुमच्या डोळ्यात रोखून बघत होता आणि त्याच्या हाताचे बोट एका वाक्याकडे निर्देश करत होते. ''तुम्ही लाल सेनेत दाखल झालात का?'' ठिकठिकाणी पोस्टर्स लागली होती. ''कॉम्रेडहो, कामगारवर्गीय शिपायांनी हे शहर जिंकले आहे. सोविएत सत्ता पुन्हा स्थापन झाली आहे. खुनी गळेकापूंनी पुन्हा इथे येऊ नये म्हणून लाल सेनेत दाखल व्हा.

- दोलीन्नीक, क्रांतिकारक समिती अध्यक्ष''

लेश्चिनस्कीचे घर गजबजले होते. 'कॉम्रेड' शब्दासाठी कालपर्यंत लोकांना प्राणाचे

---

* लाल मित्र

मोल द्यावे लागत होते. आज चहूबाजूंनी हा शब्द ऐकू येत होता. 'कॉम्रेड', अंत:करण हेलावून जात होता हा शब्द.

एका छोट्या खोलीच्या दारावर कागदाच्या लटकणाऱ्या कपट्यावर लिहिले होते – 'पक्ष समिती'. त्या खोलीत कॉम्रेड इग्नात्येवा बसल्या होत्या. सोविएत सत्तेच्या संस्था स्थापनेची त्यांच्यावर जबाबदारी होती.

साखर कारखान्याच्या कामगारांच्या सभेत अत्यंत कडक शब्दात तीझीत्स्कीने एकूण परिस्थितीचा आढावा घेतला.

''कॉम्रेडस्, भूतकाळ आता कधीही परतणार नाही. पतोत्स्कीसाठी आपल्या वाडवडलांनी आणि आपण गुलामगिरी केली तेवढी पुरे झाली. आम्ही त्यांच्यासाठी राजवाडे बांधले. आणि त्या बदल्यात मेहरबान सरदारांकडून आम्हाला काय मिळालं तर भुकेने मरू नये म्हणून जगण्याइतपत अन्न!

आणि आता ह्याच सरदारांचे हुजरे अफवा पसरवताहेत की सोविएत सत्ता कडक अंमल गाजवील.

हे खोटे आहे. कॉम्रेडहो! वेगवेगळ्या राष्ट्रजमातींच्या कामगारांना आजच्या एवढे स्वातंत्र्य पूर्वी कधीही नव्हते. आपण सारे कामगार भाऊ भाऊ आहोत. त्यांनी भावाभावांना एकमेकांचे रक्त सांडायला लावलं. तुर्कांशी लढण्यासाठी शतकानुशतके पोलिश शेतकरी पाठवले. त्यांच्यामुळे झालेल्या रक्तपाताचा आणि दैन्याचा विचार करा. पण आता ते सारंच थांबेल. भांडवलदारांच्या काळजामध्ये धडकी भरवणारी घोषणा बोल्शेविकांनी केलीय. ''जगातील कामगरांनो, एक व्हा. इथे आमची मुक्ती आहे, चांगले भविष्य आहे. एक दिवस पोलिश प्रजासत्ताकदेखील स्थापन होईल. सोविएत पोलंडचे मालक आपण असू.''

या साध्यासुध्या कामगाराच्या अगदी अंत:करणामधून हे कळकळीचे तेजस्वी शब्द उमटले होते.

नव्या जीवनाच्या आवर्तामध्ये सेर्गेई आकंठ गुंतला. 'रेवकोम'ने त्याच्यावर तरुणांना जागे करण्याची कामगिरी सोपवली होती. संघटना स्थापन करणे, कामगारांच्या मुलांचे कम्सामोलमध्ये दाखल होण्यासाठी मन वळवणे, तरुणांचा गट स्थापन करणे असे काम त्याला करायचे होते. त्यासाठी उस्तिनोविच यांच्याशी त्याची गाठ घालून देण्यात आली.

उस्तिनोविच म्हणजे मानेपर्यंत कापलेल्या केसांची, खाकी सदरा घातलेली चक्क अठरा वर्षांची पोरगी होती. तिने त्याला कामाची दिशा दिली व मदतीचे आश्वासन दिले. सेर्गेईने आपल्या बहिणीला, वाल्यालाही कुणाला कळणार नाही अशा पद्धतीने कम्सामोलमध्ये सभासद करून घेतले.

गच्च भरलेले थिएटर तरुणांच्या उत्तेजित बडबडीने गजबजले होते. शहरात सगळीकडे लावलेल्या नोटिसांना प्रतिसाद देऊन युवक प्रचंड गर्दीने थिएटरमध्ये उपस्थित होते. त्यात स्थानिक माध्यमिक शाळेतील व जिम्नॅशियम मधील विद्यार्थी होते.

पडदा वर गेला. ऊयेझ्द समितीचे चिटणीस कॉम्रेड राझीन व्यासपीठावर अवतीर्ण झाले.

त्या बुटक्या, सडपातळ अंगकाठीच्या, धारदार नाकाच्या माणसाकडे सर्वांच्या नजरा वळल्या आणि सर्वजण त्याचे भाषण लक्षपूर्वक ऐकू लागले. सबंध देशभर पसरलेल्या संघर्षाची त्यांनी माहिती सांगितली आणि कम्युनिस्ट पक्षामध्ये एकत्र येण्याचे तरुणांना आवाहन केले. जेव्हा त्यांचे भाषण संपले तेव्हा श्रोत्यांनी कडकडून टाळ्या वाजवल्या.

नंतर सेर्गेई उभा राहिला. त्याला काय बोलावे सुचेना. अखेर कॉम्रेड इग्नात्येवा त्याच्या मदतीला आल्या व कुजबजल्या, 'कम्सामोलची संघटना स्थापन करण्याविषयी सांग.''

सेर्गेईने तात्काळ मुद्याला हात घातला. ''कॉम्रेडहो, सांगण्यासारखं जे होतं ते तुम्ही ऐकलंत. आता आपल्याला एक संघटना स्थापन करायची आहे. कोण कोण तयार आहे?''

श्रोत्यांमध्ये एक प्रकारची स्तब्धता पसरली. दरम्यान उस्तिनोविचने येऊन मॉस्कोतील युवकांच्या संघटनेविषयी सांगायला सुरुवात केली. सेर्गेई गोंधळून बाजूला उभा राहिला.

संघटना स्थापन करण्याच्या प्रश्नावरची सभेत उमटलेली प्रतिक्रिया पाहून त्याला संतापाच्या उकळ्या फुटत होत्या. उस्तिनाविचचे भाषण कुणीही ऐकत नव्हते. पावडरीचे थर चढवलेल्या जिम्नॅशियमच्या वरच्या वर्गातल्या मुली लाजरे कटाक्ष टाकत एकमेकींच्यात हलक्या गप्पा मारत होत्या.

आपले भाषण कुणीही ऐकत नाही याची जाणीव होताच उस्तिनोविचने ते आटोपते घेतले व ती खाली बसली.

इग्नात्येवा बोलायला उभ्या राहिल्या. त्यांच्या शांत धीरगंभीर बोलण्याने अस्वस्थ श्रोते काहीसे गप्प झाले. ''कॉम्रेडहो, आज इथं जे सांगण्यात आलं त्यावर प्रत्येकानं विचार करावा असं माझं तुम्हाला सांगणं आहे. तुमच्यापैकी निदान काहीजण तरी प्रत्यक्ष क्रांतीमध्ये भाग घेतील अशी माझी खात्री आहे. तुम्हाला काही सांगावसं वाटत असेल तर त्यानं व्यासपीठावर यावं.''

पुन्हा एकदा प्रेक्षागरात शांतता पसरली. मग पाठीमागून एक आवाज आला, ''मला बोलायचंय.''

मिशा लेवचुकोव नावाचा पोरगा रंगमंचावर आला. त्याने सुरुवात केली.

''परिस्थिती अशी आहे की आपण बोल्शेविकांना मदत केली पाहिजे. मी कम्सामोलमध्ये दाखल होणार आहे.'' मिशाचे वडील स्वीचमन होते. आगगाडीखाली सापडून त्यांचा अंत

झाल्याने मिशाला शिक्षण घेता आले नव्हते.

मिशाच्या बोलण्यावर गावच्या औषध विक्रेत्याचा मुलगा ओकुशेव बोलायला आला. ''मला माफ करा, पण आम्ही काय करावं असं तुमचं म्हणणं आहे.? आम्ही राजकारणात पडावं का? तसं असेल तर आम्ही अभ्यास केव्हा करणार? अभ्यास तर केलाच पाहिजे. आणि राजकारणात पडायचं म्हणजे नंतर फासावर जायचं. माफ करा, पण कुणी तयार होईल असे वाटत नाही.''

यावर संतापाने थरतर कापणारा एक तरुण मशीनगनवाला जोराने ओरडला, ''यांच्याशी बोलण्यात तुम्ही आपल्या वेळ वाया घालवताय. हे तुम्हाला समजून घेतील असं वाटतंय? भरलं पोट रिकाम्या पोटाशी कधी बांधिलकी करत नाही. इवान झार्कीय माझं नाव. मी पोरका आहे. माझे आईबाप मला ठाऊक नाहीत आणि मला माझं घरही कधी नव्हतं. पावाच्या तुकड्यासाठी भीक मागत, उपास काढत मी वाढलो. पण मग लाल सैन्यातल्या लोकांनी मला आपल्यात घेतलं. माझी काळजी घेतली. कपडे दिले. लिहायला-वाचायला शिकवलं. अख्ख्या पलटणीनं मला दत्तकच घेतलं. मी आता बोल्शेविक आहे आणि बोल्शेविकच राहीन.

आमच्या सुखासाठी, ध्येयासाठी त्यांनी मोठ्या आनंदानं स्वतःचं बलीदान दिलं. संबंध देशभर माणसं मरताहेत आणि तुम्ही इथं झिम्मा-फुगडी घालत बसलाय. काही हरकत नाही. तुमच्याविना आम्ही हे चालवू. आमच्यात या म्हणून विनवण्या करायला येणार नाही. खड्ड्यात जा सारे.'' असे म्हणून रंगमंचावरून तो खाली उतरला आणि ताडताड पावलं टाकत बाहेर निघून गेला. 'रेवकोम'कडे परतताना सेर्गेईने निराशा व्यक्त केली.

''त्यात काही आश्चर्य नाही.'' इग्नात्येवांनी त्याला अडवले. ''नाहीतरी तिथे कमगार वर्गातले तरुण नव्हतेच. बहुतेक मध्यमवर्गीय किंवा गावातल्या बुद्धिमंतांची पोरं होती. एकजात ढोंगी. लाकडं कापण्याच्या गिरणीमधल्या आणि साखर कारखान्यातल्या कामगारांमध्ये तुम्ही गेलं पाहिजे. पण ही मिटींगही काही वाया गेली नाही.''

उस्तिनोविच म्हणाली, ''आपले विचार सगळ्यांपर्यंत पोचवणं हेच तर आपलं काम आहे. आपण सभा भरवू, परिषदा आणि काँग्रेसा घेऊ. स्टेशनवर खुलं थिएटरही होणार आहे. मग सगळ्याला वेग येईल.''

रात्रीची वेळ होती. वकीलसाहेबांच्या मोठ्या खोलीत भल्या मोठ्या मेजाभोवती पाच माणसे बसली होती. दोलीन्नीक, इग्नात्येवा, चेका✻चे प्रमुख तिमोशेन्को, रेलकामगार शूदीक आत्रण रेलयार्डातले ओस्तापचूक. 'रेवकोम'ची बैठक चालू होती. दोलीन्नीक घोगऱ्या

✻ गुप्तमोहीम संघटना

आवाजात कडक नजर रोखीत बोलत होते, ''आघाडीला पुरवठा केला पाहिजे. कामगारांना खायला मिळालं पाहिजे. आपण इथं येताच दुकानदारांनी आणि नफेखोरांनी भराभरा मालाच्या किंमती वाढवल्या. ते सोविएत पैसे घेणार नाहीत. इथं फक्त झारचं जुनं चलन किंवा केरेन्स्की नोटा चालतात. आता आपण किंमती नक्की केल्या पाहिजेत. ते ठराविक किंमतीला माल विकणार नाहीत. माल दडवून ठेवतील. अशा वेळी आपल्याला झडत्या घ्याव्या लागतील आणि त्या रक्तशोषकांचा माल जप्त करावा लागेल. कामगारांची उपासमार होऊ देणं योग्य नाही. मला तर माहिती मिळालीय की बरीस झोन याच्या घरात गुप्त तळघर आहे. तिथं दुकानदारांनी आपला माल दडवून ठेवलाय. सेर्गेईने बातमी काढलीय. आता ते हुडकून काढायचं काम तिमोशेन्को तुझं.''

अर्ध्या तासानंतर आठ सशस्त्र माणसे खानावळवाल्याच्या घरात घुसली.

''एवढ्या आड वेळी तुम्हाला काय पाहिजे, कॉम्रेडांनो?'' मालकाने आदबीने विचारले.

''आम्ही झडती घ्यायला आलोय'' तिमोशन्कोनी करड्या आवाजात सांगितले.

फरशीचा इंच न् इंच तपासण्यात आला. पण गुप्त तळघराचा छडा लागेना. स्वयंपाकघराच्या एका छोट्या खोलीत मोलकरीण गाढ झोपली होती. सेर्गेईने तिला हळूच जागे केले व तिला काही प्रश्न विचारले.

बाहेर खाणावळवाला संतापाने धुसफुसत होता. ''तुम्हाला पाहिजे तरी काय माझ्यापासून? माझ्या घराला गुप्त तळघरं नाहीत.'' तिमोशेन्कोच्या दरडावणीला त्याने जुमानले नाही. पहाट झाली तरी झडती चालूच होती. तेरा तासांनंतर झडती बंद करण्याच्या बेतात ते असतानाच सेर्गेईच्या पाठीमागून मोलकरणीचा आवाज आला.

''स्वयंपाकघरातल्या चुलाण्याच्या आत पाहा.''

दहा मिनिटांनंतर त्या फोडलेल्या चुलाण्याच्या आत एक लोखंडी गुप्त दार सापडले. आणि एका तासाच्या आत पिंपांनी व पोत्यांनी भरलेला एक दोन टनी ट्रक खानावळवाल्याच्या घरापासून भरधाव गेला. एव्हाना तिथे बघ्यांची गर्दी जमली होती आणि सामानाने गच्च भरलेल्या ट्रंककडे ती आ वासून बघत होती.

आपल्या चीजवस्तूंचे छोटे गाठोडे घेऊन मरिया कोर्चागिन घरी आली. पावेलची हकीकत आर्त्योमने तिला सांगितली तेव्हा ती हमसाहमशी रडली. तिचे आयुष्य आता रिते आणि उजाड भासत होते. तिला काम शोधणे भाग होते. म्हणून तिने लाल सेनेतल्या लोकांचे कपडे धुण्याचे काम पत्करले. त्या मोबदल्यात तिला सैनिकांचा शिधा मिळत असे.

एक दिवस आर्त्योम घरी आला तो झपझप पावले टाकीतच. उंबरठ्यावरूनच तो

ओरडला, ''पावेलचं पत्र आणलयं.'' पावेलने लिहिले होते, 'मी फारसा बरा नसलो तरी जिवंत आहे हे कळविण्यासाठी पत्र लिहितो आहे. माझ्या मांडीच्या मागच्या भागात गोळी घुसली होती. पण आता मी बरा होतोय. तेव्हा काळजी करू नका. इस्पितळातून सोडल्यानंतर कदाचित सुटीवर विश्रांतीसाठी घरी येईन. मी आईला भेटू शकलो नाही, तिला नमस्कार सांग. कॉम्रेड कतोवस्कींच्या घोडदळ ब्रिगेडमध्ये मी दाखल झालो होतो. माझ्यामुळे तुम्हाला फार त्रास भोगावा लागला, क्षमा करा. तुझा पावेल.'

पावेलचे पत्र वाचून आईने खूप अश्रू ढाळले. या वेंधळ्याने आपल्या इस्पितळाचा पत्ताही दिला नव्हता.

दोन महिने सरले. झाडांना आपल्या काळ्या आवरणाखाली गुरफटून टाकत रात्र हळूच चोरपावलांनी पसरली. डिव्हीजनच्या मुख्य ठाण्यावरचा तारमास्तर मोर्सच्या सांकेतिक भाषेत टिकटिकणाऱ्या तारयंत्रावरची सापासारखी लांब अरुंद फीत बोटांभोवती गुंडाळत होता. त्यावरच्या टिंबांचे आणि रेषांचे त्याने झटकन रुपांतर केले.

'पहिल्या डिव्हीजनचे चीफ ऑफ स्टाफ, शेपेतोवकाच्या रेवकोमच्या अध्यक्षांना प्रत. ही तार मिळाल्यानंतर दहा तासांच्या आत शहरातील सर्व अधिकृत संस्था मोकळ्या करा. या रेजिमेंटच्या सेनापतीच्या दिमतीला शहरात एक बटालियन ठेवा. डिव्हीजनचे मुख्य ठाणे, राजकीय विभाग सर्व लष्करी संस्था बारान्वेव स्टेशनवर हलवा.' - सही.

दहा मिनिटात अंधार कापत, झोपेतल्या रस्त्यांवरून एक फटफटी धडधडत निघाली. 'रेवकोम'च्या फाटकासमोर थांबली. फटफटीस्वाराने दोलीन्नीक यांच्या हाती तारेचा कागद दिला. तात्काळ त्या ठिकाणी जोरात हालचाली सुरू झाल्या.

एका तासानंतर 'रेवकोम' मधील सामानाने भरलेल्या गाड्या शहरातून गडगड आवाज करीत निघाल्या. सामान आगगाडीच्या डब्यात चढवण्यात आले.

सेर्गेई फटफटीस्वाराच्या मागे धावला. ''मला स्टेशनपर्यंत न्याल, कॉम्रेड?''

''चढून बस मागं. पण घट्ट पकड.''

आगगाडीतून सेर्गेईने रीताला पाहिले. मध्यंतरीच्या काळात त्यांची दाट पण अबोल दोस्ती जडली होती. त्याला अत्यंत प्रिय असे काहीतरी तो लौकरच गमावणार होता याची जाणीव होऊन अस्पष्टपणे पुटपुटला, ''प्रिय कॉम्रेड रिता, तुझा निरोप घ्यायला आलोय. कधी ना कधी भेटू. मला विसरू नकोस.'' अश्रुंनी त्याचा गळा दाटला होता हे लक्षात येताच तो हादरला. दुखेपर्यंत हात हालवत राहिला.

सकाळच्या प्रहरी शहर आणि स्टेशन उजाड दिसत होते. शेवटच्या आगगाडीने जणू

निरोप घेण्याच्या इराद्याने शिट्टी वाजवली आणि ती स्टेशनातून हलली.

सेर्गेईने लाल सेनेचा मोठा पायघोळ कोट अंगात चढवला होता. त्याच्या खांद्यावर काडतुसांचे पट्टे लटकत होते आणि डझनभर लाल सैनिकांबरोबर तो साखर कारखान्यासमोरच्या क्रॉसिंगवर उभा होता. पोलिश सैन्य जवळ येत होते.

मशिनगनच्या आवाजाने शांततेचा पडदा टराटरा फाडला. स्टेशनवर आगगाडीची शिट्टी वाजली आणि तिथूनच एक तोफ घुमली. एक भलामोठा तोफगोळा हवेत उंच सणसणत उडाला आणि साखर कारखान्याच्या समोर रस्त्यावर आदळला.

सेर्गेईच्या गालावरून एक अश्रूचा थेंब ओघळला. त्याने तो कुणाला दिसू नये म्हणून चटकन पुसला. त्याच्या बरोबर लाकूड कापण्याच्या गिरणीतला आन्तेक चालत होता. अचानक तो उसळून बोलू लागला, ''आता ते आपल्या घरच्या लोकांचा भयंकर छळ करणार. खास करून माझ्या. कारण आम्ही पोलिश आहोत. ते म्हणतील तुम्ही पोलिश असून पोलंडच्या सैन्याला विरोध केलात. नक्की माझ्या म्हाताऱ्याला गिरणीतून धक्के मारून ते बाहेर काढतील आणि चाबकानं त्यांची पाठ फोडतील.''

''माझ्या लाडक्या गावा, तुला अखेरचा प्रणाम. तुझ्या ओबडधोबड छोट्या घरांमुळे आणि वेड्यावाकड्या रस्त्यांमुळे तू विद्रूप दिसत होतास; तरी तू मला आवडत होतास. सगे-सोयऱ्यांनो तुम्हाला अखेरचा दंडवत. अत्यंत क्रूर, निर्दय अशा पोलिश श्वेतसेना जवळ येऊन ठेपल्यात.''

तेलाचे डाग पडलेले डगले अंगात घातलेले रेलकामगार गावातून जाणाऱ्या लालसैनिकांकडे खिन्न नजरांनी पाहात होते. ''कॉम्रेडहो, आम्ही परत येऊ.'' दुखऱ्या अंतःकरणाने सेर्गेईने आरोळी दिली.

◆◆◆◆

प्रकरण आठवे

सुमारे वर्षभर पावेल आपल्या मायभूमीचा उभा आडवा प्रवास करत होता. कधी मशिनगनच्या गाड्यांवरून, दारूगोळ्यांच्या पेटाऱ्यांवरून तर कधी करड्या रंगाच्या घोडीच्या पाठीवर स्वार होऊन. आता तो मोठा बाप्या बनला होता. अवजड काडतुसाचा पट्टा घासून मऊ कातडीला झालेली जखम केव्हाच भरून आली होती. खांद्यावर रायफलच्या पट्ट्याखाली एक जाड घट्टा पडला होता.

त्या वर्षातल्या भयानक घडामोडीपैकी खूप काही पावेलने पाहिले होते. त्याच्या सारख्याच फाटक्यातुटक्या कपड्यातील पण कामगारवर्गाच्या सत्तेसाठी लढायला अजिंक्य निर्धाराने पेटलेल्या हजारो लढवय्यांबरोबर, आपल्या मायभूमीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत त्याने मजला मारल्या होत्या. एकदा त्याच्या मांडीत गोळी घुसली होती तर एकदा विषमाच्या तापाने अंगाची लाही लाही होत तो अंथरूणावर तळमळत पडला होता. पोलिश मशीनगनच्या फैरींपेक्षा त्यावेळी बाराव्या रेजिमेंटमधील सैनिकांचे विषमज्वराने जास्त भयानक बळी घेतले होते.

काझातीन-उमान फाट्यावरच्या लोहमार्गावरचे फ्रन्तोवका स्टेशन आता ह्या तुकडीच्या ताब्यात होते. ते ऐन जगंलात वसलेले होते. स्टेशनची एक लहान इमारत आणि उद्ध्वस्त झालेल्या काही झोपड्या, एवढेच तिथे होते. तीन वर्षे सतत चाललेल्या लढायांनी तिथे नागरी जीवन अशक्य बनले होते. मोठ्या घडामोडींची पुन्हा चाहूल लागत होती. बाराव्या सेनेतील सैनिक कमालीचे शिणले होते आणि पोलिश सैन्याच्या रेट्यापुढे माघार घेत होते. अशावेळी विजयोन्मादाने मस्त झिंगलेल्या पोलिश श्वेतसैन्यावर हल्ला करण्यासाठी कामगारवर्गीय फौजा एकवटत होत्या.

लढाईत मुरलेल्या पहिल्या घोडदळ सेनेच्या तुकड्या उत्तर कॉकेशसपासून युक्रेनपर्यंत हलवल्या जात होत्या. लष्करी इतिहासात ही मोहीम अतुलनीय होती. उमान प्रदेशात चौथी, सहावी, अकरावी, चौदावी अशा घोडदळ तुकड्या एका पाठोपाठ एक येऊन थडकत होत्या.

साडेसोळा हजार तलवारी आणि योद्धे स्तेपच्या रणरणत्या उन्हात भाजून निघत होते.

सध्याच्या क्षणाला ह्या वज्रप्रहाराला शत्रूने खोटे पाडू नये हीच लाल सेनेच्या सरसेनापतीची आणि सेनाप्रमुखाची चिंता होती. मॉस्कोपासून खार्कोवच्या मुख्य लष्करी ठाण्यापर्यंत थेट संदेशाच्या तारा अखंड घुमत होत्या.

पावेलला पहिल्या घोडदळ सेनेत बदली हवी होती. एका संध्याकाळी त्याने त्याची छावणी गुपचुप सोडली.

पहिल्या घोडदळ सेनेत विश्रांतीच्या वेळेला थोडी मौजमजा चालू होती. एक सैनिक ॲकॉर्डियन वाजवत होता. परंतु त्याला ते तितक्या कौशल्याने वाजवता येत नव्हते. पावेलने हात पुढे करत म्हटले, ''मी प्रयत्न करून पाहू का?'' पावेलने ॲकॉर्डियन हाती घेतले आणि धुंद सुरांनी वातावरण भरले...

अरे अरे सफरचंदा आता जाशील कुठे
तावडीत सापडलास ओठांच्या मागे पळशील कुठे

ॲकॉर्डियनचे सूर बेभान लयीत अधिकाधिक वेगाने उमटत होते आणि सैनिक बेफाम नाचत होते. ते सारे जण पावेलवर इतके खुष झाले की त्यांची पावेलला गमावण्याची तयारी होईना. शेवटी सर्वांच्या सामुदायिक विनंतीवरून त्याला घोडदळाच्या स्क्वाड्रनमध्ये दाखल करून घेण्यात आले.

पायाखालची जमीन वेगाने मागे पडत होती. हे घोड्यावरचे सैनिक शहराच्या मध्यभागी एखाद्या हिमनगाप्रमाणे चारी बाजूंनी कोसळले आणि प्रत्यक्ष मृत्यूइतकीच भयंकर रणगर्जना त्याच्या कंठामधून उमटली.

पोल एवढे स्तंभित झाले की त्यांनी फारच थोडा प्रतिकार केला व स्थानिक शिबंदीचा पार नि:पात झाला.

तुरुंगाच्या लांबलचक अरुंद व्हरांड्यातून आरोळ्यांचे प्रतिध्वनी उमटत होते.

हाडकुळ्या, डोळे खोल गेलेल्या स्त्री-पुरुषांनी गच्च भरलेल्या कोठड्यांतून एकच कोलाहल माजला होता. शहरातील लढाईचे आवाज त्यांना ऐकू येत होते. याचा अर्थ मुक्तता जवळ आली होती काय? अचानक शहरावर चालून आलेली ही फौज त्यांना स्वतंत्र करणार होती काय?

तुरुंगाच्या आवारापर्यंत लढाई येऊन ठेपली. व्हरांड्यातून माणसे धावत आली आणि खूप काळापासून अपेक्षित असलेले शब्द वातावरणात उमटले, ''कॉम्रेडहो, तुम्ही स्वतंत्र आहात.'' कुलुप तुटले. फाटक्या कपड्यातले, दिवसचे दिवस पाण्याचा अंगाला स्पर्श न झालेले कैदी आपापल्या कोठड्यांतून बेभान होऊन भराभरा बाहेर पडू लागले. तुरूंगातल्या अधिकाऱ्यांच्या पाठीला एव्हाना पिस्तुले टेकवून त्यांना कॉरिडॉरमधून नेले जात होते.

पोलिश श्वेत सैन्याने या दगडी कोठड्यांतील नरकात पाच हजारापेक्षा जास्त कैदी डांबून ठेवले होते. त्या लोकांच्या नशिबी गोळ्या खाऊन अगर फासावर जाऊन मरणे एवढेच लिहिलेले होते. ह्या लोकांची सुटका होणे हेच आजपर्यंत मिळालेल्या विजयचिन्हांपेक्षा फार मोठे पारितोषिक होते.

तुरुंगातून सामुईलची सुटका झाली होती तो पावेलला आतुरतेने भेटला; पणआपल्या जन्मगावी घडलेल्या रक्तपाताची करुण कहाणी सामुईलच्या तोंडून ऐकताना पावेलचा चेहरा काळवंडून गेला.

''त्यांनी आम्हाला भयानक मारहाण केली, पावेल. आम्ही टाकलेल्या प्रत्येक पावलाची त्यांना माहिती होती कारण आमच्यातलाच एकजण त्यांना फितूर झाला होता. पकडलेल्यांपैकी खूप लोक तुझ्या ओळखीचे होते. वाल्या ब्रुझाक आणि रोझा ग्रीत्स्मान. नुकतंच सतरावं सरलं होतं तिचं. तिचे डोळे किती निर्मळ होते. इतरही सहा बायका होत्या. वाल्या आणि रोझावर पाशवी बलात्कार झाले. त्यांना कोठडीत फरफटत आणून टाकलं तेव्हा त्या अर्धमेल्या झाल्या होत्या. रोझा तर काही दिवसांत ठार वेडी झाली. वाल्या मात्र शेवटपर्यंत ताठ होती. सारेच वीरांसारखेच मेले. ते सारं सहन करण्याची ताकद त्यांच्यात कुठून आली होती कुणास ठाऊक.

वाल्या सगळ्यात धोक्याचं काम करत होती. संदेश-वहनाचा ती मुख्य दुवा होती. तिला आणि इतर दोघांना त्यांनी फासावर लटकावण्याची शिक्षा ठोठावली. स्नेगुर्को - एक तरुण बिनतारी संदेश-वाहक - त्याला गोळ्या घालून ठार मारण्याची. स्नगुर्कोनं खटल्यामध्ये कम्युनिस्ट प्रचाराचं काम केल्याचा आरोप मान्य केला पण देशद्रोहाचा आरोप अमान्य केला. तो म्हणाला, ''पोलिश सोविएत समाजसत्तावादी प्रजासत्ताक ही आमची पितृभूमी आहे. ही कामगार-किसानांची पितृभूमी आहे. तुमची नाही आणि माझ्या पितृभूमीत मला कुणीही देशद्रोही म्हणणार नाही.''

रात्रीच्या वेळी इस्पितळाच्या शेजारी फाशीचे खांब ठोकण्यात आले. ज्यांना गोळ्या घालून ठार करायचे होते त्यांच्यासाठी जंगला जवळ सामुदायिक थडगं खणण्यात आलं.

शिक्षेची बातमी शहरभर सर्वत्र चिकटवली होती. सर्वांना दहशत बसावी म्हणून वधस्तंभाची जागा शहराच्या मध्यभागी मुक्रर करण्यात आली. फाशीचं दृश्य भयानक होतं. भिंतीपाशी लोकांचा जमाव जमला होता.

मरणाची वाट पहात आम्ही गप्प बसून राह्यलो होतो. काय बोलायचं ते रात्रीच बोलून झालं होतं. निरोप घेतले होते. अनेक वेळच्या मारहाणीमुळं आणि बलात्कारामुळं वाल्या इतकी अशक्त झाली होती की तिला हालचालही करवत नव्हती.

नंतर आम्हाला न्यायला ते आले. पोलिसांच्या दोन रांगांच्यामधून आम्हाला रस्त्यावरून फाशीच्या खांबाकडे नेण्यात आले. रायफलीच्या दांड्यांनी लोटत त्यांनी घाईघाईने आम्हाला चालवलं. आमच्या कॉम्रेडना फाशीवर जाताना आम्ही पाहावं म्हणून त्यांनी हे मुद्दाम केलं होतं. नंतर मरण्याची आमची पाळी होती.

भक्कम दोरखंडाचे तीन फास क्रूसावर लोंबकळत होते. प्रत्येक फासाखाली लाकडाच्या ओंडक्यावर एक फळकूट ठेवले होते. आणि ओंडके ढकलून बाजूला करता येईल अशी व्यवस्था होती.

अखेरीस वाल्या आणि इतर दोघांना तुरुंगाबाहेर आणण्यात आलं. ते तिघं एकमेकांच्या हातात हात घालून चालत होते. म्होरक्या त्यांना मागून धक्के मारत होता. वाल्या त्याला काहीतरी बोलली तेव्हा त्यानं फाडकन तिच्या चेहऱ्यावर चाबूक ओढला. गर्दीतली एक बाई ते बघून किंचाळली आणि साखळी तोडून कैद्यांपर्यंत पोचण्यासाठी रेटारेटी सुरू केली. तिला फरफटत दूर नेण्यात आलं. ती बहुधा वाल्याची आई होती. फाशीच्या खांबाजवळ जाताच वाल्यानं गाणं म्हणायला सुरुवात केली. तसा आवाज कुणी पूर्वी कधी ऐकला नसेल. केवळ मृत्यूकडे जाणारी व्यक्तीच तसं गाऊ शकेल. इतर दोघांनीही तिला साथ दिली. शिपाई रागानं बेभान होऊन चाबकानं त्यांना मारत होते; पण ते तिघंही वेदनेच्या पलीकडे पोहोचले होते. घाईघाईनं शिक्षेचा कागद वाचला गेला आणि त्यांच्या गळ्यामध्ये फास अडकवले गेले. त्याक्षणी आम्ही सर्वांनी गायला सुरुवात केली. ''उठा, उठा भूकबंद्यांनो उठा.''

चारी बाजूंनी पहारेकरी आमच्यावर धावून आले. त्या तीन शरीरांना बसलेला फासाचा हिसका मी जेमतेम बघितला.

आम्हा २६ जणांना गोळ्या घालण्यासाठी भिंतीपाशी उभे करण्यात आलं. अचानक आम्हा १० जणांना फाशीऐवजी २० वर्षे तुरुंगवासाची शिक्षा जाहीर झाली. अन्य १६ जणांवर गोळ्या झाडण्यात आल्या.

सामुईलने भावनावेगाने पावेलचा हात घट्ट पकडून ठेवला.

रस्त्यावर घोडदळाची तुकडी उभी होती आणि पोलिश कैद्यांची तुकडी चालत येत होती. रेजिमेंटच्या कम्मिस्सारने हुकूम दिला. ''घोडदळाच्या पहाऱ्यात या कैद्यांना नोवग्रादला न्या. जखमींना औषधोपचार करा. नंतर शहरापासून वीस पेस्ता न्या आणि सोडून द्या. त्यांना अजिबात वाईट वागणूक मिळता कामा नये.''

''का म्हणून,'' पावेल उद्गारला. ''त्यांनी आमच्या लोकांना फासावर लटकवलं.''

कम्मिस्सार गर्रकन मागे वळले. कठोर आवाजात म्हणाले, ''आम्ही श्वेत सैनिक नाही. लाल सेनेच्या पताकांवर एकही डाग असणार नाही.''

लढाईची धुमश्चक्री सर्व ठिकाणी अजूनही चालूच होती. त्या घाईगर्दीच्या दिवसातच पावेलची एका व्यक्तीशी अनपेक्षित भेट झाली. चिलखती आगगाडी उभी असलेल्या

स्टेशनवर त्याला कमांडरने पाठवले होते. ''आगगाडीचे कमांडर कुठे भेटतील?'' पावेलने बादली वाहून आणणाऱ्या एका सैनिकाला विचारले.

''त्या तिथं''. त्या माणसाने बोट दाखवले.

तिकडे जाऊन पावेलने आपल्या खिशातला लखोटा काढून कमांडरला दिला. खाली रुळांवर इंजिनाच्या मधल्या चाकाशी तेलाची बुधली घेऊन एक माणूस वाकून काम करत होता. पावेलला त्याची फक्त रुंद पाठ दिसत होती. पावेलने परत जाण्यासाठी घोड्याचे लगाम खेचले तोच तो माणूस सरळ झाला. दुसऱ्याच क्षणी पावेलने खाली उडी टाकली. ''आर्त्योम''.

त्या माणसाने बुधली खाली टाकून पावेलला मिठी मारली. ''पावका, गाढवा तू होय?'' कमांडर गोंधळून पाहू लागला. बाजूला उभी असलेली माणसे मनापासून हसू लागली.

डिव्हीजन कमांडर ठार झाले. पावेल दचकला. त्यांचा शूर कमांडर ठार झाला होता. पावेलच्या मनात संताप दाटून आला. त्याने घोड्याला टोचले. घोड्याच्या तोंडातून रक्ताळ फेस वहात होता. ''ठार मारा नीचांना. खांडोळी उडवा.'' कमांडरच्या मृत्यूमुळे संतापाने बेभान झालेल्या सैनिकांनी अख्खी पोलिश पलटण कापून काढली.

शत्रूचा पाठलाग करत ते दौडत होते. पण आता प्रचंड रणधुमाळी सुरू झाली होती. अचानक पावेलच्या डोळ्यांसमोर दिपवणारा चकचकाट झाला. त्याच्या कानाचे पडदे स्फोटाने फाटले आणि त्याच्या कवटीत भाजणारे पोलाद घुसले. त्याच्या भोवतीची जमीन विलक्षण वेगाने फिरली. आणि तो घोड्यावरून खाली फेकला गेला.

तात्काळ गडद काळोखी रात्र पसरली.

◆◆◆◆

प्रकरण नववे

पावेल शुद्धीवर आला तेव्हा तेरा दिवस उलटून गेले होते. त्याच्या सर्वांगाला जखमा झाल्या होत्या. पण त्याचे तरुण विजिगीषू शरीर मरायला तयार नव्हते. हळूहळू त्याची ताकद भरून आली. जणू त्याचा पुनर्जन्म झाला होता. प्रत्येक गोष्ट नवी आणि अद्‌भूत वाटत होती. फक्त त्याचे डोके मात्र निश्चल पडून होते.

लष्करी इस्पितळातील कनिष्ठ डॉक्टर नीनाच्या अपरिमित शुश्रुषेनं आणि प्रेमपूर्ण स्नेहार्द वागणुकीनं त्याच्या शरीरात नवचैतन्य भरून येत होतं. त्याचा डावा डोळा मात्र काढून टाकावा लागला. अखेर त्याला इस्पितळातून जाण्याची परवानगी मिळाली तेव्हा डॉक्टरचा

प्रेमभराने निरोप घेतला.

इस्पितळातून मुक्तता झाल्यावर पावेल काही दिवस बुरनोवस्की कुटुंबात राहिला. तोन्या तिथेच राहात होती. तोन्याला कम्सामोलमध्ये ओढण्याचा त्याने खूप प्रयत्न केला. गावातल्या सभेला उपस्थित राहाण्याचे त्याने तिला आमंत्रण दिले. पण त्या सभेसाठी ती तयार होऊन बाहेर आली तेव्हा तो स्तंभितच झाला. तिने एवढा थाटमाट केला होता की कम्सामोलच्या सभेत तो फारच विसंगत दिसेल असे त्याला वाटले त्यांच्यामधील भांडणाचे हे पहिले कारण ठरले. तिने पोषाख बदलून जाण्यास ठाम नकार दिला. त्याऐवजी घरी बसेन असे तिने सांगितले.

कम्सामोलच्या सभेत तिचे कपडे एवढे उठून दिसत होते की पावेलला त्याची शरमच वाटली. त्याचे मित्रही त्याच्यावर त्या बाहुलीला आणल्याबद्दल नाराज झाले. त्यांची मैत्री संपुष्टात येण्याचा आरंभ त्या संध्याकाळी झाला. अगदी टिकाऊ वाटणारे नाते तुटत जाताना पावेलच्या मनात कडवट आणि निराशेच्या भावना दाटल्या होत्या. असेच काही दिवस उलटले. प्रत्येक भेटीत काहीतरी बाचाबाची होऊ लागली. तिची अहंवृत्ती त्याला असह्य होऊ लागली. कुपचेक्सी बागेत त्यांची अखेरची भेट झाली. खालच्या सुरात पावेल म्हणाला, ''तोन्या, मी तुझ्यावर प्रेम केलं--- करीनही पण त्यासाठी तू आमच्याबरोबर असायला हवं. एका कामगारावर प्रेम करायचं धैर्य तुझ्यात आहे; पण आमच्या विचारांवर तू प्रेम करू शकत नाहीस.'' अटळपणे मावळत्या सूर्याबरोबर त्यांची मैत्री मावळली.

पोलिश श्वेतसेनेविरुद्धचा संघर्ष संपला होता. रक्ताचे प्रचंड सिंचन झालेल्या त्या भूमीला विश्रांतीची नितांत गरज होती.

पावेल आपल्या लोकांना भेटू शकत नव्हता. कारण शेपेतोवका पुन्हा पोलिशांच्या हाती गेले होते. ते तात्पुरते ठाणे बनलेले होते. तहाच्या वाटाघाटी चालू होत्या. तो कमालीचा अस्वस्थ बनला होता. ''म्हणजे आता तहावर सह्या झाल्यातर माझी आई सीमेपलीकडे राहाणार?'' त्याने झुखरायना विचारले.

पण झुखरायने त्याची धास्ती कमी केली. ''सीमारेषा बहुधा नदीकाठानं गोरीनमधून जाईल. त्यामुळे तुझं गाव आपल्या बाजूलाच राहील.''

एक दिवस पावेलला सेर्गेईसुद्धा भेटला. दारुगोळ्याच्या खोक्यांनी भरलेल्या ट्रकवर सेर्गेई बसला होता. त्याने धपकन उडी मारली तेव्हा पावेल जवळजवळ कोसळलाच.

त्या दोघांपाशी एकमेकांना सांगण्यासारख्या एवढ्या बातम्या होत्या की कुठून सुरुवात करावी हेच त्यांना समजेना.

युद्धबंदीचा तह झाला आणि झुखरायचे भाकीत खरे ठरले. शेपेतोवका गाव सोविएत युक्रेनमध्ये समाविष्ट झाले.

एका भल्या पहाटे अविस्मरणीय अशा दिवशी पावेल आपल्या गावात पोहोचला. पावेल स्टेशनवर उतरून घाईघाईने घराकडे निघाला.

दारावर त्याने टकटक केली तेव्हा मारियाने दार उघडून 'आत या' असे म्हटले. दुसऱ्या क्षणी तिच्या दृष्टीस तिच्या लाडक्या मुलाचा चेहरा पडला. चटकन तिचा हात अतिआनंदाने काळजावर गेला. तिच्या तोंडून शब्दही फुटेना.

आपल्या मुलाच्या छातीवर ती कोसळली आणि त्याच्या चेहऱ्याची असंख्य चुंबने घेऊन तिने त्याला गुदमरून टाकले. तिच्या गालावरून आनंदाच्या आसवाच्या धारा वाहू लागल्या. तिच्या छोट्या, कृश देहाला पावेलने घट्ट कवटाळले.

तिच्या शिणलेल्या चेहऱ्यावर वेदना आणि चिंता यांच्यामुळे दाट रेषांचे जाळे उमटले होते. त्यांच्याकडे पावेल मूकपणे पाहात राहीला.

ह्या मुलाला आपण पुन्हा कधी पाहू शकू असे तिला वाटलेच नव्हते. त्यामुळे त्याच्याकडे कितीही पाहिले तरी तिचे समाधान होत नव्हते.

आता कोर्चागिन कुटुंबाचे पुनर्मिलन झाले होते. दोघे भाऊ मृत्यूच्या जबड्यातून सुटून आले होते. अनेक दिव्यातून पार पडल्यावर त्यांची पुन्हा भेट झाली होती.

''आता काय करायचा विचार आहे रे, पोरांनो?''

''आई, मी परत दुरुस्ती विभागात कामाला जाणार.'' आनंदी सुरात आर्त्योम म्हणाला. पावेल मात्र दोन आठवडे तिथे राहून कीएवला परत गेला. तिथे त्याचे काम त्याची वाट पहात होते.

◆◆◆◆

भाग : २

प्रकरण पहिले

शेपेतोवका भोवतालच्या जंगलाच्या झाडोऱ्यात आणि खोल घळींमधून ओर्लिक ची टोळी लपून बसली होती. दिवसा उजेडी ते गुंड आजूबाजूच्या वाड्यांमधून किंवा जंगलपट्ट्यांमधून लपूनछपून राहात, पण रात्रीच्या वेळी ते रुळांवर चोरपावलांनी येत, निर्दयपणे रूळ उखडून टाकत आणि आपले दुष्कृत्य संपवून पुन्हा गुप्त जागी पसार होत.

अनेक लोखंडी घोडे रुळांवरून घसरत होते. उतारवाहू डब्यांचा चक्काचूर होई, त्या लोखंडी धुडांखाली झोपाळलेल्या माणसांचा सपाट भुगा होई आणि बहुमोल धान्य रक्तात आणि मातीत नासून जाई.

ती टोळी अचानकपणे एखाद्या छोट्या गावावर धाड घाली. घाबरलेल्या कोंबड्या कलकलाट करीत चारी दिशांना सैरावैरा धावत. वोलस्त सोविएतच्या इमारतीसमोर रायफलींचा छोटा कडकडाट होई आणि वाटेत येणाऱ्या प्रत्येकाला कापून काढीत दरोडेखोरांची टोळी आपल्या पुष्ट घोड्यांवरून जोराने दौडत जाई. लाकडाचे ओंडके फोडावेत इतक्या शांतपणे ते बळींना कापून काढत.

या टोळीला सर्वत्र डोळे आणि कान होते. वोलस्त सोविएतच्या छोट्या पांढऱ्या इमारतीच्या भिंतींमधून आरपार त्या डोळ्यांना सारेकाही दिसत असे. कारण पाद्र्यांच्या निवासातून आणि कुलकांच्या घरांतून अदृश्य धागेदोरे जंगलातल्या झाडोऱ्यात पोचलेले होते. दारुगोळ्याची खोकी, डुकराच्या मांसाचे ताजे तुकडे, निळसर रंगाच्या दारुच्या बाटल्या त्याच मार्गाने जंगलात पुरवल्या जात.

अलेक्सांद्र पुसिरेवस्की अत्यंत चिकाटीने दरोडेखोरांचा पाठलाग करत होते. आजपर्यंत या टोळीने त्यांना हुलकावणी दिली होती. पण जवळजवळ एक महिन्यानंतर दरोडेखोरांना मागे घेणे ओर्लिकला भाग पडले. एका अरुंद चिंचोळ्या प्रदेशात तो कोंडला गेला होता.

शहराच्या मध्यभागी आणि सीमेपाशी जीवन सुरळीत झाल्यासारखे भासत होते. क्रांतिकारक सत्तेचे केंद्र असलेल्या गुर्बेनिया समितीमध्येही सारे काही शांत होते. पण ही सारी वरवरची शांतता होती.

शहरात तुफान खळबळत होते. वेगवेगळ्या दिशांनी येऊन तिथे जमलेल्या अनेकांना त्या तुफानाची आधी चाहूल लागली होती. त्यांच्या लांबलचक किसान-डगल्यांच्या आत दडवलेल्या सैनिकी रायफली उठून दिसत. आगगाड्यांच्या टपांवर बसून धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांच्या वेषात आलेल्या लोकांनाही आगामी वादळाची कल्पना होती. आपली पोती बाजाराऐवजी विशिष्ट पत्त्यावर त्यांनी नेली होती.

पण कामगारांच्या वस्तीमध्ये तसेच बोल्शेविकांनाही त्याची काहीच कल्पना नव्हती.

अपवाद होता फक्त पाच बोल्शेविकांचा. लालसेनेने ज्या पेत्ल्युरा टोळ्यांच्या उरलेल्या लोकांना पोलंडमध्ये पिटाळून लावले होते, त्यांनी वॉर्सामधील काही परकी वकिलातींच्या निकट सहकार्याने उठाव करण्याचा कट रचला होता.

बंडखोरांच्या मध्यवर्ती समितीची शेपेतोवकामध्ये एक संघटना होती. त्यांपैकी बहुतेकजण पूर्वी क्रियाशील प्रतिक्रांतिकारक होते. पण स्थानिक चेकाने त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना मोकळे सोडले होते.

वासिली पाद्री, कनिष्ट पायदळ अधिकारी विन्नीक आणि पेत्ल्युराचा लष्करी अधिकारी कुझ्मेन्को हे त्या संघटनेचे पुढारी होते. या सर्वांच्या कुटुंबातील मंडळी हेरगिरीचे काम करीत.

युद्धआघाडीवरील खास विभागावर हातबाँबचा हल्ला रात्रीच्या वेळी करायचा, कैद्यांना सोडवायचे आणि शक्य झाल्यास रेल्वे स्टेशनचा ताबा घ्यायचा, अशी त्यांची योजना होती.

दरम्यान, लष्करी अधिकारी गुप्तपणे शहरात एकवटले होते. उठावाचे ते प्रमुख केंद्र होते. दरोडेखोरांच्या टोळ्या नजिकच्या जंगलापाशी येऊन थांबल्या होत्या. या ठिकाणाहून रुमानिया आणि खुद्द पेत्ल्युराशी संपर्क राखण्यात आला होता.

झुखराय आपल्या खास विभागाच्या कचेरीत सहा रात्री अजिबात झोपले नव्हते. काय शिजत होते याची ज्या पाच बोल्शेविकांना माहिती होती त्यांपैकी ते एक होते.

कसोटीचा क्षण अगदी जवळ येऊन ठेपला होता. शहरात कटवाल्यांच्या गुप्त ठिकाणांच्या जाळ्यात कुठेतरी वेळ निश्चित झाली होती. उद्या रात्री!

पण ज्या बोल्शेविकांना या कटाची माहिती होती, त्यांनी आधी प्रहार करण्याचे ठरवले होते. वेळ ठरली होती. आजच्या रात्री!

त्या संध्याकाळी रेल्वे यार्डातून एक चिलखती आगगाडी हळूच बाहेर निसटली आणि यार्डाचे दरवाजे तिच्या पाठोपाठ बंद झाले.

सांकेतिक तारा पाठविण्यात आल्या व दिलेल्या तातडीच्या इशाऱ्यांनुसार सावध आणि दक्ष माणसे सज्ज झाली. प्रजासत्ताकाच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवलेली होती. गांधीलमाशांचे मोहोळ नष्ट करण्यासाठी त्यांनी तातडीने उपाययोजना केल्या.

अकीमने झार्कीयाला टेलिफोन केला. ''छोट्या संघटनांच्या बैठकी कशा काय? ठीक? छान. ताबडतोब परिषदेसाठी इकडं ये. पक्षाच्या विभागीय चिटणीसाला बरोबर आण. आपल्या कल्पनेपेक्षा इंधनाचा प्रश्न वाईट आहे. इथं येशील तेव्हा संविस्तर बोलू.'' खंबीर आवाजात, घाईघाईने अकीम बोलला.

लीत्केने तुफान वेगाने मोटारीमधून दोन्ही चिटणीसांना मुख्य कचेरीत आणले. पहिल्या

मजल्याच्या पायऱ्या चढत असतानाच त्यांच्या ताबडतोब लक्षात आले की, सर्पणाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी त्यांना बोलावलेले नव्हते.

कचेरी व्यवस्थापकाच्या टेबलावर एक मशिनगन उभी होती आणि खास मोहिमांच्या तुकडीमधील माणसांची तिच्या भोवती लगबग चालू होती. शहरातील पक्षाच्या व कम्सामोलच्या संघटनांचे रक्षक व्हरांड्यातून गप्प उभे होते. चिटणीसांच्या कचेरीच्या मोठ्या दरवाजांमागे पक्षाच्या गुर्बेनिया समितीच्या ब्युरोची ता तडीची बैठक संपत आली होती. खोलीत अकीम, रीता आणि मिखाईल होते. रीताने लाल सेनेचे शिरस्त्राण चढवले हाते. खाकी सदरा घातला होता. त्यावर कातडी जाकीट घातले होते व त्याला जाडजूड मॉसर पिस्तुल पट्ट्याने बांधले होते. युद्ध आघाडीवर ती जेव्हा राजकीय शिक्षक म्हणून काम करीत होती, त्यावेळचा तिचा हा गणवेश होता.

''हा सगळा काय प्रकार आहे?'' झार्कियाने चकीत स्वरात विचारले.

''वान्या, सज्जतेची कवायत करायचीय. आता सरळ तुझ्या विभागात जायचं. पाचव्या पायदळ विद्यालयाजवळ आपली भेट ठरलीय. कम्सामोलचे सभासद आपल्या छोट्या संघटनांच्या बैठकीनंतर सरळ तिथं जाणार आहेत. कोणाचंही लक्ष वेधून न घेता तिथं पोचायचं ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे.''

त्या जुन्या लष्करी विद्यालयाच्या आवारात ओकची जुनाट महाप्रचंड झाडे उभी होती. तेथील तळ्याच्या तुंबलेल्या पाण्यात काटेरी पानाफुलांच्या झुडुपांचे आणि खाजकुयलींचे रान माजले होते आणि तिथेच विद्यालयाच्या इमारतीत लाल सेनेच्या कमांडरचे पाचवे पायदळाचे केंद्र होते. बाहेरून सारे काही निवांत होते. पण लोखंडी दरवाजे उघडे होते आणि प्रवेशद्वारापाशी दोन काळ्या आकृत्या उभ्या होत्या. अगदी त्रोटक शब्दांमधील निरोपासरशी अगदी मुकाटपणे एकेकट्याने किंवा क्वचित दोघे दोघे असे ते आले. कम्सामोलच्या किंवा कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यत्वाच्या कार्डाशिवाय कुणालाही आत प्रवेश नव्हता.

आत बरीच माणसे जमली होती. आणि नेहमीच्या कवायतीसाठी एवढी गुप्तता बाळगल्याबद्दल एकमेकांत थट्टामस्करी करीत होती. हा खराखुरा सावधगिरीचा इशारा होता याची कुणालाही जाणीव झाली नाही.

तेवढ्यात सभागृहात एकदम खळबळ माजली. एक कंपनी कमांडर खुर्चीवर उभा राहून ओरडला, ''पहिल्या कंपनीच्या माणसांनो, रांगेत उभे रहा. लौकर, घाई करा.''

गुबेर्नियाा कार्यकारी समितीचे अध्यक्ष आणि अकीम यांच्यासह झुखराय तिथे आले.

अध्यक्षांनी आपला हात वर केला आणि ते बोलू लागले, ''कॉम्रेडहो, अत्यंत गंभीर आणि तातडीच्या कामासाठी तुम्हाला इथं बोलवण्यात आलं आहे. आता मी जे तुम्हाला सांगणार आहे ते अगदी कालसुद्धा सांगणं शक्य नव्हतं. उद्या रात्री या शहरात आणि

युक्रेनमधल्या इतर शहरांमध्ये प्रतिक्रांतिकारक बंडाळी व्हायची आहे. शहरात श्वेत सैन्याचे लष्करी अधिकारी खचून भरले आहेत. शहराभोवती दरोडेखोरांच्या तुकड्या दबा धरून बसल्या आहेत. काही जणांनी चिलखती गाड्यांच्या तुकड्यांमध्ये शिरकाव करून घेतलाय. पण चेकानं योग्यवेळीच कट उघडकीला आणलाय आणि सबंध पक्ष संघटनांना व कम्सामोल संघटनांना आम्ही शस्त्रसज्ज करतोय. पहिली आणि दुसरी कम्युनिस्ट बटालियन लष्करी विद्यालय व चेकांच्या तुकड्यांबरोबर काम करील. कॉम्रेडहो, मोहीमेचं नेतृत्व कॉम्रेड झुखराय यांच्याकडे राहील. तुकड्यांचे कमांडर त्यांच्याकडून आपले हुकूम घेतील. परिस्थिती गंभीर आहे. उद्याची बंडाळी आजच मोडून काढली पाहिजे.''

पंधरा मिनिटांनंतर शस्त्रसज्ज बटालियन विद्यालयाच्या आवारात रांगेने उभी होती. झुखरायनी इशारा दिला, ''सुरू करायची वेळ झाली.''

निर्जन रस्त्यावरून तीनशे सैनिक संचलन करीत निघाले, तेव्हा सारे शहर झोपले होते.

ल्योवस्काया रस्त्यावर, दिकायाच्या समोर बटालियनमधले सैनिक पांगले. अजिबात आवाज न करतान त्यांनी इमारतींना वेढा घातला. शहराच्या केंद्राकडून ल्योवस्काया रस्त्यावर एक मोटार वेगाने आली. तिच्या पुढच्या दिव्यांचा प्रखर प्रकाशझोत पडला होता. बटालियन कमांडपोस्टच्या समोर ती कचकन् झांबली.

कमांडंट लीत्के वेगाने मोटारीतून बाहेर आले. आपल्या मुलाला ह्युगो लीत्केला उद्देशून त्यांनी भराभर काही सांगितले. मोटार पुढे झेपावली आणि दिसेनाशी झाली. लीत्केचा हात म्हणजे सारथीचक्राचा एक भाग बनले होते. त्याची नजर रस्त्यावर खिळली होती आणि सैतान संचारल्याप्रमाणे तो मोटार पिटाळत होता. झुखरायना शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत भरधाव वेगाने नेण्याची कामगिरी त्याच्यावर सोपवली गेली होती.

कटवाल्यांच्या मुख्य ठाण्यावर पहिले आघात करण्यात आले. कैद्यांच्या गटांची आणि कागदपत्रांच्या फायलींची खास विभागाकडे पाठवणी करण्यात आली.

दीकाया रस्त्यावर अकरा क्रमांकाच्या घरातील ल्युबेर्तचा श्वेत सैनिकांच्या कटात महत्त्वाचा वाटा होता. पदोल भागात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तुकड्याच्या याद्या त्यांच्यापाशी होत्या.

अटक करण्यासाठी खुद्द वरिष्ठ लीत्के आले. ल्युबेर्तच्या घराच्या खिडक्या बागेच्या दिशेला होत्या आणि एका उंच भिंतीने ती बाग अलग झालेली होती. ल्युबेर्त घरात नव्हता. घराची झडती घेण्यात आली. हातबाँबचे एखाद खोके आणि पत्त्यांच्या याद्या सापडल्या. लीत्के कागदपत्र तपासण्यामध्ये दंग झाले होते.

अचानक भिंतीवर एक छाया अवतरली. चोरपावलांनी ती आपल्या सावजाच्या दिशेने सरकू लागली. नाविक सुऱ्याचा एक घाव तिथे असलेल्या पहारेकऱ्याच्या पाठीत घुसला.

तो तात्काळ आडवा झाला. बागेत एक बार होताच ब्लॉकभोवती वेढा घालणाऱ्या माणसांमधून विजेचा प्रवाह सळसळत गेला. काहीजण घराकडे धावले. लीत्के टेबलावर ओणवे कोसळले होते. त्यांच्या डोक्यावरच्या जखमेतून रक्ताचा लोंढा वहात होता. खिडकीच्या तावदानाचा चुरा झाला होता. पण कागदपत्रे मात्र सुरक्षित राहिली होती.

भिंतीपलीकडे अनेक बार ऐकू आले. खुनी माणूस भिंतीवर रस्त्याच्या बाजूने चढला होता आणि गोळ्या झाडत ल्युकानोवच्या मोकळ्या जागेकडे पळत होता. पण एका गोळीने त्याची धाव थांबवली.

सबंध रात्रभर झडत्या चालू होत्या. घर समित्यांच्या दप्तरी नोंद न झालेल्या, पदरी संशयास्पद कागदपत्रे आढळलेल्या आणि शस्त्रे बाळगलेल्या शेकडो लोकांना चेकाकडे पाठवण्यात आले.

काही तुरळक ठिकाणी कटवाल्यांनी चार हात केले. काही माणसे दगावली पण श्वेत सेनेचे बंड अंकुरावस्थेतच खुडण्यात आले.

ताण कमी झाला. पण लौकरच नव्या शत्रूचा शहराला धोका निर्माण झाला. रेलवाहतूक थंडावली. आता उपासमार आणि कडाक्याच्या थंडीला तोंड द्यावे लागणार होते. धान्य आणि सर्पण यांच्या पुरवठ्यावरच सारे काही अवलंबून होते.

◆◆◆◆

प्रकरण दुसरे

त्या खोलीतील छताखाली आणि जिल्हा कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या खुर्चीवर सुमारे डझनभर सिगारेटींच्या करड्या धुराचा ढग ओठंगला होता. त्या धुरकट वातावरणात खोलीतील लोकांचे चेहरे अस्पष्ट दिसत होते.

अध्यक्षांच्या शेजारी बसलेले तोकरेव आणि झुखराय अस्वस्थपणे हालचाली करत त्या टक्कलवाल्या बुटक्या माणसाकडे पाहात होते. तो तारस्वरात अखंड बोलत होता. पण शोषून घेतलेल्या अंड्याप्रमाणे त्याची सर्व वाक्ये पोकळ आणि अर्थहीन वाटत होती. तो रेल्वे सर्पण समितीचा अध्यक्ष होता. परिषद एक तासाहून अधिक काळ चालली होती. तो कागद चाळीत बडबड करत होता. ''.... अशा परिस्थितीत गुबेनिया समितीचा आणि रेल्वे व्यवस्थापन विभागाचा निर्णय अमलात आणणं अगदी अशक्य आहे. मी पुन्हा सांगतो, आजपासून चारशे घनमीटरपेक्षा जास्त सर्पण आम्ही देऊ शकणार नाही आणि एक लाख ऐंशी हजार घनमीटर सर्पणाच्या गरजेबद्दल बोलायचं तर ते अगदी....'' तो अडखळत बोलला, ''... अं... शुद्ध स्वप्नरंजन आहे.'' त्याने आपले भाषण आटोपले. झुखरायनी आपल्या पाईपवर नखांनी टिचक्या मारल्या आणि राख झाडून टाकली. शेवटी तोकरेवनी शांततेचा भंग केला. ''म्हणजे...'' त्यांनी खर्जातल्या आवाजात सुरूवात केली. ''रेल्वे

सर्पण समितीपाशी अजिबात सर्पण नाही. तिच्याकडे पूर्वीही कधी नव्हतं आणि भविष्यातही असेल अशी आशा नाही... बरोबर?''

त्या टक्कलवाल्याने खांदे उडवले. ''कॉम्रेड, मला माफ करा, पण सर्पणाचा साठा आम्ही केला होता. आता रस्त्यावरच्या वाहतुकीत तूट पडली तर ...'' त्याने आवंढा गिळला आणि रुमालाने आपले टक्कल पुसले.

''लाकूड पाठवण्याबाबत तुम्ही काय व्यवस्था केलीत? कटात गुंतलेल्या प्रमुख तज्ञांना अटक करूनही खूप दिवस उलटलेत.'' देनेक्को म्हणाले.

''रेल्वेच्या शासकीय खात्याला मी तीनदा लिहिलं की, जोपर्यंत आम्हाला योग्य वाहतुकीच्या सवलती मिळत नाहीत, तोपर्यंत ते अशक्य आहे....''

तोकरेवनी त्याला मध्येच अडवले, ''ते आम्ही आधीच ऐकलंय.'' आणि थंड सुरात त्यांनी विचारले, ''आम्ही मूर्ख आहोत असं तुम्हाला वाटतंय का?''

ते शब्द ऐकताच टक्कलवाल्याच्या पाठीतून एक थंड शहारा गेला. ''प्रतिक्रांतिकारकांच्या कारवायांना मी जबाबदार नाही.'' खालच्या सुरात तो उत्तरला.

''पण ते रेल्वेमार्गापासून खूप दूर अंतरावर झाडं तोडत होते याची तुम्हाला माहिती होती, होय की नाही?''

''मी त्याबद्दल ऐकलं होतं. पण ते क्षेत्र माझ्या प्रांताबाहेर येतं.''

''रेल्वे सर्पण समितीनं खास शिध्याची तरतूद केलीय. कामगारांच्या तोंडचा घास कमी करून इथं अन्न पाठवलंय आणि तुम्ही इथं काय करता आहात? कामगारांसाठी दोन वाघिणी पीठ पाठवलं, त्याचं काय झालं?'' ट्रेड युनियनच्या अध्यक्षांनी चिकाटीने पुढचे प्रश्न टाकले.

अशा संतप्त प्रश्नांचा वर्षाव त्या टक्कलवाल्यावर चारी बाजूंनी होऊ लागला आणि तो एखाद्या माशाप्रमाणे वळवळू लागला. त्याचे डोळे भेदरलेले दिसत होते. आपल्याला धोका आहे याची त्याला जाणीव झाली. इथून लवकरात लवकर निसटून उबदार घरट्यात गुडूप होण्याची, चवदार भोजनाचा आस्वाद घेण्याची आणि तरण्याबांड बायकोच्या सहवासाची त्याला ओढ लागली होती.

झुखरायनी आपल्या टिपण वहीत खरडले. 'या माणसाची योग्य तपासणी झाली पाहिजे. इथं काहीतरी पाणी मुरतंय. चर्चा थांबवा आणि त्याला जाऊ द्या. म्हणजे आपण कामाला लागू शकू.'

अध्यक्षांना ते पटले. त्यांनी ठराव तयार केला. '...धडधडीत घातपात केल्याबद्दल रेल्वे सर्पण समितीच्या व्यवस्थापन विभागाला बडतर्फ करणे, लाकूड कापणीची बाब चौकशी अधिकाऱ्यांकडे पाठविणे...'

यापेक्षा अधिक वाईटाची टक्कलवाल्याने अपेक्षा केली होती. तो घाईघाईने खोलीतून

बाहेर पडला आणि त्याने जोरदार नि:श्वास टाकला.

टेबलावर उलगडून पसरलेल्या नकाशावर बोट खुपशीत झुखराय म्हणाले, ''हे पहा, बोयारका स्टेशन. लाकडं तोडण्याची जाग इथून सहा कि.मीटर लांब आहे. ह्या जागी दोन लाख दहा हजार घनमीटर लाकूड रचून ठेवलंय. ते सारं लाकूड साठवून ठेवायला माणसांची अख्खी फौज आठ महिने राबराब राबली आणि फळ काय? तर विश्वासघात. रेल्वे आणि शहरापाशी सर्पणाचा ठणठणाट. ते लाकूड सहा कि.मीटर अंतर काटून स्टेशनापर्यंत आणायला पाच हजार गाड्यांना किमान एक महिना लागेल आणि ते सुद्धा त्यांनी दररोज दोन खेपा टाकल्या तर! खरं म्हणजे त्यांनी लाकूडतोड इथं सुरू करायला पाहिजे होती. आणि स्टेशनच्या दिशेने यायला पाहिजे होते. पण त्या हरामखोरांनी मुद्दामच ऐन जंगलात ते काम केलं. तोडलेलं लाकूड आपल्याला मिळू नये, असा त्यांचा डाव होता. आणि त्यांचा अंदाज चुकलेला नाहीय. या कामासाठी आपल्याला शंभर गाड्यासुद्धा मिळणार नाहीत. ही बाब एखाद्या बंडाइतकीच गंभीर आहे.''

झुखराय यांनी गच्च मिटलेली मूठ दणकन् टेबलावर आदळली –

त्या सर्वांच्या समोर स्पष्ट दृश्य उभे होते. हिवाळा तोंडावर आला होता. इस्पितळे, शाळा, कचेऱ्या लक्षावधी माणसे गोठवणाऱ्या थंडीच्या पकडीत सापडलेली त्यांना दिसत होती. वाहतूक ठप्प होण्याची चिन्हे होती. विलक्षण शांतता तिथे पसरली होती.

शेवटी झुखरायनी आपली मूठ सैल केली. ''कॉम्रेडहो, एक मार्ग सुचतोय. रेल्वे स्टेशनपासून लाकूडतोडीच्या पट्ट्यापर्यंत सात कि.मी. लांबीचा नॅरोगेज रेलरस्ता आपण तीन महिन्यात बांधला पाहिजे. पट्ट्याच्या आरंभाकडे नेणारा पहिला रेलरस्त्याचा भाग सहा आठवड्यात तयार झाला पाहिजे.'' त्यांचा घसा कोरडा पडला. ''तीनशेपन्नास कामगार आणि दोन इंजिनीअर यांची आपल्याला गरज भासेल. पण अडचण एक आहे, ती म्हणजे बोयारकामध्ये कामगारांच्या राहण्याची सोय नाही. इथं सारं पडझडीच्या अवस्थेत आहे. एकावेळी एका पंधरवड्यापुरते लोकांचे लहान लहान गट आपण पाठवले पाहिजेत. त्यापेक्षा जास्त काळ ते टिकाव धरू शकणार नाहीत. अकीम, आपण कम्सामोलना पाठवू या. हे काम फार कठीण आहे. पण काय पणाला लागलंय हे सांगितलं तर शहरातले तरुण आणि कम्सामोलचे सभासद ही कामगिरी नक्की पार पाडतील.''

रेल्वे प्रमुखांनी अनिश्चिततेच्या भावनेनं मान हलवली.

''मला वाटतं काही उपयोग नाही. शरदातला पाऊस आणि गोठवणारी थंडी येतेय. अशा परिस्थितीत जंगलात सात कि.मीटर रूळ टाकायचं काम म्हणजे...'' निराश सुरात ते बोलू लागले. पण झुखरायनी त्यांचे बोलणे तात्काळ तोडले. ''वाईल्यिबिच, हा रेलरस्ता बांधलाच पाहिजे आणि आपण तो बांधणार आहोत.''

हत्यारांचे शेवटचे खोके आगगाडीत चढवण्यात आले. कर्मचाऱ्यांनी आपापल्या जागा घेतल्या. पावसाची रिमझिम चालू होती. रीताने अत्यंत प्रेमाने तोकरेव यांच्याशी हस्तांदोलन करीत म्हटले, ''तुमच्या कामात यश येवो.''*

इंजिनाने जोरात शिट्टी वाजवली आणि आगगाडी सुरू झाली.

शरदातला पाऊस झोडपत होता. करड्या रंगाच्या बाष्पाने जडावलेले ढग पृथ्वीवर अगदी खाली ओठंगून सरपटत चालले होते. झाडे उघडी बोडकी पडली होती. त्यांचे सुरकुतलेले बुंधे तपकिरी शेवाळ्यात लपले होते.

दगडांची रास रचलेल्या फलाटापासून जंगलाच्या दिशेने ताज्या खणलेल्या मातीचा एक पट्टा दिसत होता. त्या पट्ट्याभोवती मुंग्यांसारखी माणसांची धावपळ चालली होती.

रेंदाळलेला चिखल पायांखाली रपरपताना कसेसेच वाटत होते. कडेच्या दगडावर पहारींचे आणि फावड्यांचे दणादण घाव बसत होते. माणसे मोठ्या जोमाने खणत होती.

पावसाच्या मोठ्या सरी कोसळू लागल्या. लोकांच्या कपड्यांमधून पावसाचे थंडगार थेंब आत घुसले. पावसामुळे केलेल्या श्रमांवर अक्षरश: पाणी पडते की काय अशी धास्ती निर्माण झाली. कारण चिकणमाती विरघळून चालली होती.

चिंब भिजलेली आणि गारठलेली माणसे अंधार पडल्यानंतरसुद्धा काम करीत होती आणि दर दिवसागणिक माती उकरलेला पट्टा जंगलाच्या दिशेने सरकत होता.

स्टेशनजवळच्या एका सांगाड्यासारख्या जुन्या विटकरी इमारतीत रात्रीच्या वेळी फरशीवर चारशे माणसे आपल्या अंगातल्या ओलसर चिखलभरल्या कपड्यांसकट झोपत. दारात ते आपले कपडे पिळत तेव्हा चिखलाचे पाणी त्यांच्या कपड्यातून वाहू लागे. त्या फरशीवर वाळल्या गवताचा पातळ थर पसरला होता व ऊब मिळावी म्हणून ती माणसे एकमेकांना चिकटून ओळीने झोपत. त्यांचे कपडे वाळत नसत. खिडक्यांच्या रिकाम्या चौकटींवर अडकवलेल्या पोत्यांवर पावसाचे सपकारे बसत आणि पाण्याचे ओहोळ फरशीवर वाहू लागत. पत्र्याच्या तुटक्या छपरावर पावसाच्या सरींचा ताडताड आवाज घुमत असे आणि दारांच्या मोठ्या फटीतून घूं घूं करीत वारा आत घुसत असे. पडक्या बराकीतील मुदपाकखान्यात सकाळी सारे लोक चहा पीत व कामावर जात. त्यांना रोज एकाच प्रकारचे जेवण मिळत असे. उकडलेली मसूर आणि कोळशासारखा काळाकुट्ट दीड पौंड पाव. त्यांना त्या बेचव जेवणाची अगदी शिसारी आली होती.

पण शहरातून एवढ्याच गोष्टी पुरवणे शक्य होते.

---

* तोकरेव व कामगार जंगलामध्ये तोडलेली लाकडे वाहून नेण्यासाठी जंगलापर्यंत रेलरस्ता बांधण्याच्या कामगिरीवर निघाले व पाऊस, हिमवर्षाव, उपासमार, विषमज्वर अशा भीषण आपत्तींना तोंड देत देत रेलरस्ता बांधण्याचे काम त्यांनी क्रांतिकारी जिद्दीने पुरे केले.

विलक्षण धैर्याने माणसे कष्ट करीत होती आणि रेलमार्ग दर दिवसागणिक जंगलामध्ये पुढे पुढे सरकत होता. काही लोक कंटाळून पसारही झाले होते.

एका आठवड्यानंतर पहिले संकट कोसळले. रात्रीच्या आगगाडीने पावाचा पुरवठा आला नाही.

दुबावने तोकरेवना उठवले आणि ती बातमी सांगितली. तोकरेव घाईघाईने उठून म्हणाले, ''धावत जाऊन खास विभागाला फोन कर.''

तब्बल अर्धा तास खटपट करून खास विभागाचे उपप्रमुख झुखराय यांच्याशी संपर्क साधला गेला. ''काय? पाव मिळाला नाही? याला कोण जबाबदार आहे ते मी शोधून काढतो.'' झुखराय चिंतेच्या सुरात म्हणाले.

''आम्ही माणसांना उद्या खायला काय घालायचं?'' तोकरेव रागाने ओरडले.

फोनवर काही काळ स्तब्धता पसरली. नंतर झुखराय म्हणाले, ''आज रात्री तुम्हीला पाव मिळेल. लीत्केला मी मोटारीतून पाठवतो.''

पहाटेच्या वेळी पावाची पोती लादलेली, चिखलाने माखलेली मोटार स्टेशनात आली. रात्रभर न झोपता गाडी चालवणाऱ्या लीत्केचा चेहरा पांढरा फटक पडला होता. तो कमालीचा थकला होता.

रेलरस्त्याच्या कामात वाढत्या प्रमाणात अडचणी निर्माण होऊ लागल्या. रेल रूळांखालचे लाकडी ओंढे उपलब्ध नव्हते. रेल रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी रूळ व इंजिने पाठवण्याची साधने अधिकाऱ्यांना मिळेनात. इंजिनाची दुरुस्ती आवश्यक झाली होती. पहिल्या पथकातील लोकांनी आपल्या कामाचा वाटा पूर्ण केला होता. पण त्यांची जागा घ्यायला नवे कामगार मिळत नव्हते. पहिल्या पथकातील लोक एवढे थकले होते की त्यांना आणखी थांबवून धरण्यातही अर्थ नव्हता.

पाऊस अखंड कोसळत होता. पहिल्या पथकात सामील झालेल्या पावेलला त्याच्या फाटक्या बुटांनी खूप त्रास दिला होता. ते बूट कधीही वाळत नव्हते आणि त्याच्या आत थंडगार चिखल शिरत असे. शेवटी, एक दिवस गाळात रुतलेला पाय त्याने कष्टाने वर काढला तेव्हा त्याच्या पायाला झालेल्या थंडगार स्पर्शाने त्याला समजले की त्याच्या बुटाचा झिजलेला तळवा उघडला होता. एका उघड्या पायानिशी कामावर जाणे शक्यच नसल्याने तो लंगडत मुदपाकखान्याजवळ आला आणि तिथल्या आगीच्या धगीवर आपले बधीर झालेले पाऊल त्याने धरले.

ते पाहून, अनुकंपेने भरलेली स्वयंपाकीण ओदार्का घाईघाईने बाहेर गेली आणि रबरबूट आणि चिवट लिननचा तुकडा घेऊन परत आली.

उबदार आणि कोरडा झालेला आपला पाय जाड लिननच्या कपड्यात गुंडाळून पावेलने

त्यावर रबरी बूट चढवला तेव्हा ओदार्काकडे एक आत्यंतिक कृतज्ञतेचा दृष्टिक्षेप त्याने टाकला.

तोकरेव शहरातून परतले तेव्हा कमलीचे संतापले होते. महत्त्वाच्या कम्युनिस्टांच्या बैठकीत त्यांनी ती अप्रिय बातमी सांगितली. ''सगळीकडे अडचणीच अडचणी आहेत. आपल्या जागी काम करायला नवी माणसं मिळालेली नाहीत आणि ती कधी, किती मिळतील याचा काहीच अंदाज नाही. हिवाळा आता कुठल्याही क्षणी सुरू होईल आणि वाट्टेल ते करून आपल्याला हे काम दलदलीच्या प्रदेशापलीकडे नेलंच पाहिजे. हा रेल रस्ता आपल्याला बांधलाच पाहिजे आणि तो आपण बांधणार आहोत. मग तो बांधताना आपल्याला मरण आलं तरी पर्वा नाही. तसं वागलो नाही तर आपण बोल्शेविक कसले, गांडूळ ठरू...'' तोकरेवच्या आवाजात कणखरपणा आणि डोळ्यांत निग्रही चमक होती.

सबंध रात्र हिमवर्षाव चालू होता. सगळे काही बर्फाखाली झाकून गेले आणि रस्ता साफ करण्यासाठी तोकरेव यांना काम बंद ठेवावे लागले. जिल्हा समितीचा ठराव पास झाला होता की ज्या ठिकाणी लाकूडतोड केली जात होती तिथपर्यंतचा पहिला भाग एका महिन्यात पूर्ण झालाच पाहिजे. हा ठराव बोयारकाला पोहोचला तेव्हा तोकरेव यांनी त्यावर शेरा मारला, 'तो तेथपर्यंत आम्ही शेवटचा श्वास टाकला नाही तर नक्की पूर्ण करू.'

त्या दिवशी रात्री रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणी दरोडेखोरांची धाड पडली. गोळीबाराच्या फैरीने रात्रीची शांतता टराटरा फाटली. कॉंक्रीटच्या फरशीवरची माणसे गोळीबार ऐकताच पटदिशी उठली. पण प्राणघातकी गोळ्यांचे थैमान सुरू झालेले पहाताच पुन्हा पटापटा आडवी पडली. थोड्या वेळाने गोळीबार थांबला. जंगलात दहा घोडेस्वार घोड्यांना चाबूक हाणीत तुफान वेगाने दौडत गेले.

दुसऱ्या दिवशी शहरातून झुखराय आणि अकीम आले. एक मशिनगन, काडतुसांच्या पट्ट्यांची अनेक खोकी, दोन डझन रायफली एवढे सामान त्यांनी बरोबर आणले होते. ''वेळेवर रस्ता पुरा होईल असं तुम्हाला वाटतं?'' अकीमने तोकरेवना विचारलं.

तोकरेव क्षणभर थांबले आणि म्हणाले, ''हे बघ मुला, तसं एकूण सांगायचं तर काम पुरं करणं शक्य नाही. पण ते पुरं झालंच पाहिजे.'' पुढे ते झुखराय यांच्याशी बोलू लागले. ''या परिस्थितीत अपुऱ्या साधनांनिशी रस्ता बांधणं अवघड आहे. एका महिन्यापेक्षा जास्त काळ आम्ही खणतो आहोत. नवीन कुमक न आल्यानं चौथ्यांदा आम्ही काम करतोय. पण यांच्यापैकी निम्म्यांना थंडीची बाधा झालीय. त्यांच्याकडे पाहताना काळजाला चरे पडतात. सोन्याच्या मोलाची ही पोरं, या नतद्रष्ट बेळक्यात मरणार.''

रुळांखाली ओंढे घालण्याचे काम फार हळू चालते व मोठे कष्टाचे असते. ओंढे जमिनीत घट्ट बसवावे लागतात, म्हणजे रूळ त्यांच्यावर समांतर बसतात. हे तंत्र त्या गटातील फक्त एका माणसाला अवगत होते, तो म्हणजे ताल्याचे वडील रेल फोरमन लागूतिन.

बोयारका रेल्वेस्टेशनपासून सुमारे साडेचार कि. मीटर अंतरावर रेल रस्त्याच्या मार्गात आलेल्या मोठ्या उंचवट्याच्या ठिकाणी माणसांचा एक गट जोरजोराने खणत होता. त्यातच पावेल होता. झुखरायना पाहाताच तो धावत टेकडीवरून खाली धावत सुटला. त्याचा जुना स्वेटर ठिकठिकाणी फाटला होता. झुखरायनी प्रथम त्याला या अवतारात ओळखलेच नाही.

त्यांनी टेकडीची पाहणी केली व नंतर ते जेव्हा लाकूडतोडीच्या स्थळी जाऊन परत आले तेव्हा ही माणसे चिकाटीने टेकाड खणत असलेली त्यांनी पाहिली. ते तोकरेवना म्हणाले, ''तू म्हणालास ते बरोबर होतं. ही पोरं सोन्याच्या मोलाची आहेत. इथं खरं पोलादाला पाणी चढतंय.'' त्यांच्या नजरेत कणखर पण मृदू अभिमान भरला होता.

•

फोनवर आदेश दिला, ''लष्करी विभागातल्या सरसेनापतींना फोन करून रेलरस्त्याच्या कामाच्या ठिकाणी बुझीरेवस्कींची रेजिमेंट ताबडतोब पाठवण्याचा हुकूम द्या. चिलखती आगगाडीतून धडक सैनिक पाठवा. या दरोडेखोरांना ताबडतोब हुसकून लावलं पाहिजे.''

नंतर सभा घेऊन त्यांनी लोकांना विश्वासात घेतलं. ''आता यापुढं लष्करी धर्तीवर काम चालवण्यात येईल. सहा पथकांमध्ये उरलेल्या कामाचे समान सहा भाग करून एकेका पथकाकडे एकेकभाग सोपवण्यात येईल. जे पथक सर्वात आधी काम पुरं करील त्याला शहरात परतण्याची परवानगी मिळेल. तसेच पहिल्या येणाऱ्या पथकातल्या सर्वोत्तम कामगाराला लाल पताकेचा किताब द्यावा अशी मागणी आम्ही सरकारकडं करू.''

भर्ररदिशी अचानक उडणाऱ्या पक्ष्यांच्या कळपाप्रमाणे टाळ्यांचा कडकडाट झाला. आणि ताणलेल्या चेहऱ्यांवर स्मितरेषा उमटल्या. झुखराय यांच्या भाषणाच्या अखेरीस जिव्हाळ्याच्या, नर्मविनोदी शब्दांनी सभेमधील गांभीर्याचा ताण सुटला आणि हास्याचा खळखळाट उमटला.

अकीम आणि झुखरायना निरोप द्यायला गेलेल्या पावेलला झुखरायने बुटांची चांगली जोडी पाठवण्याचे आश्वासन दिले. पण पावेलने त्यांच्याकडे काडतुसांची मागणी करताच त्यांची चटकन आपलं मॉसर पिस्तुल पट्ट्यातून बाहेर काढले, ''तुला माझ्याकडून भेट.''

खूप काळापासून आपल्याला हवी असलेली वस्तू मिळते आहे यावर क्षणभर पावेलचा विश्वासच बसेना.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे एक चिलखती आगगाडी खडखडत स्टेशनात येऊन

थांबली. पोलादी डब्यांतून कातडी पोषाखातील आकृती उतरल्या. त्यानंतर काही तासांनी त्यांनी टेकडीच्या मातीत दोन भोपळ्याच्या आकाराच्या मोठ्या वस्तू पुरल्या. त्यांना लांब वाती जोडलेल्या होत्या. वातीचे एक टोक काडीने पेटवताच एक निळसर ज्योत सरसर पेटत गेली.

लोकांनी आपले श्वास रोखून धरले. एक दोन क्षणांनंतर धरती हादरली. जबरदस्त जोराने टेकडीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. मातीची ढेकळे आकाशात उंच उडाली. जेव्हा धूर, धूळ स्थिरावली तेव्हा टेकडीच्या जागी एक भलामोठ्ठा खड्डा पडलेला सर्वांना दिसला. त्या स्फोटाने तयार झालेल्या त्या खड्ड्याकडे माणसे फावडी, टिकाव घेऊन धावली.

झुखराय यांच्या प्रयाणानंतर पहिल्याने काम पुरे करण्याच्या मान पटकावण्यासाठी सर्व पथकांत चुरस सुरू झाली.

दरम्यानच्या काळात, रेलरस्त्याचे बांधकाम वेगाने पुरे व्हावे म्हणून शहरात चारी बाजूंनी दबाव आणला जात होता. या बदललेल्या परिस्थितीची कामाच्या स्थळी जाणीव होत होती. झार्कीयने कम्सामोल विभागीय समितीच्या जवळजवळ सर्व पुरुष सदस्यांना बोयारकाला पाठवून दिले. सोलोमेन्कामध्ये फक्त मुली उरल्या होत्या. रेल विद्यालयातल्या विद्यार्थ्यांची तुकडीसुद्धा तिकडे रवाना झाली होती.

पण बोयारकात काम करायला परवानगी न मिळल्याने मुली तोकरेव यांच्यावर चिडल्या होत्या. त्यांचे म्हणणे असे होते की इतर कुणाहीप्रमाणे त्याही हालअपेष्टा सहन करू शकल्या असत्या. ताल्याने तर जाहीर केले की आपल्या वडीलांचे कपडे घालून ती बोयारकाला जाणार आहे. ''त्यांनी मला तिथून हाकलूनच दाखवावं.''

बर्फाच्या वादळाचा त्यांना अगदी अचानक तडाखा बसला. आकाशात करड्या रंगाचे ढग खालपर्यंत ओठंगले होते आणि प्रचंड हिमवृष्टी होत होती. रात्र झाली तसा वारा घूं घूं घुमू लागला, झाडांमधून कण्हू लागला, गरगर फिरणाऱ्या हिमकणांना उधळू लागला. सबंध रात्र हिमवादळाचे तांडव चालू होते.

सकाळी आपल्या कामाच्या ठिकाणापर्यंत जायला त्यांना अक्षरश: ढोपरभर बर्फामधून जावे लागले. आपल्या भागातील बर्फ साफ करण्यासाठी पावेल आणि त्याची माणसे गेली.

रोडावलेला आणि तांबड्या भडक डोळ्यांचा पावेल लाकडी फावडे जोरजोरात चालवत होता. तेवढ्यात एक आगगाडी वाफेचे सुस्कारे टाकीत हळूहळू स्टेशनात आली. त्या आगगाडीच्या मरणोन्मुख इंजिनाने कसेबसे डब्यांना इथपर्यंत खेचून आणले होते. इंधनात लाकडाचा एकही ओंडका आता शिल्लक नव्हता. शेवटचे निखारे भट्टीमध्ये मंद पेटत होते.

''आम्हाला इंधन द्या, तर आम्ही पुढे जातो. नाहीतर बाजूच्या रूळांवर आम्हाला घ्या.'' इंजिन ड्रायव्हरने स्टेशनमास्तरला ओरडून सांगितले.

आगगाडी बाजूच्या रुळांवर घेण्यात आली. असंतुष्ट उतारूंना थांबण्याचे कारण समजावून सांगण्यात आले. ''त्या म्हाताऱ्या माणसाशी बोला.'' स्टेशनमास्तरनी फलाटावरून चालणाऱ्या तोकरेवकडे बोट दाखवीत सांगितले. ते इथले प्रमुख आहेत. कदाचित सर्पण पुरवतील.

तोकरेव आगगाडीच्या कंडक्टरला म्हणाले, ''मी तुम्हाला लाकूड पुरवीन. पण त्यासाठी तुम्ही काम केलं पाहिजे. बर्फामुळे आमचं काम अडलंय. बायका मुलांना डब्यातच राहू दे. पण पुरुषांनी बाहेर येऊन बर्फ साफ करायला मदत केली तर मी तुम्हाला लाकडं देतो.'' पावेलकडे येऊन त्यांनी म्हटलं, ''हे तुझ्यासाठी शंभर मदतनीस. कुणी कामचुकारपणा करणार नाहीत याची काळजी घे.''

पावेलने त्यांना कामाला लावले. त्यातल्या रुबाबदार पोषाख केलेल्या, केसाळ, कातडी कॉलर लावलेल्या आणि गरम टोपी घातलेल्या एका उंच माणसाने संतापाने फावडे गर्रकन फिरवले आणि आपल्याबरोबरच्या तरुणीकडे वळून तो म्हणाला, ''मी बर्फ उपसणार नाही. मी रेल्वे इंजिनिअर आहे. हे नियमांच्या विरुद्ध आहे. मी त्याच्यावर खटला भरीन.''

तेवढ्यात पावेल तेथे आला. त्याने त्या झकपक पोषाख केलेल्या माणसाला विचारले, ''तुम्ही काम करत नाही?'''

''तू कोण आहेस?''

''मी एक कामगार आहे.''

''मग मी तुमच्याशी बोलणार नाही.''

पावेलने डोळे वटारले. ''तुम्हाला काम करायचं नसेल तर खुशाल स्वस्थ बसा. पण तुमच्या तिकीटावर आम्ही सही केल्याशिवाय तुम्हाला आगगाडीत पुन्हा बसता येणार नाही. इथल्या बांधकाम प्रमुखांचा तसा हुकूम आहे.''

असे बोलत तो वळला आणि क्षणभर थबकला. त्याच्यासमोर तोन्या तुमानोवा उभी होती. आपल्यासमोर फाटक्या कपड्यात, तुटक्या पादत्राणात, मळकट टॉवेल गळ्याभोवती गुंडाळलेल्या अवतारात आणि कित्येक दिवस पाण्याचा स्पर्श न झालेल्या अवस्थेत उभा असलेला भटक्या म्हणजे एकेकाळी आपण प्रेम देऊ केले होते तो पावेल आहे यावर तिचा विश्वास बसेना. अलीकडेच तिने विवाह केला होता. तिचा नवरा रेलखात्यात मोठ्या पदावर होता. आपला हात पावेलच्या हाती द्यायलाही ती बिचकली. तिला वाटलं कोळसे मारण्याचे काम करणाऱ्या मुलाची रस्त्यावरचा मजूर होण्यापलीकडे मजल गेली नव्हतीच तर!

पावेलच्या सगळे लक्षात आले. तो तुटकपणे तिला म्हणाला, ''कॉम्रेड तुमानोवा, फावडं हाती घ्या आणि रांगेत उभ्या राहा. या माजलेल्या बैलाचं उदाहरण गिरवू नका. तो तुमच्या नात्यातला असला तर माफ करा.''आणि तो वळून निघून गेला.

संध्याकाळी थकून-भागून आलेला पावेल तिच्या नजरेला पडला. तेव्हा ती त्याला म्हणाली, ''रस्त्यावर मजुरी करण्याचं काम करण्यापेक्षा जास्त चांगलं काम तुला अधिकाऱ्यांनी द्यायला हवं होतं. एव्हाना तू कमिस्सार वगैरे बनला असशील असं मला वाटलं होतं. हे फारच वाईट झालं.''

पावेल थांबला आणि चकीत नजरेने तोन्याला त्याने न्याहाळले, ''आणि मी सुद्धा अशी अपेक्षा केली नव्हती. कॉम्रेड तुमानोवा, माझ्या आयुष्याची चिंता तुम्ही करू नका. तुमच्याच आयुष्याचा घोटाळा झालाय. दोन वर्षांपूर्वी तू बरीच ठीक होतीस. एका कामगाराशी हस्तांदोलन करायची तुला तेव्हा लाज वाटत नव्हती. खरं सांगायचं तर आपल्या दोघांमध्ये बोलण्यासारखं आता काहीही राहिलेलं नाही.''

कॉम्रेड रीताने पावेलसाठी केसाळ कातडीची किनार असलेले स्वीडिश बनावटीचे सुंदर जाकीट पाठवले होते, पावेलला थंडीची बाधा होऊ नये म्हणून. चकीत झालेल्या पावेलने ते ऐटबाज जाकीट हातात घेतले आणि थोडावेळ घुटमळल्यानंतर अंगात घातले. त्या केसाळ कातड्यामुळे त्याला तात्काळ ऊब आली.

हिमवादळाचा तडाखा चालूच होता. गळ्यापर्यंत बर्फाचे ढीग पसरले होते. आणि गोठलेली जमीन खणणे अवघड होऊन बसले होते. त्यांना आता अवघा पाऊण किलोमीटर गाठायचा होता. त्यातच विषमज्वराची साथही तिथे सुरू झाली आणि काही माणसांना विषमज्वराची बाधा झाली. हे सगळे कमी म्हणूनच की काय ओर्लीकने आपल्या टोळीसह बोयारकावर रात्री हल्ला चढवला. दोन तास लढाई चालली होती. दळणवळण तुटले होते. टोळीला परतवून लावण्यात या लोकांना यश आले पण तोकरेवना छातीत गोळी घुसून जखम झाली. त्यांना शहरात आणण्यात आले. पहाऱ्यावरचा प्रमुख फ्रान्स क्लविचेक ठार झाला अणि अकरा बांधकाम कामगार जखमी झाले. पानक्रातोव्हने कामाच्या प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली.

जिल्हा पक्ष समितीला उद्देशून बोयारकाहून एक तार आली. दरोडेखोरांच्या हल्ल्याला उत्तर म्हणून आम्ही नॅरोगेज रस्त्याचे बांधकाम कामगार या सभेला जमलो आहोत.... आमच्याबरोबर 'सोविएत सत्तेसाठी' नावाच्या चिलखती आगगाडीचे सैनिक घोडदळ रेजिमेंटमधील लाल सैनिक आहेत. आम्ही प्रतिज्ञा करतो की कितीही अडथळे आले तरी एक जानेवारीला शहराला इंधनासाठी लाकूड मिळेल. आमची सारी ताकद एकवटून आम्ही कामाला लागत आहोत. आम्हाला इथे पाठवणारा कम्युनिस्ट पक्ष चिरायू होवो.!

कोर्चागिन - सभेचे अध्यक्ष. बेर्झिन - चिटणीस.

इच्छित उद्दीष्ट डोळ्यांसमोर होते. पण त्या दिशेने होणारी प्रगती कमालीची मंद होती. कारण बांधकाम कामगारांमधील डझनभर लोक रोज विषमज्वराने कमी होत होते.

एके दिवशी कामावरून परतणारा पावेल दारुड्याप्रमाणे झोकांड्या खात येत होता. त्याचे पाय लटपटत होत. त्याला गेले काही दिवस बारीक ताप येत होता. पण आज तापाचा जोर जास्त होता. दर पावलागणिक त्याच्या छातीतून जोरदार कळ उमटत होती. त्याचे दात कडाकडा वाजत होते आणि त्याच्या डोळ्यासमोर अंधेरी येत होती. भोवतालची झाडे गरागरा फिरत आहेत असा त्याला भास होत होता.

मोठ्या कष्टाने रखडत तो स्टेशनपर्यंत पोहोचला. तो पुढे धडपडला आणि त्याचा तोल गेला. जमिनीवर त्याचे डोके आपटले. तेव्हा एक अस्पष्ट वेदना त्याला जाणवली.

अनेक तासांनंतर लोकांना त्याचा शोध लागला व त्यांनी त्याला बराकीत नेले. त्याचा श्वास जड चालला होता. भोवतालच्या परिस्थितीची त्याला शुद्ध राहिली नाही. चिलखती आगगाडीतून आलेल्या एका डॉक्टर सहाय्यकाने त्याला तपासले आणि न्यूमोनिया आणि विषमज्वराची बाधा झाल्याचे निदान केले. १०६ अंशापेक्षा त्याचा ताप जास्त होता.

पावेलच्या पथकातील सर्व लोकांच्या मदतीने आणि विशेषत: मुसंडी मारून गाडीत घुसणाऱ्या खोल्यावच्या सहाय्याने पानक्रातोव आणि दुबावने बेशुद्ध अवस्थेतील पावेलसकट आल्योशाला गच्च गर्दीने भरलेल्या आगगाडीच्या डब्यात घुसण्यात यश मिळवले. डब्यातील उतारूंना विषमज्वराचा संशय येताच त्यांनी पावेलला गाडीत घेण्यास विरोध केला व आगगाडीच्या वाटेवर रोग्याला फेकून देण्याची धमकी घातली.

खोल्यावने त्यांच्यावर आपली बंदूक रोखली व तो गरजला, ''त्याचा आजार संसर्गाचा नाही आणि तो याच गाडीनं जाईल. मग तुम्हा सर्वांना डब्यातून फेकून द्यावं लागलं तरी बेहत्तर! आल्योशा, हे पावेलचं पिस्तुल घे आणि जो कोणी पावेलच्या अंगाला हात लावेल त्या माणसाला गोळी घाल.''

एका रेल जंक्शनवर एका उतारवाहू आगगाडीच्या डब्यातून एका अज्ञात तरुणाचा मृतदेह फलाटावर उतरवण्यात आला. पण तो कोण होता हे कुणालाच माहीत नव्हते. स्टेशनवरील चेकाच्या लोकांना खोल्यावच्या निरोपाची आठवण झाली आणि ते धावले. पण तो तरूण मेलेला आहे असे आढळताच त्यांनी त्याचे शरीर शवागारात हलवण्याची आज्ञा दिली आणि टेलिफोन करून खोल्यावला त्याच्या मित्राच्या मृत्यूची बातमी कळवली.

दरम्यान आल्योशाने पावेलला त्याच्या घरच्या लोकांच्या हवाली केले होते व तो स्वत: परत आला तेव्हा त्याला ताप चढला होता.

◆◆◆◆

प्रकरण तिसरे

तारुण्याचा विजय झाला होता. विषमाच्या तापाला पावेल हार गेला नाही. चौथ्यांदा तो मृत्यूच्या दारातून परत आला. पण अंथरुणातून उठायला त्याला तब्बल एक महिना लागला होता. तो कमालीचा रोडावला होता. आपल्या थरथरत्या पायांनी तो खोलीमध्ये हळूहळू चालू लागला. आधारासाठी तो भिंतीला धरत असे.

आपल्या आईच्या मदतीने तो खिडकीपाशी पोचला व बाहेरच्या दृश्याकडे खूप वेळ पाहात राहिला. वसंताच्या मोसमाचा पहिला काळ होता. सूर्यप्रकाशात बर्फ चमकत होते. खिडकीच्या अगदी समोर असलेल्या चेरीच्या झाडाच्या फांदीवर करड्या रंगाचा एक चिमणा पिसे फुलवून अंगावरचं पाणी झटकत होता.

''म्हणजे तू आणि मी हिवाळ्यातून बचावलो तर!'' चिमण्याला उद्देशून बोलताना पावेलच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित उमलले.

वसंताचे ऐन बहराचे दिवस सुरू झाले. तेव्हा शहराकडे परतण्याचे विचार पावेलच्या मनात घोळू लागले. आता चालण्याइतकी ताकद त्याच्या अंगी आली होती. पण कुठला तरी अज्ञात रोग त्याचे शरीर पोखरत होता. एकदा तो बागेत फिरत होता तेव्हा त्याच्या पाठीमध्ये अचानक असह्य कळ उठली. आणि तो खाली पडला. मोठ्या मुष्कीलीने तो खुरडत खुरडत खोलीत परत आला. दुसऱ्या दिवशी डॉक्टरांनी जेव्हा त्याची पाठ तपासली तेव्हा त्याच्या पाठीत एक खोल खड्डा पडल्याचे त्यांना जाणवले.

''हे कसं काय घडलं?'' डॉक्टरांनी विचारलं.

''रोवनोजवळच्या लढाईत एका तीन इंची तोफेनं आमच्या मागचा हमरस्ता उखडून काढला आणि स्फोटात उडालेल्या एका दगडानं माझ्या पाठीत दणका दिला.''

''पण त्यानंतर तुम्ही चालू कसे शकलात? तुम्हाला त्रास झाला नाही?''

''दणका बसल्यानंतर एक-दोन तास मला उठता येईना. पण नंतर वेदना थांबली आणि मी पुन्हा घोड्यावर स्वार झालो. नंतर आत्तापर्यंत त्याचा माल काहीच त्रास झाला नाही.''

डॉक्टरांचा चेहरा खूप गंभीर होता. ''मित्रा, हा मामला फार वाईट आहे. पाठीच्या मणक्याला असा धक्का बसणं चांगलं नाही. हे दुखणं लौकर संपून जावो, अशी आशा करू.''

उद्या ही जागा सोडून आपण मोठ्या शहरात जाणार आणि आपल्या प्रिय मित्रांना व सहकाऱ्यांना भेटणार या विचाराने पावेलच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. शहरातले घाईगर्दीचे जीवन, तिथल्या माणसांचा अखंड लोंढा, खडबडणाऱ्या ट्रामगाड्या व कर्णे वाजवणाऱ्या मोटारगाड्या, एखाद्या चुंबकाप्रमाणे त्याला आकर्षित करत होत्या. पण त्या

सर्वांहूनही त्याला आकर्षण होते कारखान्यांच्या मोठ्या विटकरी इमारतींचे, काजळलेल्या यंत्रशाळांचे, यंत्रांचे, यंत्रांच्या पट्ट्यांच्या मंद घरघरीचे. प्रचंड चाकांना गरगर फिरताना पाहण्यासाठी, यंत्रांच्या तेलाचा वास घेण्यासाठी तो कमालीचा आसुसला होता. आत्ता तो ज्या गावातल्या रस्त्यांवरून फिरत होता त्या गावात त्याला काहीशी निराशेची अस्पष्ट भावना जाणवत होती. त्याला परक्यासारखे वाटत होते.

एव्हाना तो सूचिपर्णी झाडांच्या जंगलात पोचला होता. रस्त्याच्या फाट्यापाशी तो क्षणभर थांबला. उजव्या हाताला जुना तुरुंग होता. या विस्तीर्ण आवारात वाल्या आणि तिच्या साथीदारांच्या गळ्याभोवती फाशीचे दोर आवळले गेले होते. ज्या ठिकाणी फाशीचे तख्त उभे केले होते तेथे पावेल क्षणभर स्तब्ध उभा राहिला. नंतर टेकाड चढून खालच्या बाजूच्या स्मशानभूमीत गेला. श्वेत सेनेच्या दहशतीला बळी पडलेल्यांची सामायिक थडगी तिथे होती. गरिबीत आणि गुलामगिरीत जन्मलेल्यांना सुंदर जीवनाचा लाभ व्हावा म्हणून पावेलचे साथीदार धीरोदत्तपणे मृत्यूला सामोरे गेले होते.

नकळत पावेलचा हात वर गेला आणि त्याने डोक्यावरची टोपी काढली. त्याच्या अंत:करणात विषण्णता दाटून आली. 'जीवन हा माणसाचा सर्वात प्रिय ठेवा. हा ठेवा त्याला एकदाच लाभतो. म्हणून त्याने असे जीवन जगले पाहिजे की, वर्षे वाया गेल्याची त्याला कधी बोचरी खंत वाटू नये. क्षुद्र आणि क्षुल्लक भूतकाळाची जळती शरम त्याला स्पर्शू नये. त्याने असे जगावे की मरतेसमयी त्याला आपले सारे जीवन, सारी शक्ती जगातल्या सर्वोत्तम कार्यासाठी, मानवजातीच्या मुक्तीलढ्यासाठी वेचली असे वाटले पाहिजे.'

असे विचार मनात घोळवीत पावेल स्मशानभूमीतून परत फिरला.

घरी त्याची आई अत्यंत दु:खी मनाने त्याच्या प्रयाणाची तयारी करत होती. ''तू इथंच का राहात नाहीस? आर्त्योमने मला शब्दही न विचारता लग्न केलं आणि तो गेला. तुलाही शहरातली एखादी मैना हाकारीत असेल.'' ती पावेलला कळवळून म्हणाली.

तिचे खांदे धरून तो म्हणाला, ''कुणीही मैना नाही आई. जोपर्यंत जगातले सारे भांडवलदार नष्ट होत नाहीत तोपर्यंत मुलींपासून लांब राहाण्याचं वचन दिलंय मी आई. तू म्हणशील, याला फार काळ लागेल. नाही आई, भांडवलदार आता फार काळ तग धरू शकणार नाहीत. लवकरच सर्व लोकांसाठी एक मोठं प्रजासत्ताक स्थापन होईल आणि जन्मभर श्रमलेली तुझ्यासारखी म्हातारी माणसं समुद्रमार्गानं इटलीसारख्या सुंदर देशात जाल, जिथे इथल्यासारखा कडक हिवाळा नाही. तुम्ही आपल्या म्हाताऱ्या हाडांना सूर्यप्रकाशात शेकत बसाल, तोपर्यंत आम्ही अमेरिकेतल्या भांडवलदारांचा फडशा पाडू.''

किएफ्मध्ये येताच पावेलने सरळ क्रेश्चातिक रस्त्याची वाट धरली. पण त्याला त्याचे

कोणतेच जुने मित्र भेटेनात. पहिल्यांदा तो झुखरायच्या भेटीसाठी गेला तेव्हा त्याला समजले की झुखराय बऱ्याच दिवसांपूर्वीच शहर सोडून गेले. तुर्कस्थान आघाडीवर काम करण्यासाठी त्यांना ताश्कंदला पाठविले होते. या बातमीने पावेलच्या मनाला प्रचंड वेदना झाल्या. आता तो कुठे जाणार होता? शेवटी झुखरायनंतर भेटावे अशी वाटणारी व्यक्ती म्हणजे रीताच. तो तिच्या घराकडे निघाला. पण तिथे सुद्धा त्याची निराशाच झाली. रीता जानेवारीतच खुर्कोव येथे गेली होती आणि आता ती मॉस्कोत असावी असा अंदाज होता. कॉम्रेड अकीमसुद्धा अदेरसामध्ये जिलहा कम्सामोलचा चिटणीस म्हणून गेला होता.

पानक्रातोवच्या घरी तो पोचला तेव्हा तो पुरता थकून गेला होता. सुदैवाने पानक्रातोव नुकताच आलेला होता. परंतु त्याने सुरुवातीस पावेलला ओळखलेच नाही. त्याच्याकडून त्याला अनेक मित्रांची हकीकत कळली, तेव्हा शहरात जुने कुणीच नसल्याचे त्याला समजले.

दुसऱ्या दिवशी पक्षाच्या जिल्हा समितीत तो पोचला तेव्हा तिथे नेहमीची धांदल सुरू होती. त्याच्या परिचितांपैकी तिथेही कुणी दिसेना. शेवटी तो तडक चिटणीसांकडे गेला. आपले लिहिण्याचे काम संपवीत पावेलला विचारले, "मी आपल्यासाठी काय करू शकतो?"

पावेलने त्यांना आपली कथा सांगितली. "माझं सभासदत्व मला पुन्हा नोंदवायचं आहे. आणि मला रेल्वे वर्कशॉपमध्ये पाठवा." तो म्हणाला.

चिटणीसाने त्याला चिट्ठी देऊन कॉम्रेड तुप्तांकडे पाठवले. ती घेऊन तो तुप्तांकडे गेला. तुप्ता हातातील कागद व पावेलकडे आळीपाळीने चकीत होऊन पाहात राहिला. "अरेच्च्या, म्हणजे तू जिवंत आहेस तर! पण आता कसं करायचं रे? तुझं नाव तर यादीतून खोडून टाकलंय. आता रीतसर अर्ज करणं एवढंच तू करू शकतोस."

पावेल आगगाडीतील प्रवासात मरण पावला एवढेच सारेजण समजत होते. तुप्तांचाही तसाच समज झाला होता. एवढ्यात तिथे अनेक माणसे आली. पावेलला पाहताच त्यांना आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का बसला. पावेलने पुन्हा एकवार आपली कथा ऐकवली आणि जिल्हा समितीच्या दृष्टीने आपण मेलो आहोत. आता कसे करायचे हा प्रश्नही मांडला. सारेचजण चिटणीसांकडे गेले आणि वस्तूस्थिती समजावून सांगितली. तेव्हा चिटणीसांनी पावेलची पुन्हा नोंद करण्याचे आणि नवे कार्ड ताबडतोब देण्याचे कबूल केले.

क्लबात ओकुनेवने पावेलला मागल्या दाराने रंगमंचाच्या मागील बाजूस नेले. तिथे ताल्या लागूतिना, आन्ना बोरहार्त या दोघी रेल्वे विभागातील कम्सामोल सदस्यांच्या गटाबरोबर बसल्या होत्या. रेल्वे यंत्रशाळांचा कम्सामोल चिटणीस वेलीन्त्सेव आणि त्स्वेतायेव इत्यादी मंडळी होती. ओकुनेव आत येताच त्याला त्या वर्तुळात खेचण्यात आले आणि त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार सुरू झाला.

''तू कुठं होतास?''

''चला, सुरुवात करू या.''

सर्वांनी शांत व्हावे म्हणून ओकुनेवने आपला हात वर केला. ''मंडळी जरा धीर धरा. तोकरेव येताच आपण सुरुवात करू.''

''ते आलेच बघा,'' आन्ना उद्‌गारली.

ओकुनेव त्यांना भेटायला पुढे धावला. ''डॅडी, चला माझ्याबरोबर. रंगमंचाच्या मागं माझ्या मित्रांची तुमच्याशी गाठ घालून द्यायचीय. आश्चर्याचा धक्का सोसायला तयार रहा.''

''आता काय नवीन काढलंस?'' सिगरेटचा झुरका मारत तोकरेव गुरकावले.

सभा सुरू झाली. तोकरेव यांच्या पाठीमागे कम्युनिस्ट जाहीरनामा लिहिणाऱ्या प्रतिभावान पुरुषाचा* सिंहासारखा भव्य चेहरा विलसत होता. ओकुनेव प्रास्ताविक करत होता. तेव्हा तोकरेव विंगेतल्या पावेलकडे एकटक बघत होते.

ओकुनेव बोलत होता. ''कॉम्रेड हो! कार्यक्रमपत्रिकेवरच्या संघटनाविषयक प्रश्नांचा हात घालण्यापूर्वी एका कॉम्रेडनं बोलण्याची परवानगी मागितली आहे. तोकरेव आणि मी असा ठराव मांडतो की त्याला बोलण्याची परवानगी द्यावी.''

सभेत कुजबुज सुरू होती. तेवढ्यात ओकुनेव तडकत म्हणाला, ''मी आता पावेल कोर्चागिनला बोलावतो.'' सभेतील शंभरापैकी निदान ऐंशी जणांना पावेल माहीत होता. त्यामुळे जेव्हा त्याची परिचित आकृती फिकट चेहऱ्याने रंगमंचावरील उजेडात उभी राहून बोलू लागली, तेव्हा प्रेक्षकांमधून आनंदप्रदर्शक आरोळ्या उठल्या व टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

''प्रिय कॉम्रेड हो!'' पावेलचा आवाज स्थिर होता. पण आपल्या भावना तो लपवू शकला नाही. ''मित्र हो, तुमच्याबरोबर काम करण्यासाठी मी परतलो आहे. मला खूप आनंद होतोय. माझे अनेक कॉम्रेड मला इथं दिसताहेत. मला असं समजलं आहे की, सोलोमेन्का कम्सामोलमध्ये पूर्वीपेक्षा तीस टक्के सभासद जास्त आहेत. वर्कशॉपमध्ये आणि यार्डात सिगारेट लायटर बनवण्याचा उद्योग त्यांनी बंद केलाय आणि रेल्वे स्मशानभूमीतले जुने सांगाडे त्यांनी मोठ्या दुरुस्तीसाठी दुसरीकडे हलवले आहेत. याचा अर्थ, आपला देश नव्या जीवनाला आरंभ करतोय आणि ताकद एकवटतोय. त्यामुळे आयुष्याला अर्थ आलाय! अशावेळी मी कसा मरणार?'' कोर्चागिनच्या डोळ्यांतून आनंदप्रदर्शक स्मित उमटले होते.

टाळ्यांच्या कडकडाटात तो व्यासपीठावरून खाली उतरला आणि लोकांनी पुढे केलेले हात त्याने प्रेमभराने हातात घेतले. मित्रांनी त्याला सरकून वाट करून दिली. ताल्याने पावेलच्या हातावर आपला हात गच्च दाबला. आन्नाच्या पापण्या पावेलचे प्रेमळ नजरेने

---

* कार्ल मार्क्स

स्वागत करताना किंचित थरथरल्या.

दिवस भराभर उलटत होते. तरीही त्यांच्यात एकसुरीपणा नव्हता. कारण प्रत्येक दिवस आपल्याबरोबर काहीतरी नवे आणीत होता.

पावेल आता ओकुनेवबरोबर राहायला आला होता. रेल्वे वर्कशॉपमध्ये सहाय्यक इलेक्ट्रिक फिटर म्हणून तो काम करत होता.

कम्सामोलच्या नेतृत्वामधून पावेलने तात्पुरते अंग काढून घ्यायला ओकुनेवने मान्यता दिली पण त्यापूर्वी त्याने पावेलशी खूप जोरात वाद घातला. ''इथं आम्हाला चांगल्या कार्यकर्त्यांची चणचण भासतेय. तू आजारी आहेस अशा थापा मरू नको. पावेल, या सगळ्यामागं काहीतरी कारण आहे. चल, बोलून टाक पटदिशी.'' ओकुनेवने आग्रह धरला.

''कोल्या, तुझा अंदाज बरोबर आहे. मला अभ्यास करायचाय.''

खूप चर्चेनंतर ओकूनेवने पावेलसमोर हार मानली. ''ठीक आहे, दोन महिन्यांकरता मी तुला सोडतो. पण नंतर सबब चालणार नाही. पण त्स्वेतावेयशी तुझं पटेल असं वाटत नाही. तो जरा अहंकारी आहे.''

पावेल वर्कशॉपमध्ये परत आल्यापासून त्स्वेतायेव एकदम सावध बनला होता. पावेलच्या आगमनाने नेतृत्वाच्या संघर्षाला सुरुवात होणार याची त्याला खात्री होती. त्याच्या आत्मप्रतिष्ठेला धक्का बसला होता आणि जोरदार प्रतिकाराची त्याने तयारी केली होती.

पण पावेलने स्वत:ला अभ्यासात गुंतवून घेतले होते. दररोज संध्याकाळी खूप उशिरापर्यंत तो सार्वजनिक वाचनालयात घुटमळायचा. तेथील तिन्ही ग्रंथपालांशी त्याने मैत्री जमवली होती. आणि आपल्या लाघवी स्वभावाने त्यांना आपलेसे करून तेथील पुस्तकांचा मनमुराद वापर करण्याची सवलत त्याने मिळवली होती. तिथे तो तासन्‌तास ग्रंथांमध्ये डोके खुपसून बसायचा. त्यात काही यादवी युद्धकालीन पुस्तिका, मार्क्स यांचे 'भांडवल', जॅक लंडन यांचे 'लोखंडी टाच', 'स्पार्ताकस' आणि मॅक्झिम गॉर्की यांची पुस्तके वाचायला मिळाली.

रेल्वे वर्कशॉपमधील कम्सामोलच्या नेहमीच्या कामात अचानक विघ्न आले होते. आरंभी तो प्रसंग अगदी किरकोळ वाटला होता. दुरुस्ती कामगार फिदिन हा कम्सामोल संघटनेच्या ब्यूरोचा सदस्य होता. एके दिवशी त्याच्या हातून लोखंडाच्या एका तुकड्यावर भारी किंमतीचे परदेशी बनावटीचे ड्रील मोडले. त्याच्या निष्काळजीपणापायी हा अपघात घडला होता. त्यात वाईट म्हणजे फिदिनने तो मुद्दाम मोडला असे वरकरणी भासत होते.

सकाळी वरीष्ठ दुरुस्ती फोरमन होदोरोव यांनी लोखंडाच्या एका लादीवर अनेक भोके पाडायचे काम त्याच्यावर सोपवले होते. फिदिनने प्रथम ते काम करायला नकार दिला

होता. पण फोरमनने त्याच्यावर ते काम जबरदस्तीने लादले. तेव्हा फिदिनने ड्रीलमशीन घेऊन भोके पाडायला सुरुवात केली. कडक शिस्तीने काम करवून घेणाऱ्या या फोरमनविषयी कामगारांच्या मनात राग होता. तो पूर्वीचा मेन्शेविक होता आणि कम्युनिस्ट युवक संघटनेचे लोक त्याला आवडत नसत. पण तो आपल्या कामात अतिशय वाकबगार होता.

फिदिन कोणतेही तेल न वापरता भोके पाडण्याचे काम करत होता. ते पाहून ते संतापले आणि घाईघाईने त्याच्याजवळ जाऊन त्यांनी ते थांबवले. ''काय आंधळा आहेस का? ड्रील कसं वापरायचं याची अक्कल नाही तुला?'' ते खेकसले.

फिदिनही तेवढ्याच जोराने त्यांच्यावर ओरडला आणि त्याने पुन्हा लेथ चालू केला. तेव्हा खातेप्रमुखांकडे तक्रार नोंदवायला होदोरोव गेले. तेवढ्यात तेल आणून ठेवावे म्हणून यंत्र तसेच चालू ठेवून फिदिन पळाला. तो परत येईपर्यंत ड्रील यंत्र मोडले होते. फिदिन याला काढून टाकावे असा शेरा मारून खातेप्रमुखांनी अहवाल सादर केला. पण कम्सामोलच्या ब्यूरोच्या सदस्यांनी फिदिनची बाजू घेतली आणि कम्सामोलच्या सदस्यांविषयी होदोरोव यांना राग असल्याने त्यांनी हे बालंट आणले आहे असा दावा केला. यंत्रशाळांच्या कम्सामोल ब्यूरोपुढे ही केस मांडण्यात आली. संघर्ष पेटला.

फिदिनला अधिकृतपणे ताकीद देऊन दुसऱ्या कामावर त्याची बदली करावी असे ब्यूरोच्या पाचापैकी तीन सदस्यांचे मत होते. त्यापैकी त्स्वेतायेव हा एक होता. फिदिनला अजिबात शासन करू नये असे उरलेल्या दोघांचे मत होते.

ह्या केसची चर्चा करण्यासाठी ब्युरोची बैठक त्स्वेतायेवच्या कचेरीत भरवण्यात आली. ती गुप्त बैठक होती. बैठक सुरू होणार तेवढ्यात दारावर टकटक वाजले. कात्या झेलेनोवाने उठून दार उघडले. बाहेर पावेल उभा होता.

आत येऊन एका रिकाम्या आसनावर बसण्यासाठी पावेल जाऊ लागला तेवढ्यात त्स्वेतायेव त्याला म्हणाले, ''कोर्चागिन, ही ब्यूरोंची गुप्त बैठक आहे.''

पावेलची कानशिले गरम झाली.

''ते मला माहीत आहे. फिदिनच्या संबंधात मला एक मुद्दा मांडायचा आहे. माझ्या उपस्थितीला तुझी हरकत आहे का?''

''माझी हरकत नाही. पण गुप्त बैठकीला फक्त ब्यूरोच्या सभासदांनीच हजर रहायचं असतं हे तुला माहीत असलं पाहिजे. आता आलाच आहेस तर थांब.''

पावेलने आपला संताप कसाबसा आवरला. साधारण दहा मिनिटांच्या चर्चेनंतर जेव्हा प्रश्न मताला टाकण्यात आला तेव्हा त्याने बोलण्याची परवानगी मागितली. त्स्वेतायेवने नाखुशीने त्याला परवानगी दिली.

''कॉम्रेड हो,'' त्याच्या आवाजाला नकळत धार चढली. ''फिदिन प्रकरण हा एक इशारा

आहे. काल मी काही आकडेवारी गोळा केलीय.'' पावेलने खिशातून छोटी टिपणवही काढली. ''आपल्या कम्सामोलपैकी २३% सभासद दररोज पाच ते पंधरा मिनिटे उशिरा कामावर येतात. १७% सभासद दर महिन्याला एक किंवा दोन दिवस अजिबात कामावर येत नाहीत. बिगरपक्षीय कामगारांच्या अनुपस्थितीचं प्रमाण १४% आहे. कॉम्रेड हो, हे आकडे चाबकाच्या फटकाऱ्यांपेक्षा जास्त वेदना देणारे आहेत. आपल्या पक्षाचे चार टक्के सभासद एक दिवस गैरहजर राहातात आणि चार टक्के उशिरा कामावर येतात. बिगरपक्षीयांमध्ये हे प्रमाण तेरा टक्के आहे. यंत्रांची मोडतोड नव्वद टक्के तरुण कामगारांकडून होते. त्या आकड्यांवरून असा निष्कर्ष निघतो की, पक्षाच्या सदस्यांपेक्षा आणि प्रौढ कामगारांपेक्षा आम्हा कम्सामोलांची कामगिरी अत्यंत वाईट आहे. शिस्त फार महत्त्वाची आहे. निष्काळजीपणा आणि ढिलेपणाला आपण पायबंद हा घातलाच पाहिजे. जुने कामगार प्रांजळपणे कबूल करतात की ते त्यांच्या मालकांसाठी, भांडवलदारांसाठी जास्त चांगलं काम करायचे पण आता आपणच मालक आहोत आणि वाईट काम करायला कोणतीही सबब नाही. हा आपलाच दोष आहे. कारण वाईटाविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी आपणच या ना त्या सबबीखाली फिदिनसारख्या कामगारांचा कैवार घेत असतो.''

''मी तर असा ठराव मांडतो की, कामात निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल आणि उत्पादनात व्यत्यय आणल्याबद्दल आपण फिदिनला कामावरून काढून टाकवं. भित्तीपत्रकात या प्रकरणाची चर्चा व्हावी आणि परिणामांची भीती न बाळगता ही आकडेवारी संपादकीयामध्ये प्रसिद्ध करावी.''

''आपण बळकट आहोत. कम्सामोलचे बरेचसे सभासद चांगले कामगार आहेत. त्यांच्या मदतीनं आपण अडचणींवर सहज मात करू शकू.''

पावेलच्या बोलण्याचा आवेश पाहून त्स्वेतायेव चकित झाला. खऱ्या पावेलचे दर्शन त्याला प्रथमच घडत होते. त्याचे म्हणणे बरोबर होते याची त्याला जाणीव झाली होती. पण त्याच्याशी उघडपणे सहमत होण्याची त्याची तयारी होत नव्हती. हे भाषण म्हणजे त्याच्या अधिकाराला सुरूंग होता. अशी भूमिका घेऊन तो वाद घालू लागला. तीन तास खडाजंगी झाली. शेवटी पावेलला बहुमत मिळल्याचे पाहताच त्स्वेतायेवने त्याला खोली सोडून जाण्याचा हुकूम केला व लोकशाही नियमांचा भंग केला. पावेलने आम सभेत ही बाब मांडण्याचा इशारा देऊन खोली सोडली आणि बाहेर येऊन एक दीर्घ श्वास घेतला, सिगारेट पेटवली व तोकरेव यांच्या घराकडे तो निघाला.

वर्कशॉपमधील पक्षाच्या ब्यूरोने कम्सामोलच्या ब्यूरोमधील बहुसंख्यांचा निर्णय उचलून धरला. कामाच्या शिस्तीचे उदाहरण घालून देण्याच्या महत्त्वाच्या आणि अवघड कार्याला पक्ष आणि कम्सामोलच्या गटांनी सुरुवात केली.

दुसऱ्याच दिवशी भित्तीपत्रकांमध्ये अनेक लेख प्रसिद्ध झाले व त्यामुळे रेल्वे वर्कशॉपमध्ये काहीशी खळबळ माजली. जोरदार चर्चा झडल्या. संध्याकाळी प्रचंड गर्दीत युवकांची सभा भरली व त्यात लेखांमध्ये निर्माण केलेल्या प्रश्नांचा परामर्श घेण्यात आला.

फिदिनला हाकलण्यात आले व राजकीय शिक्षणप्रमुख म्हणून पावेलची ब्यूरोवर नेमणूक करण्यात आली. नंतर तोकरेवच्या आग्रहानुसार रशियन कम्युनिस्ट पक्षांचे सदस्यत्वही त्याने स्वीकारले.

◆◆◆◆

प्रकरण चौथे

बेरेझ्दोव हे सीमेजवळचे जंगलपिछाडीचे एक छोटेसे गाव. तेथे प्रामुख्याने यहुद्यांची वस्ती होती. गावात दोनतीनशे छोटी घरे विस्कळीतपणे विखुरलेली होती. गावाच्या मधल्या मोठ्या चौकात पाचपंचवीस दुकाने होती. गावाच्या सभोवताली शेतकऱ्यांच्या झोपड्या होत्या आणि यहुद्यांच्या मध्यवर्ती विभागात जुने यहुद्यांचे देऊळदेखील होते. ती अगदी मोडकळीला आलेली भकास इमारत होती आणि शनिवारी तिथे लोकांची गर्दी होत असली तरीही जुना बहर ओसरला होता. १९१७ साली जे काही घडले होते ते खरोखर वाईट होते असे बेरेझ्दोवच्या राबीचे* मत झाले होते कारण या ओसाड गावातली तरुण पोरेही त्याला मान देईनाशी झाली होती. परमेश्वराने निषिद्ध ठरवलेले डुकराचे मांसही तरूण पोरे खाऊ लागली होती. बेरेझ्दोव प्रादेशिक केंद्र बनवले गेले हे त्याला अजिबात आवडले नव्हते.

रोज काही ना काही अप्रिय घडत होते. काल राबीच्या फाटकावर एका पाटीवर लिहिले होते, 'बेरेझ्दोव विभागीय समिती युक्रेनचा कम्युनिस्ट युवक संघ.'

आणि आज देवळाच्या दारापाशी तो पोहोचला तेव्हा तर उडालाच. देवळाच्या दारावरच एक छोटे निवेदन चिकटवलेले होते. त्यावर लिहिले होते, 'कामकरी तरुणांची सार्वजनिक सभा आत क्लबात होईल. कार्यकारी समितीचे अध्यक्ष लिसीत्सीन आणि कम्सामोल जिल्हा समितीचे हंगामी चिटणीस कोर्चागिन यांची भाषणे होतील.'

राबीने रागारागाने तो कागद टराटरा फाडला. संघर्षाला सुरुवात झाली होती.

स्थानिक चर्चला लागून असलेल्या मोठ्या उद्यानाच्या मध्यभागी एक जुन्या धाटणीचे घर होते. हे घर पूर्वी राबीचे होते. अतिशय जीर्णशीर्ण आणि भयाण वातावरण असलेले ते घर आता अगदी गजबजून गेले होते. कारण आता त्या घरात बेरेझ्दोवच्या कम्युनिस्ट पक्ष समितीचे मुख्य ठाणे होते. या ठिकाणी पावेल सार्वत्रिक लष्करी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या बटालियनचा लष्करी कमिस्सार म्हणून काम करत होता.

---

* राबी - ज्यू धर्मगुरू

नदीतून सर्पण वाहून नेणाऱ्या तराफ्यांच्या दाटीवाटीमुळे नदीचा प्रवाह अडला गेला. अचानक शरदातल्या पुराचे लोंढे येऊन सारे सरपण वाहून गेले. सरपण वाचवण्यासाठी सोलेमेन्काने पुन्हा माणसे पाठवली.

इतरांच्या मागे रहायची तयारी नसल्यामुळे सुमारे आठवडाभर पावेलने आपल्याला झालेली थंडीची बाधा लपवून ठेवली आणि किनाऱ्यावर लाकडाचे उंच ढीग रचण्यात त्याने हातभार लावला. पण बर्फाळ पाणी आणि बोचरी थंडी यामुळे त्याच्या शरीरातील जुन्या शत्रूने डोके वर काढले व त्याला सपाटून ताप भरला. दोन आठवडेपर्यंत संधीवाताने त्याचे शरीर खिळखिळे केले. जेव्हा तो इस्पितळातून परतला तेव्हा बाकड्यावर पाय फाकून काम करणेच तेवढे शक्य होते. काही दिवसांनंतर वैद्यकीय मंडळाने पावेलला काम करण्यास अयोग्य ठरवले व कामावरून कमी केले. अत्यंत जड अंत:करणाने त्याने वर्कशॉप सोडले. काठीवर भार देऊन तो हळूहळू फिरत असे. पण प्रत्येक पावलागणिक त्याला अपरंपार यातना होत. 'घरी भेटायला ये' अशी त्याच्या आईची अनेक पत्र त्याला आली होती पण दरवेळी तिची आठवण होई तेव्हा त्याला त्याचे निरोपाचे शब्द आठवत - 'तू पांगळा झाल्याशिवाय मला कधीच भेटत नाहीस.'

जिल्हा समितीत त्याला त्याची कम्सामोलची व पक्षाची नोंदणी कार्डे देण्यात आली. फारसा कुणाचा निरोप न घेता त्याने घराची वाट धरली. दोन आठवडे त्याच्या आईने त्याचे सुजलेले पाय शेकले आणि चोळले. एक महिन्यानंतर जेव्हा तो काठीशिवाय चालू लागला तेव्हा त्याच्या आनंदाला पारावर उरला नाही. पुन्हा एकादा निराशेची जळमटे झटकली. तात्काळ तो जिल्हा केंद्रात परतला. तिथे तीन दिवस त्याने काढले आणि लष्करी प्रशिक्षण तुकडी स्थापन करण्यात कार्यकर्ता म्हणून काम करण्यासाठी प्रादेशिक लष्करी मंत्रालयाकडे संघटन खात्याने त्याची पाठवणी केली.

आणखी दोन आठवडे उलटले आणि पावेल या बर्फाने झाकलेल्या छोट्या गावी दोन नंबरच्या बटालियनचा लष्करी कमिस्सार म्हणून आला. कम्सामोलच्या प्रादेशिक समितीने त्याच्यावर ही कामगिरी सोपवली होती. आसपासचे विखुरलेले कम्सामोल सदस्य एकत्र करणे व विभागात युवकसंघ स्थापन करणे अशा रीतीने आयुष्याने एक नवी झेप घेतली.

लिसीत्सीन, त्रोफीमोय आणि कोर्चागिन यांनी क्रियाशील कार्यकर्त्यांचा एक छोटा गट गोळा केला होता. सोविएतांच्या फेरनिवडणुकासाठी, दरोडेखोरांविरुद्ध लढण्यासाठी, सांस्कृतिक कार्य करण्यासाठी, चोरटी मालवाहतूक थांबवण्यासाठी ही मंडळी पहाटेपासून रात्रीपर्यंत राबत होती. शिवाय संरक्षणव्यवस्था भक्कम करण्याचे पक्षाचे आणि कम्सामोलचे काम त्यांना करावे लागत होते.

सूर्य माथ्यावर आला होता. उन्हाच्या झळा सर्वत्र भाजून काढत होत्या. कुत्रीसुद्धा

आडोशाखाली सरकून धापा टाकत आडवी पडली होती.

पावेलने घोड्याचा लगाम सोडला व गुडघ्यातील कळ दाबून सोसत त्याने खोगिरावर मांड टाकली. लगाम थोडा ढिला होताच घोडा वेगाने दुडक्या चालीत दौडला. अचानक कर्कश किंकाळ्या पावेलच्या कानी आल्या. पावेलने गर्रकन आपला घोडा मागे फिरवला. तेव्हा एक शेतकरी तरुणी धापा टाकत खेड्यात धावत येत असलेली त्याने पाहिली. आसपासच्या झोपड्यांतील म्हातारी-कोतारी डोकावून पाहू लागली. सारी धडधाकट माणसे शेतावर कामाला गेली होती.

ती शेतकरी तरुणी ओरडत होती. ''अग आईऽ गंऽऽ! भल्या माणसांनो ! लवकर चला. धावा, तिथे ते एकमेकांचा खून पाडतायत.''

पावेल जेव्हा दौडत त्या तरुणीपाशी पोचला तेव्हा तिच्या भोवती लोकांचा गराडा पडला होता व ते सारे तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती करत होते. पण तिच्या असंबंद्ध बोलण्यातून काहीच समजत नव्हते. 'खून! खून!' असे ती सारखी ओरडत होती.

''कुणाचा खून? काय भानगड आहे?'' तो तिच्यावर खेकसला.

''आपली माणसं आणि पोद्दुबेत्सची माणसं... शेतांच्या हद्दींवरून पुन्हा मारामारी चाललीय.'' आता सर्व उलगडा झाला होता. बायका रडू लागल्या आणि म्हातारे संतापून उठले. सबंध खेडेभर वेगाने बातमी पसरली. ''पोद्दुबेत्सची माणसं आपल्या लोकांना कोयत्यांनी कापून काढतायत.''

सर्वांनी हाताला येतील तशी दंताळी, कुऱ्हाडी किंवा कुंपणाच्या काठ्या हाती घेतल्या आणि ते सारे शेतांकडे निघाले. दरवर्षी त्या दोन खेड्यांमध्ये शेतांच्या हद्दीवरून रक्तपात घडत होता.

पावेलने घोड्यावर चाबूक ओढला आणि तो भरवेगाने दौडत निघाला. दर क्षणागणिक त्याचा वेग वाढत होता.

रक्तपाती लढाई चालू होती. एव्हाना अनेक माणसे घायाळ अवस्थेत जमिनीवर पडली होती. त्या झगडणाऱ्या माणसांच्या घोळक्यात पावेलने भरवेगाने आपला घोडा घुसवला व क्षणार्धात सर्वांना चारी दिशांना पांगवले. पाशवीपणे एकमेकांचे मुडदे पाडणाऱ्या या लोकांना दहशत घालूनच शांत करणे शक्य होते याची पावेलला जाणीव झाली होती.

क्रुद्ध चेहऱ्याने त्याने कमरेचे मॉसर काढून हवेत झाडले. घोडा भरभरा गिरक्या घेत होता आणि मॉसरचे बार हवेत उडत होते. या अखंडपणे गोळ्या झाडणाऱ्या संतापलेल्या घोडेस्वाराच्या तावडीतून सुटण्यासाठी शेतकरी पळत सुटले.

आठवड्यानंतर वादग्रस्त शेतांपाशी एक आयोग आला आणि त्याने हद्दीची काटेकोर मोजणी सुरू केली.

आयोगाबरोबर काम करणारा म्हातारा सर्व्हेयर टेप गुंडाळता गुंडाळता म्हणाला, ''मी

जमिनीचा सर्व्हेयर म्हणून वीस वर्षे काम करतोय आणि नेहमी या हद्दींना विभागणाऱ्या रेषांनी सगळी संकटं आणलीत. कुरणं कशी विभागली ते पाहीलंत तर तुमचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. शेतांची अवस्था तर त्याहून वाईट आहे. तीन पावलं रुंदीचे पट्टे आणि ते एकमेकांना आडवे गेलेले. आणखी वीस वर्षांनंतर कसायला जमीन शिल्लक उरायची नाही. नुसतेच बिननांगरल्या बांधाचे पट्टे राहतील. आतासुद्धा दहा टक्के जमीन अशीच वाया चालली आहे.''

पावेल हसला. ''कॉम्रेड सर्व्हेयर, आणखी वीस वर्षांनी आपल्याकडे एकही बिननांगरलेला बांध राहायचा नाही.''

''तुम्ही कम्युनिस्ट समाजाबद्दल म्हणता? ती फार दूरची बाब आहे.''

''बुदानिव्का सामुदायिक शेताबद्दल तुम्ही ऐकलंत?''

''होय, मी बुदानिव्काला गेलो होतो. पण कॉम्रेड कोर्चागिन तो अपवाद आहे.''

आयोगाची माणसे मोजमाप करत होती आणि खुंट्या बरोबर ठोकल्या जातात का नाही हे पाहायला दोन्ही बाजूंना शेतकरी डोळ्यांत तेल घालून उभे होते.

यंदा ऑक्टोबर क्रांतीचा वाढदिवस सीमेवर नेहमीपेक्षा जास्त उत्साहाने साजरा करण्यात आला. सीमेवरील खेड्यांमधून उत्सव संयोजित करणाऱ्या समितीच्या अध्यक्षपदी पावेलची निवड झाली होती. पोद्दुबेत्समध्ये सभा झाल्यानंतर शेजारच्या तीन खेड्यांतील पाच हजार शेतकऱ्यांची अर्धा कि. मीटर लांबीची एक मिरवणूक सीमेच्या दिशेने निघाली. मिरवणुकीच्या अग्रभागी प्रशिक्षण बटालियन होती. लष्करी बँड वाजत होता व शेतकऱ्यांच्या हाती तांबड्या किरमिजी पताका होत्या. सीमाचौक्यांशी समांतर जाणाऱ्या रस्त्याने, खेड्यातून ती चालली होती. पोल लोकांनी अशी मिरवणूक कधीही पाहिली नव्हती. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर पताका सळसळत होत्या आणि लोकांच्या गाण्याचे सूर दूरपर्यंत घुमत होते.

सारं सारं जग आसवांनी भिजलेय
हाल हाल सोसत आमचं आयुष्य सरलंय
पण थांब, तेजस्वी पहाट उजाडतेय...
महापुरासारखं आमचं गाणं जगभर पसरलंय
दिमाखानं आमची पताका फडकतेय
आमच्या काळजातल्या रक्ताच्या आगीनं
साऱ्या जगभर ती भडकून उजळतेय...

सणासुदीचा उत्तम पोशाख केलेले किसान तरुण मोठ्या उत्साहात होते, खेडेगावच्या मुली चिवचिव करत होत्या, आनंदाने खिदळत होत्या. मोठी माणसे गंभीर चेहऱ्याने चालत होती, तर म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद विलसत होता. नजरेचा पल्ला

पोहोचत होता तिथपर्यंत मानवी सागर पसरला होता. सोविएत पहारेकरी सुहास्य मुद्रेने स्वागत करत होते पण पोलिश पहारेकरी मात्र गोंधळले होते. एक पोलिश पहारेकरी सीमारेषेवर उभा होता. मिरवणूक जवळ आली तशी त्याने झटकन रायफल बाजूला धरून सलामी दिली आणि पावेलच्या कानावर हळू आवाजातले शब्द पडले, 'कम्यून चिरायू होवो.'

पावेलने चकित होऊन त्याच्याकडे टक लावून पाहिले. त्या सैनिकी गणवेशाच्या आतील हृदयाची स्पंदने मिरवणुकीविषयी सहानुभुती व्यक्त करीत होती. तो ही हळूच पुटपुटला, ''नमस्ते कॉम्रेड!''

एव्हाना मिरवणुकीचा पुढचा भाग टेकडी उतरत होता. नदीच्या काठी सीमेवरील पुलावर सारे रहिवासी वाट बघत होते. रस्त्याच्या दुतर्फा ते उभे होते. पोलिश बाजूच्या झोपड्यांच्या आणि गोठ्यांच्या छतावर लोकांची झुंबड उडाली होती. झोपड्यांच्या पायऱ्यांवर आणि बागांच्या कुंपणांपाशी शेतकऱ्यांचे जमाव उभे होते. मिरवणूक जेव्हा ग्रामवासियांच्या चौकटीत शिरली तेव्हा बँडने 'इंटरनॅशनल गीत' वाजवायला सुरुवात केली. नंतर पानाफुलांनी सजवलेल्या व्यासपीठावरून आवेशपूर्ण भाषणे झाली. त्यांच्या जहाल शब्दांमुळे पोलिश बाजूच्या लोकांच्या भावना भडकतील म्हणून पोलिसांनी खेडूतांना पांगवायला आरंभ केला. हवेत चाबूक कडाडले आणि रायफलींचे बार उडाले.

रस्ते ओस पडले. पोलिश पोलिसांनी उडवलेल्या काडतुसांना घाबरून छपरांवरची तरुण मंडळी पसार झाली. सोविएत बाजूच्या लोकांनी हे दृश्य पाहिले तेव्हा त्यांचे चेहरे गंभीर झाले. जे काही घडले होते ते पाहून संतापलेला एक म्हातारा धनगर खेडूत व्यासपीठावर चढला आणि आवेशाने बोलू लागला. ''माझ्या पोरांनो, पाहिलंत? हे असंच आपल्याला वागवलं जात होतं. पण आता नाही. आम्हा शेतकऱ्यांवर चाबूक उडवायची आता कुणाचीही हिंमत नाही. श्रीमंतांचा आणि त्यांच्या चाबकाच्या माराचा आपण निकाल लावलाय. आपण आता सत्तेवर आहोत आणि माझ्या मुलांनो, ही सत्ता भक्कम धरून ठेवणं आता तुमच्या हाती आहे. आम्हाला त्या पलिकडच्या लोकांचे दैन्य बघून वाईट वाटतंय.'' आपल्या थरथरत्या हाताने त्याने नदीचा दुसरा तीर दाखवला व तो रडू लागला.

एके दिवशी पोद्दुबेत्सहून निरोप्याने एक बातमी आणली. कुणी अज्ञात हल्लेखोरांनी आदल्या रात्री खोरोविदचा खून केला होता. आपल्या पायांमधील वेदना विसरून पावेल तात्काळ कार्यकारी समितीच्या तबेल्यांकडे धावला. घाईघाईने त्याने घोड्यावर खोगीर चढवले आणि भरवेगाने दौडत तो सीमेकडे निघाला.

झोपडीत फरच्या डहाळ्यांमध्ये एका टेबलावर खोरोविदचा पार्थीव देह ठेवला होता आणि सोविएतची लाल ध्वजा त्याच्या अंगावर पांघरली होती. एक सीमारक्षक आणि एक कम्सामोल बाहेर दारावर पहारा देत होते. पावेल आत गेला व त्याने ध्वजा बाजूला केली.

मेणासारख्या थिजलेल्या चेहऱ्याचा, मृत्यूच्या वेदनेने डोळे विस्फारलेला खोरोविद एका बाजूला मान कलंडून पडला होता. कुठल्यातरी तीक्ष्ण हत्याराने त्याच्या डोक्याच्या मागील बाजूस आघात करून त्याला ठार मारले होते.

त्याच्या विधवा आईचा तो एकुलता एक मुलगा होता. चक्की कामगार आणि गरीब किसान समितीचे सभासद असलेले त्याचे वडील क्रांतीसाठी लढता-लढता धारातीर्थी पडले होते.

खोरोविदच्या हत्येमुळे सारे खेडे संतापले होते.

या बातमीने कमालीची बेचैन झालेली रकीतीना आपल्या खोलीत हमसाहमशी रडत होती. पावेल आत आला. ''रकीतीना, त्याला कुणी ठार मारलं असावं असं तुला वाटतं?'' पावेलने घोगऱ्या आवाजात विचारले.

''चक्कीतली टोळी असणार, त्या चोरट्या व्यापाऱ्यांच्या वाटेत खोरोविद नेहमीच काट्यासारखा त्यांना खुपत होता.''

खारोविदच्या अंत्ययात्रेला दोन खेड्यांमधली माणसे लोटली. पावेलने आपली बटालियन आणली होती. सबंध कम्सामोल संघटनाही हजर होती.

ते सारेजण त्याच्या मृत्यूने एकवटले. तरुण शेतमजुरांनी आणि गरीब किसानांनी कम्सामोलला पाठिंबा देण्याच्या शपथा घेतल्या. खुन्यांना शासन केलेच पाहिजे. भर चौकात त्यांच्यावर खटला चालवला जावा अशा मागण्या करण्यात आल्या.

तीन फैरी झाडण्यात आल्या आणि थडग्यावर फरच्या ताज्या डहाळ्या पसरण्यात आल्या.

एका आठवड्यानंतर गावातील थिएटरमध्ये सोविएतांची दुसरी विभागीय काँग्रेस भरली तेव्हा धीरगंभीर पण विजयी सुरात लिसीत्सीन म्हणाला, ''कॉम्रेडस्, गेल्या वर्षात आपण खूप काही साध्य केले हे जाहीर करायला मला अत्यंत आनंद होत आहे. जिल्ह्यात सोविएत सत्ता भक्कमपणे स्थापन झालीय, दरोडेखोरीचं उच्चाटन झालंय, चोरटा व्यापार जवळजवळ निपटून टाकण्यात आलाय. खेड्यांमधून गरीब किसानांच्या भरभक्कम संघटना अस्तित्वात आल्यात. कॉम्रेड खोरोविदकोचा ज्यात बळी गेला ते पोद्दुबेत्समधील कुलक-कारस्थान उघडकीला आणण्यात आलंय. चक्कीवाला आणि त्याचा जावई अशा खुन्यांना अटक झालीय. खेड्यातल्या अनेक प्रतिनिधी मंडळांनी मागणी केलीय की, या दरोडेखोरांना आणि दहशतवाद्यांना सर्वोच्च शासन करण्यात यावे. अशा आशयाचा ठराव काँग्रेसने मंजूर करावा.''

टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने सारे सभागृह दणाणले. 'शाब्बास! सोविएत सत्तेच्या शत्रूंचा नायनाट होवो.'

लिदा पोलेवीख एका बाजूच्या दारात येऊन उभी होती. तिने पावेलला बाहेर येण्याची खूण केली. 'तातडीचे' असे लिहिलेला एक लखोटा तिने त्याच्या हवाली केला. त्याने तो उघडून वाचला. 'कम्सामोलच्या बेरेझ्दोव विभागीय समितीला उद्देशून जिल्हा समितीच्या

निर्णयानुसार जबाबदारीच्या कम्सामोल कार्यासाठी कॉम्रेड पावेलला विभागीय समितीमधून जिल्हा समितीमध्ये परत बोलावून घेण्यात येत आहे.'

गेले वर्षभर पावेलने जेथे काम केले होते त्या विभागाचा त्याने निरोप घेतला. जेव्हा आवारातून पावेलचा घोडा रस्त्यावर वळला तेव्हा डझनभर पिस्तुलांनी बार उडवून निरोपाची सलामी दिली.

◆◆◆◆

प्रकरण पाचवे

जिल्हा समितीचे सायंकालीन अधिवेशन सुरू झाले होते. पक्ष समितीच्या आंदोलन आणि प्रचार खात्याचे प्रमुख - सेगाल, अध्यक्ष मंडळात तोकरेव यांच्या शेजारी बसले होते व प्रतिनिधींची भाषणे लक्षपूर्वक ऐकत होते. आत्तापर्यंत झालेली सर्व भाषणे केवळ तरूण मंडळींची होती व ती सारी अद्याप कम्सामोलमध्ये काम करीत होती. 'गेल्या काही वर्षात ही तरुण मंडळी किती प्रौढ बनलीत...!' सेगाल यांच्या मनात येत होतं. ''विरोधकांना आता बराच मार बसलाय.'' सेगाल तोकरेवना म्हणाले. ''आणि अवजड तोफखाना अजून मैदानात उतरवलेला नाही. तरुण मंडळी त्रॉत्स्कीवाद्यांचा धुव्वा उडवतायत.''

तेवढ्यात तुफ्ता झेप घेऊन व्यासपीठावर आला. नापसंतीचा जोरदार गोंगाट झाला आणि हास्याच्या काही लकेरी उमटल्या. ''तुम्ही जर बहुमतवादी गट बनवताय, तर आम्हाला अल्पमतवाल्यांचा गट बनवायचा हक्क आहे.'' तो कर्कश, तारस्वरात बोलत होता.

सभागृहात कल्लोळ माजला.

तुफ्तावर सर्व बाजूंनी संतापाच्या उद्‌गारांचा पाऊस कोसळू लागला.

''हे काय? पुन्हा बोल्शेविक - मेन्शेविक? रशियन कम्युनिस्ट पक्ष म्हणजे पार्लमेंट नव्हे!''

तुफ्ताने रागाने हात उडवले आणि उत्तेजित स्वरात म्हटले, ''बरोबर, गट स्थापन करण्याचं स्वातंत्र्य आम्हाला असलं पाहिजे. नाहीतर अशा सुसंघटित शिस्तबद्ध बहुमतवाल्यांविरुद्ध आम्ही भिन्नभिन्न विचारांची माणसं आमच्या मतांसाठी कशी लढणार?'' आरडाओरडा अजूनच वाढला. पानक्रातोवने सगळ्यांना सांगितले, ''त्याला बोलू द्या. त्याला काय म्हणायचंय ते ऐकून तर घेऊ.''

सभागृह शांत झाले. आपण फार वाहवत गेलो हे तुफ्ताला जाणवले. त्याने आपले भाषण आटोपते घेतले. ''अर्थात तुम्ही आमची हकालपट्टी करून आम्हाला ढकलून देऊ शकता. कम्सामोलच्या जिल्हा समितीमधून तुम्ही मला आधीच हाकलून लावलंय. पण हरकत नाही. कोणाची बाजू सत्याची हे लवकरच कळेल.'' असे म्हणून त्याने खाली उडी घेतली.

यानंतर स्वेतायेवने दुबावाला चिट्ठी धाडून बोलायला सांगितले पण त्याचे भाषण संपले तेव्हा सभागृहात जणू बाँबचा गोळा फुटल्याचा भास झाला. चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणे लोकांचे शब्द उफाळू लागले.

''मला बोलायचंय.'' पानक्रातोवच्या शब्दांबरोबर सभागृह शांत झाले. तो आतून संतापाने उकळत होता. ''कॉम्रेड हो, नऊ दिवस आपण विरोधकांची भाषणं ऐकून घेत आहोत आणि मला प्रांजलपणे असं म्हणायचं आहे की बरोबरचे लढवय्ये, क्रांतिकारक, वर्गलढ्यातले आमचे सहकारी अशा नात्यानं ते बोलले नाहीत. त्यांची भाषणं शत्रुत्वानं, अतिद्वेषानं, दुष्टाव्यानं आणि निंदेनं पुरेपूर भरलेली होती. आम्ही बोल्शेविक म्हणजे पक्षातल्या आडदांड राजवटीचे पाठीराखे आहोत, आपल्या वर्गाच्या आणि क्रांतीच्या हितसंबंधांचा विश्वासघात करणारे लोक आहोत असं भासविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आमच्या पक्षातल्या अत्यंत तावून सुलाखून निघालेल्या आणि विश्वासू विभागाला बोल्शेविकांच्या गौरवशाली जुन्या रक्षकांना, रशियन कम्युनिस्ट पक्षाची उभारणी ज्यांनी केली, झारच्या तुरुंगामध्ये ज्यांनी कारावास भोगले, जागतिक मेन्शेविकवादाविरुद्ध आणि त्रॉत्स्कीविरुद्ध ज्यांनी कॉम्रेड लेनिन यांच्या पुढारीपणाखाली निष्ठूर लढा दिला त्या लोकांना पक्षातील नोकरशहा म्हणून शिक्का मारण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. शत्रूशिवाय असली विधानं कोण करू शकेल? पक्ष आणि कार्यकर्ते हे सारे मिळून एक नाहीत काय? तरुण लाल सैनिकांना त्यांच्या कमांडरांविरुद्ध आणि कमिस्सारांविरुद्ध, सैन्याच्या मुख्य ठाण्याविरुद्ध चिथावण्याचा जे लोक प्रयत्न करतात, अशा लोकांना तुम्ही काय म्हणणार? त्रॉत्स्कीवाद्यांच्या मताप्रमाणे मी जोपर्यंत मेकॅनिक आहे तोपर्यंत ठीक आहे. पण उद्या जर मी पक्ष समितीचा चिटणीस झालो तर मात्र मी नोकरशहा आणि खुर्ची उबवणारा ठरतो. पण मध्यमवर्गीय प्रवृत्तीविरोधी लढ्यात बोल्शेविक पक्ष आणि कम्सामोल कणखर बनलेत. आमच्या महान पक्षाला, पक्ष-ऐक्याला आम्ही तडा जाऊ देणार नाही. जुन्या आणि नव्या रक्षकांमध्ये कधीही फूट पडू देणार नाही. मध्यमवर्गीय प्रवृत्तीविरोधी निष्ठूर लढ्यात, लेनिन यांच्या ध्वजेखाली आम्ही विजयाकडं वाटचाल करू!''

कड्याक्याची थंडी घेऊन एकोणीसशे चोवीस साल इतिहासात उगवले. बर्फाच्छादित जमिनीवर जानेवारी महिन्याने आपला थंडगार विळखा घातला.

शेपेतोवका स्टेशनच्या तार कचेरीत तीन यंत्रांची कडकड अखंड चालू होती. जुन्या तार ऑपरेटरच्या कानांनी शब्द हेरले. ''सर्वांसाठी, सर्वांसाठी, सर्वांसाठी.'' 'बर्फ साफ करण्याबाबतची सूचना असावी.' तारमास्तर मनाशी म्हणाला आणि त्याने फितीवर नजर फिरवली. ''२१ जानेवारीला सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी...'' ते शब्द चटकन

लिहून घेऊन त्याने फीत खाली टाकली व पुढचा संदेश ऐकू लागला. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्याने कितीतरी संदेश ऐकले होते. आनंदाचे तसेच दु:खाचे, त्यांच्या अर्थाचा विचार करण्याचे त्याने केव्हाच सोडून दिले होते.

आतासुद्धा कुणीतरी मेले होते. आणि कुणाला तरी ते कळवले जात होते. तार यंत्राने अक्षरे ठोकली, 'ब्ला...दि...मि...र...इ...ल्यि...च...' मुळीसुद्धा विचलित न होता त्याने ते लिहून घेतले. कुणीतरी ब्लादिमिर इल्यिच मेला होता. पण त्याच्याशी तारमास्तरला काही एक कर्तव्य नव्हते कारण तो केवळ योगायोगाने या सर्वाला साक्षी होता. तारयंत्राने टिंब ठोकले, आडवी रेघ, पुन्हा टिंबे आणखी आडवी रेघ आणि परिचित आवाजांमधून त्याला पहिले अक्षर समजले. 'ले' नंतर 'नि' आणि तिसरे 'न'.

तारयंत्राची पुढची कडकड सुरू झाली. पण ते सुपरिचित नाव तारमास्तरच्या काळजात आता टोचत होते. त्याने संदेशावर पुन्हा एकदा नजर टाकली. 'लेनिन' काय? लेनिन? तो डोळे विस्फारून पाहू लागला. आपल्या ३२ वर्षांच्या कारकिर्दीत आपण काय लिहिले यावर प्रथम त्याचा विश्वास बसेना.

तो तीनतीनदा वाचत होता. पण ते शब्द हट्टाने बदलायला तयार नव्हते. 'ब्लादिमिर इल्यिच लेनिन यांचे देहावसान.' म्हातारा तारमास्तर ताडकन उठला. पांढऱ्याफटक चेहऱ्याने आपल्या सहकाऱ्यांकडे वळला आणि त्याची भेदरलेली आरोळी सर्वांना ऐकू गेली, ''लेनिन वारले.''

ती भयंकर बातमी तारकचेरीच्या रुंद उघड्या दारातून बाहेर निसटली आणि वादळाच्या वेगाने स्टेशनभर पसरून बाहेर थैमान घालणाऱ्या हिमवादळात मिसळली व रुळांना आणि स्विचना तडाखे देत रेल्वे वर्कशॉपच्या लोखंडी फाटकातून बर्फाळ वाऱ्याच्या झोतांबरोबर आत घुसली.

रेल्वे वर्कशॉपमध्ये लोकांनी गर्दी केली. सगळ्या गेटांमधून त्यांचे लोंढे वर्कशॉपमध्ये वाहात येत होते. सारी इमारत लोकांनी गच्च भरून गेली तेव्हा विलक्षण गंभीर शांततेत शोकसभा सुरू झाली. पक्षाच्या शेपेतोवका प्रादेशिक समितीचे चिटणीस, जुने बोल्शेविक, शाराब्रीन यांनी भाषण केले.

''कॉम्रेड हो! जागतिक कामगारवर्गाचे पुढारी लेनिन वारले. पक्षाची अपरिमित हानी झालीय. कारण बोल्शेविक पक्ष निर्माण करणारा आणि शत्रूंशी कडवेपणानं त्याला वागायला शिकवणारा माणूस आता आपल्यात राहिला नाही... आपल्या पक्षाच्या आणि वर्गाच्या पुढाऱ्याची मृत्यूची बातमी म्हणजे कामगारवर्गाच्या सुपुत्रांनी दाखल होण्याचं बोलावणं आहे....''

शोकगीताचे सूर उमटले तेव्हा सर्वांनी टोप्या काढल्या.

रेलकामगारांच्या क्लबच्या भिंती जणू मानवी समुदायाच्या दाबाखाली कण्हत होत्या. अतिदु:खाने माणसांचे आवाज घुसमटले होते. ते अत्यंत खालच्या आवाजात बोलत होते. अनेकांच्या डोळ्यात दु:खाच्या आणि चिंतेच्या छटा स्पष्ट दिसत होत्या. तुफानामध्ये कर्णधार गमावलेल्या गलबताच्या खलाशांप्रमाणे त्यांची अवस्था झाली होती.

मुख्य भाषण झाल्यावर पक्ष संघटनेचे चिटणीस सीरोतेन्को बोलायला उठले. ते म्हणाले, ''पक्षाच्या सदस्यत्वासाठी केलेल्या अर्जाचा या सभेत विचार व्हावा, अशी अनेक कामगारांनी मागणी केलीय. अर्जावर सदतीस कॉम्रेडांच्या सह्या आहेत.''

यानंतर पलितोवस्की, आर्त्योम, झखार, ब्रुझाक इ. रेल कामगारांची नावे व्यासपीठावरून पुकारण्यात आली आणि सभेने विचारविनिमय करून योग्य त्या सर्वांना पक्षात दाखल करून घेतले.

पक्षातील या नव्या नेमणुकांचा आढावा घेण्याचे काम रात्री बराच उशीरापर्यंत चालले होते. ज्यांच्याबद्दल सर्वांना माहिती होती, ज्यांची चरित्रे निष्कलंक होती, अशाच सर्वोत्तम लोकांना पक्षात प्रवेश देण्यात आला होता.

लेनिन यांच्या मृत्यूमुळे हजारो कामगार बोल्शेविक पक्षात दाखल झाले. पुढारी गेला होता, पण पक्षाच्या फळ्या अविचल राहिल्या. ज्या वृक्षाची मुळे खोल जमिनीत रुजलेली असतात त्या वृक्षाचा तुरा छाटला गेला तरी तो वृक्ष नाश पावत नाही.

◆◆◆◆

प्रकरण सहावे

युक्रेनी प्रतिनिधीमंडळाच्या सभेमध्ये रीता पोहोचली तेव्हा सभा संपत आली होती. अध्यक्ष आढावा घेत होते. त्यांचा आवाज रीताला परिचित वाटला.

''अखिल रशिया काँग्रेसच्या कौन्सिलची निवड आता झालीय. आणखी दोन तासांनी काँग्रेस सुरू होईल. दरम्यान मी पुन्हा एकदा प्रतिनिधींची यादी वाचतो.''

अकीम घाईघाईने यादी वाचत होता तेव्हा रीता ध्यान देऊन ऐकत होती. नाव जाहीर होताच तो प्रतिनिधी हात वर करून स्वत:चा लाल किंवा पांढरा पास दाखवत होता.

रीताने अचानक एक ओळखीचे नाव ऐकले 'पानक्रातोव', नंतर 'ओकुनेव' त्यापाठोपाठ 'झार्कीय'. नावांची यादी चालूच होती. या कित्येकांना तिने गेली कित्येक वर्षे पाहिलेसुद्धा नव्हते.

अकीमने एक नाव वाचले आणि रीता जोरात दचकली. ''कोर्चागिन''

खूप दूरवर पहिल्या रांगेमध्ये एक हात वर गेला आणि खाली आला. आपल्या मृत

कॉम्रेडच्या नावाशी साधर्म्य असलेल्या त्या व्यक्तीचा चेहरा पाहण्याची रीताला तीव्र इच्छा झाली. जेथे हात वर आला तिथून नजर हलवणे तिला शक्य होईना.

अकीमचे वाचणे संपले. खुर्च्या मागे सरकवल्या गेल्या व सबंध हॉलमध्ये तरुणांच्या बोलण्याचा, हसण्याचा आवाज भरला. रीताला आपल्या जुन्या मित्रांना शोधायचे होते. परंतु दाराशी प्रतिनिधींनी गर्दी केली होती त्यामुळे ते अशक्यच वाटत होते. तेवढ्यात प्रतिनिधींचा एक गट तिच्या अगदी जवळून गेला आणि कोर्चागिनचा चिरपरिचित आवाज तिच्या कानांवर पडला.

रीता झर्रकन मागे वळली. खाकी कुडता, निमुळता कॉकेशियन पट्टा आणि निळी तुमान अशा वेशातील एक रापट रंगाचा तरुण तिच्यासमोर उभा होता.

रीता डोळे फाडफाडून त्याच्याकडे बघत होती. तेवढ्यात त्यांच्या हातांचा विळखा तिच्याभोवती पडला आणि त्यांचा आवाज हळूच तिच्या कानी आला. ''रीता!'' तो पावेलच होता.

''तू जिवंत आहेस?'' त्या शब्दांमधून सारे काही समजले. त्याच्या मृत्यूची बातमी चुकीची होती हे तिला ठाऊक नव्हते.

आता तो तिच्यापेक्षा वीतभर उंच झाला होता. अधिक परिपक्व झाला होता. त्याच्यात अधिक आत्मविश्वास निर्माण झालेला जाणवत होता. पण एरवी तो तिला परिचित असलेला पूर्वीचाच पावेल होता.

''तू कुठं काम करतोस आता?''

''कम्सामोलच्या प्रादेशिक समितीचा मी चिटणीस आहे. दुबावच्या भाषेत कारकून!'' स्मित करत पावेल उत्तरला.

ती दोघे रस्त्यावर आली. ते एकमेकांशी बोलत नव्हते, तरी त्या दोघांच्या मनात विचार मात्र एकच चालले होते.

एका स्टॉलच्या मागच्या रिकाम्या आसनाकडे बोट दाखवून रीता म्हणाली, ''तिथं बसू या.''

ती दोघे बसल्यानंतर रीता म्हणाली, ''मला एक प्रश्न विचारयचाय. त्याचा संबंध आपल्या पूर्वीच्या दिवसांशी आहे. त्यावेळी आपला अभ्यास आणि मैत्री तू तोडून का टाकलीस?''

''रीता, मला वाटतं तुला उत्तर ठाऊक आहे. खरं म्हणजे कोर्चागिननं आयुष्यात लहान मोठे अनेक गोंधळ केले, त्यातलाच हा एक होता!'' पावेल बोलत होता. ''आपल्या पवित्र कार्याला वाहून घेतलेल्या खंबीर धैर्यशील क्रांतिकारकांची ठळक वर्णनं करणाऱ्या पुस्तकांचा त्या काळात माझ्यावर फार मोठा पगडा होता. त्या लोकांसारखंच होण्याची माझी धडपड होती. तुझ्या बाबतीत सुद्धा माझ्या ज्या भावना निर्माण झाल्या होत्या त्याच्यावर 'गोमाशी'

पुस्तकाचा प्रभाव होता. आता मला तो सारा वेडपटपणा वाटतो.''

''पण 'गोमाशी'च्या नायकाचं धैर्य, विलक्षण सहनशक्ती, या गोष्टींचा मी अजूनही आदर करतो. एकूण समाजापुढे वैयक्तिक सुखदु:ख क:पदार्थ मानणारा क्रांतिकारक मला आवडतो.''

''पावेल, हे मला तू तीन वर्षांपूर्वी सांगितलं नाहीस याचं मला वाईट वाटतं''. रीता स्मित करीत म्हणाली.

''वाईट अशासाठी की केवळ एक कॉम्रेड या पलीकडं आपलं नातं गेलं नाही म्हणून?''

''नाही पावेल, याहून जास्त तुझं-माझं नातं जमलं असतं.''

''मग त्या चुकीची भरपाई अजूनही करता येईल.''

''नाही कॉम्रेड गोमाशी, त्याला आता फार उशीर झालाय. मला आता एक छोटी मुलगी आहे.'' रीताने हसत खुलासा केला. ''आणि तिच्या वडिलांवर माझं खूप प्रेम आहे.''

पावेलच्या हाताला आपल्या बोटांनी तिने हलकासा स्पर्श केला. पण गेल्या तीन वर्षांत शरीरानेच नव्हे तर मनानेही तो वाढला होता. तिच्या खुल्या कबुलीमुळे त्याला वाईट वाटल्याचे जाणवत होते तरी तो एवढेच म्हणाला, ''आता मी जे गमावलं त्यापेक्षा जे मी ठेवलंय ते खूपच मोठं आहे.'' त्याचे शब्द पोकळ नव्हते, त्यांच्यात सत्य सामावलं होतं याची रीताला जाणीव होती.

व्यासपीठाशेजारी जागा घेण्याची वेळ झाली होती. ती दोघे उठली आणि युक्रेनी प्रतिनिधींच्या रांगेकडे गेली. बँड वाजू लागला. 'भविष्यकाळ आमचा आहे' असे सांगणाऱ्या किरमिजी रंगाच्या पताका हॉलमध्ये फडकू लागल्या. थिएटरचा कोपरा न् कोपरा माणसांनी गच्च भरला होता. अखंड शक्तीच्या झऱ्याने स्पंदणाऱ्या एका महाबलाढ्य यंत्रणेमध्ये ते सारे एकवटले होते.

क्रांतीच्या वैभवाची आणि सामर्थ्याची एवढ्या प्रकर्षाने जाणीव पावेलला यापूर्वी कधी झाली नव्हती. बोल्शेविकवादाच्या तरुण रक्षकांच्या या दिग्विजयी मेळाव्याला हजर राहण्याचे भाग्य आपल्याला लाभले या विचारासरशी त्याचं मन आनंदोर्मिनी, अभिमानाने भरून आले.

दोन वर्षे उलटली. बाह्यत: एकसुरी वाटणाऱ्या जीवनातील बहुविध घटनांचा पट एवढ्या झरझर उलटत होता की कुठलेही दोन दिवस सारखे नव्हते. अज्ञात संपत्तीसह आपल्या प्रचंड भूमीचे भवितव्य स्वत:च्या हाती घेणाऱ्या जगातल्या पहिल्याच लोकांचे - सोळा कोटींचे - महान राष्ट्र आपल्या युद्धजर्जर अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन घडविणाऱ्या विराट कार्यात गुंतले होते. देश अधिक सामर्थ्यवान बनला होता. त्याच्या धमन्यांमधून नवा जोम वाहू लागला होता.

पावेलची ही दोन वर्षे अखंड कामात गेली होती. या दोन वर्षांमध्ये भांडवलाच्या तिसऱ्या

खंडाचा त्याने बारकाईने अभ्यास केला होता व भांडवलदारी शोषणामधील सूक्ष्म तंत्रांची त्याला आता माहिती झाली होती.

उन्हाळा सरला. शरदाची आणि हिवाळ्याच्या आगामी चाहूलीची पावेलला भीती वाटत होती. कारण या दोन्ही मोसमांत त्याला विलक्षण शारीरिक पीडा भोगावी लागे. त्याची ताकद दरवर्षागणिक क्षीण होत चालली होती आणि त्यावर दोनच पर्याय होते - कामासाठी पडणारा ताण सहन होत नाही असे मान्य करून स्वत:ला अपंग म्हणून जाहीर करणे अथवा जमेल तितके दिवस काम करीत राहणे. त्याने दुसरा मार्ग पत्करला होता.

एके दिवशी, पक्षाच्या प्रादेशिक समितीच्या ब्यूरोच्या बैठकीला डॉ.बार्तेलिक आले होते ते प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य खात्याचे प्रमुख म्हणून काम करत होते. बैठकीला आले तेव्हा ते पावेलच्या शेजारी बसले.

''पावेल, तुझा चेहरा काही बरा दिसत नाही. तू माझ्याकडे ये, म्हणजे पूर्ण तपासणी करू.'' पावेल बरेच दिवस अतिकामामुळे गेला नाही. पण बार्तेलिक विसरले नाहीत. त्यांनी त्याला वैद्यकीय तपासणी मंडळाकडे नेले. वैद्यकीय तपासणी मंडळाने शिफारस केली की, पावेलने तात्काळ क्रिमियात जाऊन प्रदीर्घ काळ उपचार घ्यावेत आणि त्यानंतर पुन्हा नियमित उपचार घ्यावेत. नाहीतर त्याला गंभीर परिणामांना अटळपणे तोंड द्यावे लागेल.

त्याचा विकार त्याच्या पायांमध्ये नव्हता, तर त्याच्या केंद्रीय मज्जासंस्थेत होता. त्याच्या मणक्याला गंभीर इजा झाली होती.

बार्तेलिकनी वैद्यकीय तपासणी मंडळाचा निर्णय ब्यूरोपुढे मांडला आणि पावेलला ताबडतोब कामातून मुक्त करावे असा प्रस्ताव मांडला. त्यांच्या प्रस्तावाला कुणीही विरोध केला नाही. पण संघटन खात्याचे प्रमुख स्वीलेच परत येईपर्यंत आपली सुटी पुढे ढकलावी असे खुद्द पावेलनेच सुचविले. पुढाऱ्याशिवाय समिती सोडून जाणे त्याला नको होते. ब्यूरोने पावेलचे म्हणणे मान्य केले.

आणखी तीन आठवड्यांनी तो सुटीवर जाणार होता. आयुष्यातली ही त्याची पहिलीच सुटी. सुटीवर जाण्यापूर्वी सर्व काही ठाकठीक असावे म्हणून सर्व अपुऱ्या बाबी पूर्ण करण्यासाठी तो अहोरात्र झटत होता.

तीन आठवड्यांनंतर चांगले शिफारसपत्र देऊन मध्यवर्ती समितीने त्याला कामातून मोकळे केले.

मध्यवर्ती समितीचे 'कोम्युनार सॅनिटोरियम' गुलाबांची झुडुपे आणि चमचमत्या कारंज्यांमध्ये द्राक्षेवेलींनी वेढलेल्या पांढऱ्या शुभ्र इमारती, शुभ्र उन्हाळी पोषाखातील आणि पोहण्याच्या वेषातील सुटी घालवणारी माणसे... एका तरुण डॉक्टरणीने पावेलचे नाव

नोंदबुकात लिहिले आणि कोपऱ्यावरच्या इमारतीत त्याला एक प्रशस्त खोली मिळाली. पांढरी शुभ्र बिछान्यावरची चादर, विलक्षण स्वच्छता, गाढ शांतता, पवित्र, अभंग शांतता!

आंघोळ करून ताजातवाना झालेला पावेल लगबगीने सागरतीरावर गेला.

त्याच्यासमोर शांत, भव्य सागर पसरला होता. निळ्याशार काळसर रंगाचा तो चकचकीत संगमरवरी विस्तार पार क्षितिजापर्यंत पसरला होता. दूर अंतरावर जेथे सागर आकाशाशी भिडला होता तेथे निळसर धुके दाटले होते. त्याच्या पृष्ठभागावर सूर्याच्या ओतीव गोळ्याची लाल आभा फाकली होती. सागरावरून येणाऱ्या ताज्या, जोमदार झुळुकीला पावेलने श्वास भरून घेऊन छातीत सामावले. समोरची नि:स्तब्ध विस्तीर्ण निळाई पाहून त्याचे डोळे निवले.

किनाऱ्यावर सोनेरी वाळूला चाटत एक लाट लडिवाळपणे त्याच्या पायांशी उलगडत गेली.

◆◆◆◆

प्रकरण सातवे

सॅनिटोरियममधील पहिल्या काही दिवसात त्याच्या तणावलेल्या स्नायूंना मुळीच आराम लाभला नव्हता व त्याचे डोके दुखणे चालूच होते. सॅनिटोरियमचे डॉक्टर अजूनही त्याच्या आजारापायी गोंधळलेलेच होते. पावेलच्या आजाराचे मूळ शोधण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. सारख्या चालू असलेल्या तपासण्यांनी पावेल त्रासला होता. त्या तपासण्यांमुळे तो थकून जात असे. पण तिथे भेटलेल्या दोरा रोदकिना या खार्कोव नगरसमितीच्या ब्यूरो सदस्य असलेल्या युवतीशी त्याच्या झालेल्या मैत्रीमुळे त्याला तिथे राहणे थोडे सुसह्य होऊ लागले.

एक दिवस योगोयोगाने सॅनिटोरियमच्या आवारात पावेलची त्याच्या जुन्या मित्राशी झार्कियाशी गाठ पडली. दुपारच्या भोजनानंतरच्या खुल्या पटांगणातील करमणुकीच्या कार्यक्रमात एक खुळचट टोपी घातलेला अर्धनग्न जाडा पुरुष आणि त्याला बिलगलेली बाहुलीसारखी बाई अत्यंत सूचक, अश्लील हालचाली करत फॉक्सट्रॉट नाचाच्या वेगवेगळ्या मुद्रा नाचत होते. ते सारेच दृश्य किळसवाणे होते.

पावेल तिथून निघून जाण्यासाठी वळणार तोच पुढच्या रांगेतून कुणीतरी उठून उभा राहिला आणि ओरडला, ''कुंटणखान्यातला हा खेळ बंद करा! भिक्कार साले.''

तो झार्कीय होता.

पावेलने पुढच्या ओळींमध्ये जाऊन त्याला गाठले. त्यांनी पावेलच्या खोलीत खूप गप्पा मारल्या. झार्कीय पक्षाच्या प्रादेशिक समित्यांच्या प्रचार विभागात काम करत होता.

तेवढ्यात अनेक लोकांना बरोबर घेऊन दोरा तेथे आली. झार्कीयांच्या जाकीटावरील सन्मान चिन्हांकडे नजर टाकीत तिने पावेलला विचारले, ''तुझा मित्र पक्षाचा सभासद आहे ना? तो कुठं काम करतो.''

बुचकळ्यात पडलेल्या पावेलने तिला झार्कीयाबद्दल थोडक्यात सांगितले.

''छान, मग हरकत नाही. माझ्याबरोबरचे हे कॉम्रेड नुकतेच मॉस्कोहून आलेत. पक्षाच्या ताज्या बातम्या ते आपल्याला सांगणार आहेत. तुझ्या खोलीत एक गुप्त पक्ष-बैठक भरवायचं आम्ही ठरवलंय.'' तिने खुलासा केला.

ही माणसे जुनी बोल्शेविक होती. मॉस्को नियंत्रण आयोगाचे एक सदस्य बर्ताशेव यांनी त्रॉत्स्की, झिनोविएफ् व कामेनेफ् यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या नव्या विरोधी गटाबद्दल माहिती दिली.

''अशा कसोटीच्या क्षणी आपण आपापल्या जागी असायला हवं.'' समारोप करताना बर्ताशेव म्हणाले.

या बैठकीनंतर तीन दिवसांनी सारे सॅनिटोरियम ओस पडले. पावेलसुद्धा आपली मुदत पुरी होण्याआधीच तेथून बाहेर पडला.

कम्सामोलच्या मध्यवर्ती समितीने त्याला खोळंबून ठेवले नाही. त्याची औद्योगिक प्रदेशात कम्सामोल चिटणीस म्हणून नेमणूक झाली आणि आठवड्याच्या आतच तो स्थानिक नगर संघटनेच्या सभेपुढे भाषणे देऊ लागला.

परंतु, अजून एक संकट कोर्चागिनच्या समोर उभे राहिले. त्या वर्षाच्या शरदाच्या अखेरीस पावेल आणखी दोन पक्ष कार्यकर्त्यांना घेऊन एका दूरच्या विभागात मोटारीतून चालला असताना मोटार खड्ड्यात घसरून उलटी झाली. आतील सर्व प्रवाशांना इजा झाल्या. पावेलच्या गुडघ्याचा तर चुरा झाला. काही दिवसांनंतर त्याला खार्कोवच्या शल्यक्रिया संस्थेत नेण्यात आले. दुखावलेल्या अवयवांची क्ष किरण तपासणी केल्यावर तपासणी मंडळाने तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला.

दुसऱ्याच दिवशी सकाळी शस्त्रक्रिया ठरली. एक कॉट असलेला छोटा चकचकीत वॉर्ड, स्वच्छ आणि आता परिचित होऊ लागलेला इस्पितळातील विशिष्ट वास.

नर्स त्याचे रात्रीचे जेवण घेऊन आली. पावेलने ते परत पाठवले. बिछान्यात अर्धवट उठून तो पत्रे लिहित होता. गुडघ्यातील वेदना त्याच्या कामात बाधा आणत होती.

.... ऑपरेशन थिएटर. नाकावर, तोंडावर जाळीदार मुखवटे चढवलेली माणसे, चकाकती निकेलची उपकरणे, लांबट अरुंद ऑपरेशन टेबल.

पावेलला ऑपरेशन टेबलवर झोपवण्यात आले. त्याच्या पाठीमागे ऑपरेशनची जलद तयारी चालू होती.

काही मिनिटातच त्याच्या चेहऱ्यावर एक जड मुखवटा ठेवण्यात आला. प्राध्यापकांचे शब्द त्याला ऐकू येऊ लागले.

''आम्ही तुला बेशुद्धीचं औषध देतोय. नाकानं दीर्घ श्वास घ्या आणि आकडे मोजा.''

इथरचे पहिले थेंब. जीव गुदमरून टाकणारा नकोसा वास.

पावेलने खोल श्वास घेतला. आणि स्पष्ट बोलण्याचा प्रयत्न करीत तो आकडे मोजू लागला. त्याच्या शोकांतिकेचा पहिल्या अंकाचा पडदा वर गेला होता.

आर्त्योमने पत्र फोडले आणि तो झरझर वाचू लागला. ''आर्त्योम! आपण एकमेकांना क्वचितच लिहितो. मुळं उपटून टाकायची तुझी इच्छा आहे म्हणून शेपेतोवकाहून कझातीन रेलयार्डात तू मुक्काम हलवलास. पण ती मुळं स्तेशा आणि तिच्या नातेवाईकांच्या क्षुद्र मनोवृत्तीत आहेत. परंतु तू तसं करू नकोस. कारखाना सोडून नगर सोविएतचं अध्यक्षपद स्वीकारण्यास तू हट्टानं नकार देतो आहेस हे चुकीचे आहे. तू सोविएतसाठी लढलास ना? मग तिचा स्वीकार कर ! उद्याच सोविएतमध्ये जाऊन कामाला लाग.''

''आता माझ्या विषयी! माझ्यात काहीतरी प्रचंड बिघाड झालाय. मी वारंवार इस्पितळात मुक्कामाला असतो. त्यांनी मला दोनदा कापलाय. मी बरंच रक्त आणि शक्ती गमावलीय. पण हे सारे केव्हा संपेल हे मला कुणीच सांगत नाहीय. मी आता काम करायला लायकच राहिलो नाही. उजव्या गुडघ्याची सांध्याची हालचाल अजिबात थांबलीय. माझ्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये जखमांचे वण उमटलेत आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे सात वर्षांपूर्वी माझ्या मणक्याला जखम झाली होती त्याबद्दल मला फार मोठी किंमत मोजावी लागणार. पण परत पक्षात जाऊन काम करता यावं यासाठी मी वाटेल ते करायला तयार आहे.

पक्षाच्या कामापासून बाहेर राहणं ही कल्पनाच मला सहन होत नाही. म्हणूनच मी त्यांना माझं त्यांना काय हवं ते करू देतो. पण तू धीर सोडू नको. मी सहजासहजी हार मानत नाही हे तुला ठाऊक आहे. अजून तीन आयुष्यांचं बळ माझ्यात आहे.''

मन:पूर्वक नमस्कार

पावेल.

आर्त्योम जेव्हा हे पत्र वाचत होता तेव्हा पावेल किएवला निघालेला होता. तत्पूर्वी आपल्या डॉक्टर वडिलांना पावेलने भेटावे म्हणून बाझानोवाने त्याला आग्रह केला. तिचे वडील विख्यात सर्जन होते. बाझानोवाने क्लिनिकमधून सर्व पेपर व क्ष-किरण फोटो आणले होते. त्यावर तिच्या वडिलांनी मारलेला शेरा पाहताच बाझानोवाचा चेहरा पांढरा फटक पडल्याचे पावेलच्या नजरेतून सुटले नाही. त्यांनी म्हटले होते, 'या तरुणाचे सर्व अवयव हळूहळू

लुळे पडत जातील आणि त्याची शोकांतिका टाळण्याचे सामर्थ्य आमच्यात नाही.'

एक डॉक्टर आणि स्नेही दोन्ही नात्यांनी संपूर्ण सत्य पावेलला सांगणे शहाणपणाचे ठरले नसते. तिने त्याला एवढेच सांगितले की, ''कॉम्रेड कोर्चागिन, माझी खात्री आहे की येवपातोरियामधील उपचारांचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल आणि शरदाच्या मोसमात तुम्ही नक्की परत कामावर हजर व्हाल.''

पण पावेलची तीक्ष्ण नजर तिच्या चेहऱ्यावर रोखली आहे हे तिच्या लक्षात आले नव्हते.

कॉम्रेड कोर्चागिन मी तुमची स्नेही आहे हे विसरू नका.'' ती हळूवारपणे म्हणाली. ''तुमच्या आयुष्यात पुढं काय घडणार आहे हे कोण सांगणार? पण कधी मदत किंवा सल्ला यांची गरज पडली तर मला जरूर लिहा. मला शक्य ती सर्व मदत मी करीन.''

हातातल्या काठीवर भार देत, दारापासून रस्त्यावर थांबलेल्या टॅक्सीकडे मोठ्या कष्टाने जाणारी पावेलची उंच, कातडी कपड्यांमधली आकृती इरीना बाझानोवा खिडकीतून खिन्नपणे पाहात होती.

यानंतर पुन्हा थोड्याच दिवसांनी पावेलला येवपातोरियात दाखल व्हावे लागले. युक्रेनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समित्यांमार्फत पावेलची जागा राखण्यात आली होती.

''मी तुम्हाला कॉम्रेड एन्नेर यांच्याबरोबर रहायला जागा देतो. आपल्या खोलीतला साथीदार रशियन असावा असे ते म्हणाले होते.'' दारं ठोठावीत डॉक्टर म्हणाले. आतून जर्मन उच्चारात रशियन शब्द उच्चारण्यात आले, ''आत या.''

पावेलने आपली प्रवासी ट्रंक खाली ठेवली व बिछान्यावर पडलेल्या सोनेरी केसांच्या आणि चमकदार निळ्या डोळ्यांच्या माणसाकडे तो वळला. त्या जर्मन माणसाने पावेलचे प्रेमळ स्मिताने स्वागत केले.

त्यानंतर काही क्षणांच्या अवधीत पावेल त्या जर्मनाच्या बिछान्यापाशी बसून गप्पा मारण्यात गढून गेला होता.

एन्नेर हे जर्मन कामगार होते आणि १९२३ च्या हॅम्बुर्ग उठावात कमरेच्या खाली त्यांना जखम झाली होती. ती चिघळून ते अंथरुणाला खिळले होते. पण आपल्या यातना ते हसऱ्या चेहऱ्याने सोसत होते व त्यामुळेच पावेलच्या आदरास ते तात्काळ पात्र ठरले होते.

सॅनिटोरियमच्या आवारातील एका कोपऱ्यात संध्याकाळी एकत्र जमण्याची सवय पाच पेशंटना लागली होती. त्यांना इतर सारेजण 'कोमिन्टर्नची कार्यकारिणी'* असे म्हणत. त्यात मार्ता लौरिन ही तपकीरी डोळ्यांची लात्वियाची तरुणीही होती. ती लात्वियाच्या कम्युनिस्ट पक्षाची क्रियाशील कार्यकर्ती होती. १९१८ साली श्वेतसेनेने तिला गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा दिली होती. पण पुढे कैद्यांच्या अदलाबदलीत इतरांबरोबर तिलाही

*केमिन्टर्न = कम्युनिस्ट पक्षाची कार्यकारिणी

सोविएत सरकारकडे सोपवण्यात आले होते.

या छोट्या गटात पाच भिन्न राष्ट्रीयत्वाची माणसे एकवटली होती. जर्मन, एस्तोनियन, लित्वियन, रशियन आणि युक्रेनी.

पावेलला सॅनिटोरियममध्ये येऊन महिना होत आला पण त्याची तब्येत जास्त बिघडली. डॉक्टरांनी त्याला फक्त झोपून राहण्याची ताकीद दिली. एन्नेर बेचैन झाले होते. या तरुण बोल्शेविकाचा त्यांना फार लळा लागला होता. एवढा चैतन्याने रसरसलेला तरुण एवढ्या अकाली अंथरुणाला खिळावा याचे त्यांना वैषम्य वाटत होते.

तो आपल्या वेदना इतरांपासून लपवून ठेवत असे. पण त्याच्या भयानक पांढरट्या चेहऱ्यावरून मार्ताला जाणवायचे की, त्याला कमालीच्या यातना होत असल्या पाहिजेत. दरम्यान युक्रेनी मध्यवर्ती समितीकडून पत्र आले होते. सॅनिटोरियमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याची रजा आणखी दोन महिने वाढवली होती. डॉक्टरांनी त्याला काम करण्यास अयोग्य ठरविले होते.

कित्येक वर्षांपूर्वी बॉक्सिंगचे धडे घेताना झुखराय यांचे प्रहार झाल्यावर पावेल जसा वागला होता, तसाच हा प्रहार त्याने सोसला. त्यावेळीही तो खाली पडला होता पण तात्काळ उठून उभा राहिला होता.

पावेलच्या आईचे पत्र आले होते. क्रिमियात तिची बालमैत्रिण आल्बीना क्युसाम राहात होती. तिला पावेलने भेटावे असे आईने सुचवले होते. या पत्रामुळे पावेलच्या जीवनात फार मोठा बदल घडायचा होता.

पावेलच्या सॅनिटोरियममधल्या मित्रांनी त्याला मोठ्या प्रेमाने निरोप दिला. पावेलला घेऊन आलेली घोड्याची बग्गी एका छोट्या घरासमोर थांबली. क्युसाम कुटुंबात पाच माणसे होती. आल्बीना, तिचा म्हातारा गलेलठ्ठ नवरा, दोन मुली, ताया आणि लेव्या व लेव्याचा मुलगा. लेव्या आपल्या दारुड्या-दांडगट नवऱ्यापासून विभक्त होऊन आईकडे राहायला आली होती. ताया सहकारीभांडारात मदतनिसाचे काम करी. क्युसाम म्हातारबाबा साऱ्या कुटुंबावर अरेरावी गाजवीत. या हेकेखोर, हुज्जती म्हाताऱ्याने अख्या कुटुंबाला दहशतीखाली ठेवले होते. शिवीगाळीत आणि संघर्षाच्या वातावरणात मुलींची आयुष्ये नासून गेली होती. त्यात भर म्हणजे त्यांचा भाऊ जॉर्ज अगदीच कुचकामी व उर्मट होता व मधून मधून दटावणीच्या तारा पाठवून पैसे लुबाडत होता. म्हातारे जोडपे घराच्या अर्ध्या भागात वेगळे राहात आणि मुलींच्या स्वतःपुरत्या दोन छोट्या खोल्या होत्या. त्या पलिकडची खोली पावेलला दिली होती. म्हातारा सारखा गुरगुरत पावेलला हाकलण्याच्या पावित्र्यात असे.

केवळ योगायोगाने पावेल त्या कुटुंबात आला होता आणि कौटुंबिक नाटकात नकळत ओढला जात होता. या बंधनातून आईला आणि मुलींना मुक्त कसे करावे या विचाराने तो ग्रासला होता. पण त्याचेच आयुष्य आपद्ग्रस्त असल्याने कोणतीही कृती करणे अवघड बनले होते. या सर्वांमधून एकच मार्ग होता- आईने व मुलीने घर सोडणे. पण हा प्रस्ताव कसा मांडणार? योगायोगाने एका रविवारी पावेल गावात चक्कर मारून घरी आला तेव्हा ताया एकटीच घरी होती. तेव्हा त्याने विषय काढला.

''हे बघ ताया, आपण दोघं चांगले मित्र आहोत. तेव्हा औपचारिकपणाचा घोळ कशाला? तुम्ही घरातून बाहेर पडणे हा एकच मार्ग आहे. मी आईला पत्र लिहून तिचा सल्ला विचारतो. पण हे करायची तुझी इच्छा आहे का? या दिव्यातून जाण्याची ताकद तुझ्यात आहे का?''

''माझी इच्छा आहे.'' ताया अस्फुटपणे म्हणाली. ''ताकदीचं मला ठाऊक नाही.''

''काही हरकत नाही, जोवर इच्छा आहे तोवर ठीक होईल.

काही दिवसांनंतर पावेल खार्कावला जायला निघाला. खार्कावमध्ये पेत्या नोवीकोव नावाच्या मित्राच्या घरी मुक्काम टाकला आणि तात्काळ तो मध्यवर्ती समितीच्या कचेरीत गेला. आपल्याला ताबडतोब कामावर पाठव अशी पावेलने अकीमला विनंती केली. अकीमने नकारार्थी मान हलवली. ''शक्य नाही पावेल! वैद्यकीय मंडळाचा निर्णय आमच्यापाशी आहे आणि तुझी परिस्थिती गंभीर आहे असं मध्यवर्ती समिती म्हणते. तुला उपचारांसाठी पाठवायचं ठरलंय.''

''अकीम, ते काय म्हणतात त्याची मला बिलकूल पर्वा नाही. मी तुला विनंती करतोय. मला काम करायची संधी दे. एका इस्पितळातून दुसऱ्या इस्पितळात फिरत राहणं अगदी जीव घेणं आहे.''

''पण पावेल आम्हाला डॉक्टरांच्या निर्णयाविरुद्ध जाता येत नाही आणि हे सारं तुझ्या हितासाठीच चाललंय, हे तुला समजत नाही का?''

पण पावेलने आपली बाजू एवढ्या हिरीरीने पटवून दिली, की शेवटी अकीमने त्याचे म्हणणे मान्य केले.

दुसऱ्याच दिवशी मध्यवर्ती समितीच्या सचिवालयाच्या खास विभागात पावेल कामाला लागला. आपण कामाला लागलो म्हणजे गेलेली ताकद आपोआप परत येईल असे त्याला वाटले होते. पण तो आपला गैरसमज असल्याचे लवकरच त्याला समजून चुकले. त्याचा हात किंवा पाय वारंवार अचनकपणे बधीर होई आणि अनेकदा त्याचे संपूर्ण शरीर काही क्षणांपर्यंत लुळे पडत असे. त्याला नेहमी ताप असे. काही वेळा सकाळी बिछान्यातून उठणेच अशक्य होई आणि तो झटका जाऊन परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत कामावर जायला त्याला

तब्बल तासभर उशीर झालेला असे. अशावेळी तो कमालीचा निराश झालेला असे. शेवटी असा एक दिवस उजाडला की उशिरा कामावर येण्याबद्दल त्याला अधिकृतपणे ताकीद देण्यात आली. पक्षातून वेगळे पडण्याची त्याला जी भीती वाटत होती, त्याच गोष्टीची ती सुरुवात होती.

त्याची दुसऱ्या कामावर बदली करून अकीमने दोनदा त्याला मदत केली. पण अपरिहार्य ते घडलेच. कामावर रुजू होऊन महिना झाला नाही तोच पावेल पुन्हा अंथरुणाला खिळला.

अंगात थोडी ताकद येताच तो परत मध्यवर्ती समितीकडे गेला. यावेळी मात्र अकीमने, पावेलने इस्पितळात गेलेच पाहिजे असा आग्रह धरला.

''मी नाही परत जाणार.'' थकल्या सुरात पावेल म्हणाला. ''काही उपयोग नाही. आता एकच गोष्ट उरलीय. सेवानिवृत्त व्हायचं. पण ती मी कधीच करणार नाही. मी अवघा चोवीस वर्षांचा आहे आणि उरलेलं आयुष्यभर कामाला नालायक म्हणून अपंग म्हणून राहणं मला शक्य नाही. विशेषत: उपचारांचा उपयोग नाही हे माहीत असताना! तुम्ही मला काहीतरी काम दिलंच पाहिजे. माझ्या परिस्थितीला अनुरूप असं. मात्र कारकुनी काम देऊ नका. मी अजून उपयुक्त आहे, असं समाधान मला मिळू दे.''

भावनावेगाने कंपित होणारा पावेलचा आवाज अधिकाधिक वर चढत गेला.

अकीमला पावेलबद्दल कमालीची सहानुभूती वाटत होती. आपले छोटे, संपूर्ण जीवन पक्षाला अर्पण केलेल्या ह्या मनस्वी तरुणाला पक्षापासून तुटून बाजूला पाडण्याचा आणि युद्ध आघाडीपासून अतिदूरचे जीवन जगण्याचा किती विलक्षण त्रास होत असेल याची अकीमला कल्पना होती. त्याला शक्य ती सर्व मदत करण्याचा अकीमने निर्धार केला. ''ठीक आहे पावेल, आता शांत हो. उद्या सचिवालयाची बैठक होईल. तेव्हा तुझी केस मी कॉम्रेडांसमोर मांडीन. मला शक्य ते सारं करण्याचं मी तुला वचन देतो.''

जडपणे पावेल उठला आणि अकीमचा हात त्याने गच्च पकडला.

''आयुष्य मला एका कोपऱ्यात ढकलत नेऊन चिरडून टाकील, असं खरंच तुला वाटतं का अकीम? जोपर्यंत माझं काळीज धडधडतंय-'' आणि छातीतील मंद धडधड त्याला जाणवावी म्हणून पावेलने त्याचा हात आपल्या काळजाशी दाबला. ''- तोपर्यंत कुणीही मला पक्षापासून दुरावू शकणार नाही. फक्त मृत्यूच मला पक्षामधून बाहेर नेईल. मित्रा, या शब्दांची आठवण ठेव.''

अकीम काहीही बोलला नाही. पावेलचे बोलणे पोकळ नव्हते हे त्याला माहीत होते. लढाईत मरणांतिक घायाळ झालेल्या सैनिकाची ती आरोळी होती. कोर्चागिनसारखी माणसे दुसऱ्या पद्धतीने बोलू अथवा जगू शकणार नव्हती हे त्याला ठाऊक होते.

दोन दिवसांनंतर अकीमने पावेलला सांगितले की, एका मोठ्या वर्तमानपत्रात काम

करण्याची संधी त्याला देऊ करण्यात येणार होती. मात्र साहित्यिक कामाला पात्र ठरला तरच त्याची निवड व्हायची होती. संपादक कचेरीत त्याचे अगत्याने स्वागत झाले. एका सहाय्यक संपादिकेने त्याची मुलाखत घेतली.

''कॉम्रेड, तुमचं शिक्षण किती झालंय?'' तिने विचारले.

''प्राथमिक तीन इयत्ता.''

''पक्षाच्या एखाद्या राजकीय विद्यालयात होता?''

''नाही.''

''हरकत नाही. या गोष्टींशिवायही एखादा माणूस चांगला पत्रकार बनू शकतो. आम्ही तुम्हाला घरी करण्यासारखं काम देऊ शकू. मात्र अशा कामाला खूप ज्ञान असण्याची गरज आहे. विशेषत: साहित्य आणि भाषा यांचे.''

त्या अर्ध्या तासाच्या मुलाखतीत पावेलला जाणवले होते की, त्याचे ज्ञान अपुरे होते. चाचणीसाठी त्याने लिहिलेला लेख त्याला परत देण्यात आला. तेव्हा त्यात शैलीच्या आणि शुद्धलेखनाच्या तीन डझन चुका लाल पेन्सिलने खुणा केलेल्या आढळल्या. ''कॉम्रेड कोर्चागिन तुमच्या अंगी खूप पात्रता आहे. आणि थोडे कष्ट केल्यानंतर तुम्ही चांगलं लेखन करू शकाल. पण सध्या तुमचे व्याकरण फारच सदोष आहे. दुर्दैवाने आम्ही तुमचा उपयोग करून घेऊ शकत नाही.''

आपल्या काठीवर जोराने भार देत पावेल उठला. त्याच्या उजव्या भुवईवरची शीर ताडताड उडत होती. ''तुमचा मुद्दा मला समजला. कसा काय मी पत्रकार बनणार? एकेकाळी मी कोळसे भरायचं काम छान करायचो आणि इलेक्ट्रिशियन म्हणूनही काही वाईट नव्हतो. घोड्यावर बसण्यात मी पटाईत होतो आणि कम्सामोलच्या युवकांना कसं जागं करायचं हे मला माहीत होतं. पण तुमच्या क्षेत्रात मी काही करू शकेन असं वाटत नाही.''

हस्तांदोलन करून त्याने निरोप घेतला. त्या दिवसापासून आपल्या आयुष्याचा उतार सुरू झाला असे पावेलला वाटले. तो वारंवार अंथरुणाला खिळून राहू लागला. मध्यवर्ती समितीने त्याला कामातून मुक्त केले आणि त्याच्या पेन्शनची सोय केली. त्याचबरोबर काम करण्यास शारीरिकदृष्ट्या अपात्र ठरल्याचा दाखलाही पाठविला.

मॉस्कोला येऊन भेट आणि विश्रांती घे, असे मार्ताचे पत्र त्याला मिळाले होते. फारसे फिरावे लागणार नाही असे काम शोधून देण्यात सोविएत संघ मध्यवर्ती समिती त्याला मदत करील अशी धुगधुगती आशा घेऊन तो मॉस्कोला आला. पण तिथेही त्याला वैद्यकीय उपचार घेण्याचाच सल्ला मिळाला.

एके दिवशी सकाळी त्याने मॉस्को सोडले. आगगाडीने त्याला वेगाने दक्षिण समुद्रकिनारी आणून सोडले. दमट पावसाळी शारदीय वातावरणातून तो एकदम क्रिमियाच्या उबदार

सागरतीरावर पुन्हा क्युसाम कुटुंबात येऊन पोचला. वेगाने मागे जाणारे टेलिफोनचे खांब पाहात पावेल आगगाडीच्या डब्यातल्या खिडकीपाशी बसला होता. त्याच्या भुवया जुळल्या होत्या व त्याच्या काळ्या डोळ्यांमध्ये एक हट्टी लहर चमकत होती.

◆◆◆◆

प्रकरण आठवे

खडबडीत खडकांवर सागराच्या लाटा फुटत होत्या. दूरवरून येणारे कोरड्या समुद्रवाऱ्याचे झोत त्याच्या तोंडाला स्पर्शत होते. शहराच्या सीमेवर डोंगरांची ओळ समुद्रापाशी येऊन एकदम तुटली होती.

शहराबाहेरच्या जुन्या उद्यानात अगदी निवांत होते. पावेलला शहरामधून या बागेपर्यंत एका म्हाताऱ्या पार्शियन गाडीवानाने आणले. आपल्या आयुष्याचे आता काय करायचे, यावर चिंतन करण्यासाठी तो ह्या निवांत ठिकाणी आला होता.

हनुवटीवर हात ठेवून पावेल विचारमग्न बसला होता. अगदी बालपणापासून स्वत:चा जीवनपट त्याच्या मन:चक्षूंसमोरून सरकत होता. ही चोवीस वर्षे तो कसा जगला होता? ती कारणी लागली होती की नाही? त्याने विचारपूर्वक, तटस्थपणे त्यांची छाननी केली व आपण आयुष्य अगदीच काही वाया घालवले नाही असे त्याला आढळले, तेव्हा त्याला कमालीचे हलके वाटले. सोविएत सत्तेसाठी लढ्याच्या वादळी दिवसात तो ऐन धुमश्चक्रीत गुंतलेला होता व क्रांतीच्या लाल पताकेवर त्याच्या रक्ताचे चार थेंब मिसळले होते.

त्याची ताकद संपेपर्यंत तो पक्षाच्या आघाडीत राहिला होता. पण आता घायाळ झाल्यामुळे युद्धमोर्चावर उभे राहाणे त्याला शक्य नव्हते. आणि रणांगणावरच्या इस्पितळाखेरीज इतरत्र त्याला जागा उरली नव्हती. अशा परिस्थितीत तो काय करणार होता? भविष्यात त्याच्या नशिबी अधिक यातना वाढून ठेवलेल्या होत्या हे त्याला माहीत होते. पायाशी प्रचंड दरी आ वासून उभी असावी तसा तो प्रश्न त्याच्यापुढे आ वासून उभा होता.

केवळ श्वास घेण्यासाठी, खाण्यापिण्यासाठी जगत राहायचे? आपले साथीदार लढत पुढची वाट आक्रमित असताना अगतिक बघ्याची भूमिका घेऊन बसायचे? छे: छे:! त्यापेक्षा हे नतद्रष्ट शरीर नष्ट केलेले काय वाईट?

खिशातल्या चपट्या ब्राऊनिंग पिस्तुलाच्या मुठीवर त्याची बोटे आवळली गेली व सावकाश त्याने ते खिशातून बाहेर काढले.

परंतु पिस्तुलाची थंड नळी त्याच्याकडे तिटकाऱ्याने रोखून बघत असल्यासारखे त्याला जाणवले. त्याने पिस्तुल गुडघ्यावर ठेवले आणि एक जोरदार शिवी हासडली.

''हा भेकडांचा सोपा रस्ता. आयुष्य जोरदार तडाखा देतं तेव्हा केव्हाही मस्तकात गोळी घालता येते. पण याहून चांगलं आयुष्य जगण्याचा कधी प्रयत्न केलास? जीवन असह्य होतं तेव्हा ते कसं जगावं हे शीक. आपलं जीवन उपयोगी बनव.''

तो उठला आणि रस्त्यावर आला. तो घरी क्युसाम कुटुंबात परत आला तेव्हा ताया अजून जागी होती. पावेल उशीरापर्यंत घरी न पोचल्यामुळे ती काळजीत पडली होती. सकाळी त्याच्या चेहऱ्यावरील मानसिक ताण तिला जाणवला होता.

रात्री दोनचे टोले पडले. तेवढ्यात फाटक करकरल्याचा आवाज तिच्या कानी पडला. पटकन जाकीट चढवत ती दार उघडायला गेली. पावेल आत आला तेव्हा सुटकेचा निश्वास टाकीत ताया हलक्या आवाजात म्हणाली, ''मला काळजी वाटत होती.''

''ताया, मला काही झालेलं नाही. मात्र, मला का कुणास ठाऊक झोपावंसं वाटत नाहीय! मला तुला काही सांगायचंय. चल, तुझ्या खोलीत जाऊ.''

ताया संकोची, लाजाळू होती. ती घुटमळली. रात्र बरीच झाली होती. एवढ्या रात्री त्याला आपल्या खोलीत घेऊन जायचं? आईला काय वाटेल? पण त्याचा अपमान होईल या धास्तीने नकार देणेही तिला शक्य नव्हते.

''ताया, मी आज माझ्या स्वत:च्या खाजगी 'पोलिट ब्यूरो'ची बैठक घेतली आणि एक खूप महत्त्वाचा निर्णय मी घेतलाय. सांगू?''

''सध्या आपलं आयुष्य.. तुझं आणि माझं - काही फार सुखाचं नाहीय. तुझ्या कुटुंबातल्या वादळाला सुरूवात होतेय. इथून बाहेर मोकळ्या वातावरणात आपल्याला गेलं पाहिजे. मी या आयुष्यात प्राण ओतावा असं ठरवलंय. माझ्या आयुष्याची जोडीदारीण होशील तू?''

त्याच्या प्रांजल कबुलीमुळे ताया कमालीची भारावून गेली.

''हे बघ, आपण दोघं एकमेकांना खूप काही देऊ शकू. मी असं ठरवलंय, तू खऱ्या अर्थानं मोठी, अस्सल बोल्शेविक होईपर्यंत आपलं एकत्र आयुष्य जगायचं. त्याबाबतीत मी तुला मदत केली नाही तर माझं आयुष्य कवडीमोलाचं ठरेल. पण तू बोल्शेविक झालीस की सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्त होशील. कदाचित मी पुरता पांगळा होईन, तेव्हा मात्र तू माझ्याशी जखडून राहीलंच पाहिजे असं मुळीच समजायचं नाही.''

तो आपल्या खोलीत गेला. ज्या क्षणी त्याचे डोके उशीला टेकले त्याच क्षणी त्याला गाढ झोप लागली.

आर्त्योमला पावेलकडून क्वचित पत्र येई. त्या दिवशी धडधडत्या अंत:करणानेच त्याने पत्र उघडले. तो वाचू लागला.....

'आर्त्योम, प्रकृतीच्या बाबतीत आयुष्यानं माझी दशादशा करून टाकलीय. एका आघातातून सावरतोय तोच दुसरा निष्ठूर आघात होतो. पहिल्यांदा माझ्या डाव्या हातातली शक्ती गेली. आता पायही लुळे पडलेत. माझे बोल्शेविकाचे अंत:करण काम करण्यासाठी तळमळतेय. माझा अजून विश्वास आहे, पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मी परत जाईन. लढाई करणाऱ्या सैनिकांच्या रांगेत माझी संगीन योग्य वेळी आपल्या जागी उभी असेल.

सध्या माझं आयुष्य अभ्यासात जातं. शिवाय तायाचं शिक्षण चालू आहे. मी आणि ताया छान मित्रासारखे वागतो. माझी छोटी बायको-ताया - खूप प्रेम करते, माझी काळजी घेते. पक्षात मी ज्या मार्गावरून गेलो त्याच मार्गावरून ताया जाते आहे. सध्या ती कॅंटीनमध्ये बशा विसळते. काही दिवसांपूर्वी महिला विभागाने तिला प्रतिनिधित्वाचे पत्र दिले. तिच्यामधून नव्या स्त्रीचा जन्म झालेला दिसतो.'

मरियाला पावेलवरची नवी आपत्ती समजली तेव्हा ती आपल्या धाकट्या मुलाकडे धावली. ती तिघे एकत्र राहू लागली. ताया आणि मारिया प्रथम भेटीतच एकमेकींच्या मैत्रिणी बनल्या. हिवाळ्यातल्या एका संध्याकाळी ताया आपल्या पहिल्या विजयाची बातमी घेऊन आली. नगर सोविएतवर तिची निवड झाली होती.

पण दुर्दैवाने नवा घाला घातला. पावेलच्या उजव्या डोळ्यात एक पेटती असह्य कळ उमटली आणि ती वेगाने डाव्या डोळ्यापर्यंत पोचली. एक काळा पडदा पडला आणि पावेलच्या भोवतीच्या सर्व गोष्टी त्याने गिळून टाकल्या. संपूर्ण आंधळेपणाची महाभयानकता पावेलने प्रथमच अनुभवली. या नव्या आपत्तीमुळे मरिया व ताया निराशेत बुडून गेल्या. पण पावेल मात्र कमालीचा शांत राहिला.

अशा गंभीर संघर्षाच्या काळात एके दिवशी उत्साहाने फुललेली ताया घरी आली आणि तिने घोषणा केली, ''पावेल मी पक्षाची उमेदवार बनले.''

''अरे वा कॉम्रेड कोर्चागिना, आपण दोघं आता कम्युनिस्ट गटातले बनलो.'' प्रेमभराने पावेल म्हणाला. दुसऱ्या दिवशी पावेलने पक्ष समितीच्या चिटणिसांना पत्र लिहिले व आपल्याला भेटण्याची विनंती केली. त्याच दिवशी संध्याकाळी वोल्मेर पावेलला भेटले. पावेलने विनंती केली, ''कॉम्रेड वोल्मेर, मला माणसं हवीत. अगदी कमी अनुभवाची पोरं माझ्याकडे पाठवा. खेड्यात अतिडाव्या प्रवृत्ती बळावताहेत. कम्यून करण्याची त्यांना घाई झाली आहे. त्यांना वेळेवर आवरलं पाहिजे. ...'' वोल्मेरना अचानक एक कल्पना सुचली. ''तुझ्याकडे कुणाला पाठवावं माझ्या ध्यानात आलं.''

दुसऱ्या दिवशी वोल्मेरच्या सूचनेनुसार लेव पावेलकडे आले. ते परतले तेव्हा खूप वेळापूर्वी हरवलेला आपला भाऊच जणू परत गवसला अशी त्यांची भावना होती.

सकाळी पावेलच्या घराच्या छपरावर रेडिओची काठी बसवण्यात आली. तोवर घरामध्ये लेव रेडिओ सेटसकट पावेलपाशी बसून त्याला आपल्या गतजीवनातील तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी सांगून रिझवीत होते. पावेल त्यांना पाहू शकत नव्हता. पण तायाने केलेल्या वर्णनानुसार त्याला माहीत झाले होते की लेव उंच, सोनेरी केसांचे, निळ्या डोळ्यांचे, जोराने हातवारे करीत बोलणारे तरूण गृहस्थ होते.

संध्याकाळच्या सुमारास खोलीत तीन वॉल्व्ह झगमगू लागले. विजयी मुद्रेने लेवनी पावेलच्या हाती कर्णयंत्रे दिली. वातावरणात अनेक आवाजांचा गोंगाट मिसळला होता. बंदरातील ट्रान्समीटर अनेक पक्ष्यांप्रमाणे चिवचिवाट करीत होते आणि किनाऱ्यापासून जवळच कुठेतरी एक जहाज अखंडपणे कड-कट्टचे संदेश पाठवीत होते. पण ह्या आवाजांचे आणि गोंगाटाच्या प्रचंड कोलाहलातून रेडिओच्या सुईने एक धीरगंभीर आणि शांत स्वर नेमका स्वच्छ पकडला. 'मॉस्को बोलत आहे....' त्या छोट्या रेडिओमुळे जगातील वेगवेगळ्या भागांतील साठ रेडिओ स्टेशने पावेलच्या काबूत आली. ज्या आयुष्यापासून तो वंचित झाला होता ते आयुष्य कर्णयंत्राच्या पातळ वेष्टनत्वचेतून सर्व बंधने तोडून त्याच्यापाशी धावले. त्या आयुष्याचे महाप्रचंड स्पंदन त्याला पुन्हा एकदा जाणवले.

पावेलच्या डोळ्यांमध्ये आनंदाचे तेज उजळलेले बघून लेवना आपल्या श्रमांचे सार्थक झाल्याचे समाधान मिळाले.

ते घर स्तब्ध होते. ताया झोपेत अस्वस्थपणे काहीतरी पुटपुटत होती. पावेलला आपल्या बायकोची भेट आजकाल दुर्मिळ बनली होती. खूप थकून भागून आणि थंडीने कुडकुडत ती रात्रीची उशीरा घरी यायची. कामात तिचा जास्त वेळ जात होता आणि मोकळी संध्याकाळ तिला क्वचितच लाभत असे. एकेकाळी ताया संध्याकाळचा सारा वेळ पावेलबरोबर घालवीत असे. त्यांच्या नात्यात तेव्हा अधिक ऊब आणि हळूवारपणा होता. पण त्यावेळी ती केवळ पत्नी, सहचारी होती. पण आता ती त्याची शिष्या होती, पक्षातील साथीदारीण होती. राजकीयदृष्ट्या ताया जसजशी अधिक परिपक्व होत जाईल तसतशी ती आपल्या वाट्याला कमी कमी येत जाईल, याची पावेलला जाणीव होती. त्याने ते स्वीकारले होते.

त्याला एक अभ्यास मंडळ चालविण्यासाठी देण्यात आले होते. सायंकाळी पुन्हा एकदा आवाजांची गजबज घरात ऐकू येऊ लागली. तरुणांबरोबर घालविलेल्या वेळामुळे पावेलला नवी शक्ती आणि जोम प्राप्त झाला.

बाकीचा वेळ पावेल रेडिओ ऐकण्यात घालवी. आंधळेपणामुळे पावेलपासून जे हिरावून घेतले गेले होते, ते रेडिओने त्याला परत मिळवून दिले. ज्ञान ग्रहण करण्याची त्याला संधी लाभली आणि ह्या प्रचंड ज्ञानपिपासेमुळे त्याला आपल्या शरीरातील असह्य कळा

विसरण्यास, डोळ्यांमधील जळती वेदना सोसण्यास आणि निष्ठूर कमनशिबाने त्याच्यावर लादलेले सारे दैन्य साहण्यास मदत झाली.

पावेलच्या नंतरच्या कस्मामोलच्या पिढीने माग्नीतोस्त्रोय येथे गाजवलेल्या पराक्रमांची बातमी रेडिओने दिली तेव्हा पावेल कमालीचा आनंदून गेला.

भुकेल्या लांडग्यांच्या कळपाप्रमाणे हिंस्त्र अशा स्वरूपाची उरालमधील विक्राळ हिमवादळे आणि गोठविणारी थंडी त्याच्या नजरेसमोर उभी राहिली. घोंघावणारे वारे त्याला ऐकू आले आणि बर्फाच्या भिरभिरत्या चक्रामध्ये कम्सामोलची दुसरी पिढी आर्क दिव्यांच्या उजेडात कारखान्यांच्या महाप्रचंड इमारतींच्या छपरांवर काम करीत असल्याचे, बांधकामाचा नाश होऊ नये म्हणून झटत असल्याचे त्याने कल्पनेने पाहिले. या प्रचंड कामाची व्याप्ती आणि कष्ट पाहाता किएवच्या कम्सामोलच्या पहिल्या पिढीने पंचमहाभूतांशी लढून पार पाडलेले जंगलांमधील रेलरस्त्याच्या बांधणीचे काम अगदीच किरकोळ होते असे पावेलला वाटले. देश वाढला होता आणि त्याच्याबरोबर देशाची माणसेही!

◆◆◆◆

प्रकरण नववे

पावेल कोर्चागिनला मॉस्कोत येऊन दीड वर्ष लोटले. अठरा महिने वर्णन करण्यास अशक्य अशा यातना! प्रा. अवेरबारव यांनी त्यांच्या डोळ्यावरील सूज थांबवण्यासाठी एक शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता.

त्याच्या गळ्यातील पॅराथायरॉईडच्या गाठी काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रियेच्या मेजावर पावेल तासन्तास कात्यासुऱ्यांनी जखडून पडला होता. तेव्हा तीन वेळा मृत्यूच्या सापळ्यांची मगरमिठी त्याला जाणवली होती. पण जीवनाच्या दोरीला तो घट्ट धरून राहिला होता. अनेक तासांच्या यातनामय प्रतीक्षेनंतर ताया जेव्हा त्याला पाही तेव्हा त्याचा चेहरा पांढराफटक पडलेला असे. पण तरीही त्याच्या मुद्रेवर नेहमीची सजीवता, शांतता व मृदुता तिला दिसे. तो म्हणे, ''माझ्या सोनुली, चिंता करू नको. मला ठार मारणं एवढं सोपं नाही. विद्वान डॉक्टरांचे अंदाज चुकवण्यासाठी का होईना, पण मी जिवंत राहीन. मी काम करायला नालायक आहे, असं ते म्हणतात, ही तर खूप मोठी चूक आहे आणि अजूनही त्यांची चूक मी त्यांच्या पदरात घालीन.'' त्याने काहीतरी निश्चित ठरवले होते.

हिवाळा संपला होता. उघड्या खिडक्यांमधून वसंताची आल्हाददावक हवा आत येत होती. आणखी एका शस्त्रक्रियेतून पावेल पार पडला होता. आणि काही झाले तरी इत:पर इस्पितळात न राहण्याचा निर्णय त्याने घेतला होता.

पावेलने मध्यवर्ती समितीला पत्र लिहून कळवले की, वैद्यकीय उपचारांसाठी इतस्तत:

भ्रमंती करण्यात आता काही अर्थ उरला नव्हता. तेव्हा मॉस्कोत त्याची बायको काम करीत होती तेथेच राहण्याची त्याची इच्छा होती. पक्षाच्या पुढे त्याने प्रथमच मदतीसाठी हात पसरला होता. त्याची विनंती मान्य करून मॉस्को सोविएतने त्याला राहायला फ्लॅट दिला. पुन्हा कधीही न परतण्याची आशा बाळगून पावेलने इस्पितळ सोडले.

ताया आता पक्षाची पूर्णवेळ सभासद झाली होती. आपली बायको अस्सल बोल्शेविक बनत चालल्याचा पावेलला खूप अभिमान वाटायचा व स्वतःच्या शारीरिक यातना सोसणे त्याला सुसह्य व्हायचे.

काही कामासाठी बाझानोवा मॉस्कोला आली तेव्हा त्यांची प्रदीर्घ भेट झाली. दोघांनी खूप गप्पा मारल्या. लढाऊ पक्ष कार्यकर्त्यांमध्ये परत जाण्याच्या आपल्या योजना तिला सांगताना पावेल कमालीचा उत्तेजित झाला होता.

हळूवार आवाजात बाझानोवा म्हणाली, ''खूप मोठ्या संकटातून जाऊनही तुमचा उत्साह अजिबात कमी झालेला नाही. तुम्ही पुन्हा काम सुरू करणार म्हणताय, पण कशा पद्धतीनं तुम्ही काम करणार?''

पावेलने शांत स्मित केले.

''उद्या माझे मित्र माझ्यासाठी एक कार्डबोर्ड स्टेन्सिल घेऊन येणार आहेत. त्यामुळे ओळींचा घोटाळा न करता मला लिहिणं शक्य होईल. खूप विचार केल्यानंतर मला ही कल्पना सुचली. कार्डबोर्डच्या कडक कडांमुळे माझी पेन्सिल वाकडी जाणार नाही. आपण काय लिहितोय ते न पाहता लिहिणं अर्थातच खूप अवघड आहे. पण ते अशक्य मात्र नाही. मी ते करून पाहिलंय आणि मला लिहिता येतं.''

अशा रीतीने पावेलने काम सुरू केले. पराक्रमी कतोवस्की डिव्हीजनविषयी एक कादंबरी लिहिण्याची योजना त्याने आखली. शीर्षक त्याला सहजच सुचलं - ''वादळातून जन्मलेलं''

त्याच्या सर्व जीवनशक्ती ह्या पुस्तकाच्या लेखनात एकवटल्या. हळूहळू एकेक ओळीतून पाने तयार होऊ लागली. आपल्या भोवतालच्या सर्व गोष्टी विसरून तो लिहिण्यात तन्मय झाला होता, प्रतिमांच्या जगात बुडाला होता. पहिल्यांदाच निर्मितीच्या कळा सोसत होता.

त्याने लिहिलेले सर्व काही, अगदी शब्द न् शब्द त्याला आठवावे लागे. थोड्याशा अडथळ्याने त्याचा विचाराचा धागा तुटे व कामात व्यत्यय येई. काही वेळा तर केवळ स्मरणशक्तीच्या जोरावर तो पानेच्यापाने धडाधडा म्हणत असे. अशावेळी तो भ्रमिष्ट होत चाललाय असे वाटून त्याची आई धास्तावून जात असे. तो तिला मनापासून हसे आणि सांगे की तिने काळजी करायचे काही एक कारण नव्हते. अजून तो वेडा झाला नव्हता.

पुस्तकाची तीन प्रकरणे पुरी झाली होती. क्तोवस्की डिव्हीजनमध्ये लढलेल्या आपल्या जुन्या मित्रांचे कादंबरीबाबतचे मत आजमावून पाहण्यासाठी त्याने ते हस्तलिखित ओदेस्साला पाठविले. लवकरच त्या मित्रांकडून प्रशंसापर पत्र आले. पण उलट टपाली येणारे हस्तलिखित वाटेतच गहाळ झाले. सहा महिन्यांच्या कामावर पाणी पडले. हा फार मोठा धक्का होता.

लेदेनेवनी आपल्या मित्राचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

पुन्हा नव्याने सुरुवात करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. लेदेनेवनी पावेलला कागद पुरवले आणि हस्तलिखिताच्या टंकलिखित प्रती काढण्यास सुरुवात केली. सहा आठवड्यांनंतर पहिले प्रकरण पुन्हा लिहून झाले.

कोर्चागिन कुटुंब ज्या फ्लॅटमध्ये राहात होते त्याच्या एका भागामध्ये अलेक्सेव कुटुंब राहात होते. सर्वात मोठा मुलगा अलेक्सान्द्र हा कम्सामोलच्या एका विभागीय समितीचा चिटणीस होता. त्याच्या अकरा वर्षाच्या बहिणीने, गाल्याने पावेलकडे कादंबरीचे काम करण्याचे आनंदाने कबूल केले. त्या दिवसापासून पावेलचे काम दुप्पट वेगाने सुरू झाले. गाल्याचा सक्रीय सहभाग आणि तिची सहानुभूती याची त्याला फार मदत झाली. तिची पेन्सिल वेगाने कागदावर कुरुकुरू चालायची आणि एखादा परिच्छेद तिला आवडला म्हणजे ती मोठ्याने वाचायची. पावेलच्या कामामध्ये ती सर्वार्थाने आनंद घेत होती. बाकी कुणालाही यातून काही निष्पत्ती होईल असे वाटत नव्हते. आपल्यावर लादलेले सक्तीचे रिकामपण पावेल अशा रीतीने रेटत आहे अशीच इतरांची भावना होती.

काही कामासाठी लेदेनेव पावेलकडे आले. त्यांनी त्यातील काही प्रकरणे वाचली व आपला अभिप्राय दिला. ''मित्रा, काम पुढे चालू ठेव. तू जिंकशील याबद्दल मला काही शंका नाही. पोरा, आशा सोडू नको.''

पावेलला एवढा जोम आलेला पाहून तो वयोवृद्ध माणूस अत्यंत समाधानाने परत गेला. गाल्या नियमाने येत होती. अविस्मरणीय भूतकाळातील प्रसंग पानांवर पुनरुज्जिवित होत असताना कधीकधी आठवणींच्या आवेगाने त्याच्या पापण्या थरथरत असत; तेव्हा गाल्या एकटक त्याच्याकडे पाहात राही. त्याच्या डोळ्यांमध्ये विचारांचा ओघ वाहात असताना पाहात राही. एवढ्या नितळ स्वच्छ डोळ्यांना, निष्कलंक बाहुल्यांना काहीही दिसत नव्हते यावर कुणाचा विश्वास बसला नसता.

कधीकधी त्याला न आवडलेले लिखाण तो स्वत: लिहून काढायचा. स्टेन्सिलची अरुंद पट्टी कधीकधी त्याला त्रासदायक वाटायची व धीर सुटून ती तो फेकून द्यायचा. आयुष्याने आपल्याला दृष्टीसुखापासून वंचित केले या विचाराने मग तो संतापायचा, पेन्सिल मोडून टाकायचा आणि रक्त येईपर्यंत ओठ चावायचा.

काम संपत आले तसे बांध घातलेल्या भावना वारंवार अनावर होऊ लागल्या. त्याच्या सदैव दक्ष निर्धारावर मात करू लागल्या. दु:खाचे आणि स्वाभाविक मानवी भावनांचे उमाळे त्याला येऊ लागले. आजवर त्याने या भावनांना थारा दिला नव्हता. कारण यापैकी एका जरी भावनेने त्याच्यावर कब्जा मिळवला असता तर त्याचे परिणाम फार वाईट घडले असते याची त्याला जाणीव होती.

सरते शेवटी अखेरचे प्रकरण लिहून पुरे झाले. पुढचे काही दिवस गाल्या संपूर्ण पुस्तक पावेलला मोठ्याने वाचून दाखवित होती. उद्या हस्तलिखित लेनिनग्रादला प्रादेशिक पक्ष समितीच्या सांस्कृतिक विभागाकडे पाठवायचे होते. तिथे पुस्तक मंजूर झाले म्हणजे ते प्रकाशकांच्या हवाली करता येईल आणि मग...

त्या विचारसरशी त्याचे काळीज धडधडले. सारे काही सुरळीत झाले तर एका नव्या जीवनाला प्रारंभ होईल. अनेक वर्षांच्या अविश्रांत, अथक श्रमांतून निर्माण झालेले नवे जीवन!

पावेलचे भवितव्य त्या पुस्तकाच्या भवितव्यावर अवलंबून होते. जर हस्तलिखित परत आले तर त्याच्या दृष्टीने सारेच संपणार होते. त्याच्या आईने हस्तलिखिताचे पार्सल स्वत: टपाल कचेरीत नेले. आतुरतेने वाट पाहाणे सुरू झाले. यापूर्वी पावेलने कधीही एवढ्या आतुरतेने वाट पाहिली नव्हती. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो केवळ टपालाची वाट पाहात जगत होता. पण लेनिनग्रादहून काहीही बातमी येत नव्हती.

प्रकाशकांचे अखंड मौन अनिष्टसूचक वाटू लागले. दर दिवसागणिक अभद्राची शक्यता वाढत चालली आणि पुस्तक जर सपशेल नाकारले गेले तर आपला निकाल लागेल अशी पावेलची स्वत:पुरती धारणा बनली. ती शक्यता सहन करणे त्याला शक्य नव्हते. जगण्यासारखे त्यापुढे काही उरणार नव्हते. अशा क्षणी समुद्रकिनाऱ्यालगतचे टेकडीवरचे उद्यान त्याला आठवायचे. एकच प्रश्न पुन्हा पुन्हा तो स्वत:ला विचारत रहायचा, ''पोलादी साखळ्या तोडून पक्षात परत जाण्याचे, स्वत:ला उपयुक्त बनवण्याचे सारे यत्न तू केलेस का?'' आणि त्याला स्वत:चे उत्तर मिळायचे, ''होय, माझ्या मतानं मी सारं काही केलंय.''

शेवटी वाट पाहाणे असह्य झाले. पावेलची आईही त्याच वेदना सहन करत होती. अशा वेळी एक दिवस ती ओरडतच पावेलच्या खोलीत धावत आली. ''लेनिनग्रादहून पत्र आलंय.''


प्रादेशिक समितीकडून तार आली होती. त्रोटक भाषेत तारेचा मजकूर होता, ''कादंबरी मनपसंत आहे. प्रकाशकांकडे सोपवलीय. यशाबद्दल अभिनंदन.''

पावेलच्या काळजाचे ठोके वेगाने पडू लागले. त्याचे उरी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले. पोलादी बंधने तुटून पडली होती आणि आता नव्या शस्त्रानिशी सज्ज होऊन तो परत लढवय्यांच्या तुकडीत आणि जीवनात उतरला होता.

◆◆◆◆

रेल्वेमार्ग बांधण्याच्या कामावरील
पावेल, तोन्या व
तिचा अधिकारी नवरा





ल्वोव प्रदेशातील पोलिश
सेनेबरोबरच्या लढाईत
कमांडर लेतनोव ठार

कम
व





निकोलाय
अस्त्रोवस्की

"जीवन ही माणसाची सर्वात मौल्यवान ठेव आहे. त्याला ते एकदाच लाभते आणि त्याने ते असे जगले पाहिजे, की वर्षे वाया घालवल्याबद्दल त्याला खंत वाटू नये, क्षुद्र आणि अतिसामान्य भूतकाळाच्या जळत्या शरमेची त्याला कधी अनुभूती घडू नये. असे जगावे की मरतेवेळी त्याला म्हणता यावे : सबंध आयुष्यभर मी माझ्या सर्व शक्ती साऱ्या जगाच्या सर्वोत्तम कार्यासाठी कारणी लावल्या – मानवजातीच्या मुक्तीच्या लढ्यासाठी!"